सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

## आजचा सामना


दिल्ली कॅपिटल्स् वि. लखनौ सुपरजाएंटस्
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : इकाना स्टेडियम, लखनौ

सोलापूर | मंगळवार, २२ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १६४ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



निश्चयपूर्वक एकदा स्वीकारलेले कार्य पूर्ण शक्तिनिशी अंतिम क्षणापर्यंत करणे, त्या कार्याच्या अनुकूल आपल्या व्यक्तिगत आणि कौटुंबिक दैनंदिनीची रचना करणे, आपल्या स्वभावात त्या कार्यानुकूल बदल करणे आणि कार्य यशस्वी करून दाखविणे, हाच आदर्श परम पूजनीय श्रीगुरुजींनी आपल्यासमोर ठेवला आहे.

- **आप्पाजी जोशी,**
  रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### पोप फ्रान्सिस यांचे निधन

**व्हॅटिकन सिटी :** कॅथलिक चर्चचे प्रमुख आणि ख्रिश्चन धर्मीयांचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचे निधन झाले आहे. ते ८८ वर्षाचे होते. पोप फ्रान्सिस यांचे सोमवारी सकाळी ७:३५ वाजता निधन झाले, अशी माहिती व्हॅटिकनने दिली. पोप यांच्या कार्यकाळात चर्चच्या कारभाराचे निरीक्षण करणारे व्हॅटिकन कॅमरलेंगो कार्डिनल केविन फॅरेल यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. त्यांचे संपूर्ण आयुष्य देवाच्या आणि चर्चच्या सेवेसाठी समर्पित राहिले, असेही त्यांनी नमूद केले आहे. पोप फ्रान्सिस यांना फेब्रुवारी महिन्यात न्यूमोनिया आणि फुफ्फुसाच्या संसर्गामुळे रोमच्या जेमेली रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



# सोने झाले लाखमोलाचे

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

भारतीय संस्कृतीत ज्या पिवळ्या धातुला अनन्यसाधारण असे महत्व आहे. एवढेच नव्हे तर प्रत्येक घरात सोन्याला स्थान आहे. या सुवर्णाला लक्ष्मी समजून दसऱ्याला पूजा केली जाते. वैभवाचे प्रतीक म्हणजे सोने. म्हणूनच या पिवळ्या धातूचे दर सातत्याने वाढत गेले. सोमवारी देशाची राजधानी नवी दिल्ली आणि नाशिकमध्ये सराफा बाजारात सोन्याचा दर तोळ्याला लाखापेक्षा जास्त झाला.

डॉलरच्या कमकुवतपणामुळे मागणी वाढल्याने आणि अमेरिका-चीन व्यापार युद्धामुळे अनिश्चितता वाढल्याने सोमवारी सोमवारी नाशिकमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १०१७७० एवढा झाला होता. दिल्लीतही सोन्याचा भाव १ लाखापेक्षा जास्त झाला. दिल्लीत सोन्याच्या किमतीत १,६५० रुपयांची वाढ झाली आहे आणि ती प्रति १० ग्रॅम १ लाखाचा आकडा पार केला. सोमवारी ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम ९९,८०० रुपयांवर पोहोचला. शुक्रवारी त्याची किंमत २० रुपयांनी घसरून ९८,१५० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाली, असे मत ऑल इंडिया सराफा असोसिएशनने व्यक्त केले आहे. स्थानिक बाजारात ९९.५ टक्के शुद्धतेच्या सोन्याच्या किमतीत १,६०० रुपयांची वाढ होऊन तो ९९,३०० रुपये प्रति १० ग्रॅम या नवीन उच्चांकावर पोहोचला. गेल्या व्यवहार सत्रात, तो किंचित घसरणीसह ९७,७०० रुपये प्रति १० ग्रॅमवर बंद झाला होता.

या वर्षी आतापर्यंत, म्हणजेच २०२५ मध्ये, सोन्याच्या किमतीत २०,८५० रुपयांनी वाढ झाली आहे, म्हणजेच गेल्या वर्षी ३१ डिसेंबरच्या तुलनेत प्रति १० ग्रॅम सुमारे २६.४१ टक्के वाढ झाली आहे. यात चांदीही मागे नाही, सोमवारी चांदीचा भावही ५०० रुपयांनी वाढून ९८,५०० रुपये प्रति किलो झाला. तर शुक्रवारी चांदीचा भाव ९८,००० रुपये प्रति किलोवर स्थिर राहिला. सोन्याला नेहमीच अडचणीच्या वेळेचा आधार मानण्यात येतो. ◂(वृत्तसंस्था)



| वर्ष | सोन्याची किंमत (प्रति १० ग्रॅम) | वर्ष | सोन्याची किंमत (प्रति १० ग्रॅम) |
|---|---|---|---|
| २०१५ | २६,३४३ | २०२१ | ५०,००० |
| २०१६ | २८,६२३ | २०२२ | ५६,१०० |
| २०१७ | २९,००० | २०२३ | ६१,१०० |
| २०१८ | ३१,००० | २०२४ | ७६,१६० |
| २०१९ | ३५,००० | **२०२५** | **९९,८००** |
| २०२० | ४८,६५१ | | |

**मागील १० वर्षांत सोन्यापासून मिळणाऱ्या परताव्यामध्येही त्याने शेअर बाजाराला मागे टाकले आहे. सोन्याचे भाव २०१५ मध्ये २६,३४३ वरून २०२५ मध्ये ९८,८०० पर्यंत वाढले आहेत, जे २६५ टक्के परतावा देते. तर निफ्टी १० वर्षांपूर्वीच्या सुमारे ७,८२५ अंकांवरून २४,००० अंकांवर पोहोचला आहे. याचा अर्थ असा की सुमारे २०० टक्के परतावा मिळतो.** ■





मुंबई येथे सोमवारी राजभवनात झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तपदाची तर ज्येष्ठ पत्रकार गजानन निमदेव, माजी सनदी अधिकारी रवींद्र ठाकरे यांना राज्य माहिती आयुक्तपदाची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यासपीठावर उपस्थित होते.



# आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकणार

## उद्योगमंत्री उदय सामंत; शिवसेनेचा शिवमेळावा आणि राजवी अॅग्रो ऑइल इंडस्ट्रीजचे भूमिपूजन...

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २१ एप्रिल-**

विधानसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला भरभरून मतदान केले आहे. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये सर्वत्र शिवसेनेचा भगवा फडकणार आहे, असा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला.

पृथ्वीराज सावंत यांच्या राजवी अॅग्रो ऑइल इंडस्ट्रीजचे भूमिपूजन सोमवारी उद्योगमंत्री उदय सामंत आणि पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई यांच्या हस्ते माढा येथे झाले. यानंतर हजारो शिवसैनिकांच्या उपस्थितीत शिवमेळावा उत्साहात झाला. याप्रसंगी व्यासपीठावर उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, अखिल भारतीय संत समिती कोकण प्रांताचे सहमंत्री महंत श्री शिवरूपानंद स्वामीजी, राजपुरोहित वेदमूर्ती रवींद्र भगवान पाठक, आमदार नारायण पाटील, आमदार अभिजित पाटील, माजी आमदार संजय शिंदे, माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार धनाजी साठे, बाबासाहेब साठे, गणेश पांडे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, कालीदास सावंत, राजवी अॅग्रो ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि. चे चेअरमन पृथ्वीराज सावंत, वाकावचे सरपंच ऋतुराज सावंत, साईनाथ अभंगराव, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अभिजित थोरात, अमर पाटील, दादासाहेब साठे, मनोज शेजवाल

(अधिक वृत्त पान दोन वर)

### शिवसैनिकांची मोठी गर्दी

शिवमेळाव्यास माढा तालुक्यातील शिवसैनिकांनी मोठी गर्दी केली होती. शिवमेळाव्यासाठी रखरखत्या उन्हातही हजारोंच्या संख्येने जमलेल्या शिवसैनिकांचे तसेच महिला शिवसैनिकांचे मंत्र्यांसह सर्वच प्रमुख पाहुण्यांनी कौतुक केले.

### माळरानावर उद्योग उभारण्याचे धाडस

पृथ्वीराज सावंत यांनी माढा येथील माळरानावर राजवी ऍग्रो ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि. च्या माध्यमातून उद्योग उभारणीचे धाडस केले आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी यावेळी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उद्योगमंत्री उदय सामंत, पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई यांचे कायम सहकार्य राहिले आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी भविष्यातही या नेत्यांचे सहकार्य राहील असा विश्वासही प्रा. शिवाजी सावंत यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# सोलापुरात आत्महत्येच्या चार घटना

## तिघांनी गळफास घेऊन संपविले जीवन तर मानसिक तणावाखाली गोळ्या खाल्याने एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

**गांधीनगर :** अक्कलकोट रस्त्यावरील गांधी नगरात राहणा-या तरुणाने राहत्या घरात सोमवारी सकाळी ९.४५ वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली. अ.रजाक रंगरेज (वय ३२) असे तरुणाचे नाव आहे. अज्ञात कारणातून अ.रजाक याने घरातील पंख्याच्या हुकाला ओढणीने गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यास खाली उतरवून मेव्हणा रियाज शेख याने उपचारास दाखल केले असता, उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**तुळजाभवानी नगर :** दुसऱ्या घटनेत अक्कलकोट रस्त्यावरील तुळजाभवानी नगरात ५५ वर्षीय व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी रात्री ९.३० वाजता उघडकीस आला. राम मुरलीधर कांबळे (वय ५५) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. रविवार २० एप्रिल रोजी रात्री ९.३० च्या सुमारास राम हे त्यांच्या राहत्या घरातील पत्र्याच्या वाशाला साडीपासून बनलेल्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. नातेवाईकांना ही बाब लक्षात येताच त्यांनी गाठ सोडवून खाली उतरविले. हवालदार कटके यांनी बेशुध्द अवस्थेत उपचारास शासकीय रुग्णालयात रात्री ११.५० वाजता दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



**कुंभारी :** तिसऱ्या घटनेत दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी परिसरातील बसवेश्वर पार्क येथे महिलेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार रविवार दुपारी २ वाजता उघडकीस आला. संगिता लक्ष्मण कोणदे (वय ३४) असे महिलेचे नाव आहे. रविवारी दुपारी दोनच्या सुमारास संगिता या राहत्या घरातील पख्याच्या हुकाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्या. ही बाब लक्षात येताच दीर भैरप्पा चनबसप्पा कोणदे (रा. बंडे नगर) याने इतरांच्या मदतीने तिला गळफासातून सोडविले. त्यानंतर बेशुध्द अवस्थेत पोलीस नाईक बनकर यांनी दुपारी चार वाजता उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**एमआयडीसी :** चौथ्या घटनेत मानसिक तणावाच्या २० गोळ्या खाल्याने तरुणाचा मृत्यू झाला. हा प्रकार रविवारी सायंकाळी एमआयडीसी परिसरात घडला.

नितीन दत्तात्रय बिज्जा (वय २५, रा. एमआयडीसी, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. रविवारी दुपारी तीनच्या सुमारास नितीन याने मानसिक तणावाच्या सुमारे १५ ते २० गोळ्या खालल्या. त्यात त्यास त्रास होऊ लागल्याने सायंकाळी ६.१५ वाजता वडील दत्तात्रय यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुभाजकावरून दुचाकी आदळल्याने पडून दोघे जखमी

सोलापूर मंगळवेढा रस्त्यावरील हत्तुर केगाव बायपास रस्त्यावरील दुभाजकावरून दुचाकी आदळल्याने पडून दोघे जखमी झाले. हा प्रकार सोमवारी रात्री १२.३० वाजता घडला. शंकर जगन्नाथ उबाळे (वय २७, रा. कुणी ता.जि. पुणे) व सतिश आगतराव (वय ३०, रा. तुळजापूर) अशी जखमींची नावे आहेत. शंकर आणि सतिश हे दोघे दुचाकीवरून हत्तूर केगाव बायपास रस्त्यावरून जात होते. डोणगाव पुलाजवळ गेल्यानंतर तेथील दुभाजकावरून दुचाकी आदळल्याने ते दोघे खाली पडले. यात शंकरच्या चेह-याला आणि हाताला खरचटले तर सतिशच्य डोक्याला जखम झाली तसेच हाताला व खांदयाला मुकामार लागल्याने विशाल गायकवाड याने रात्री १.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोरवलीत दहा वर्षाच्या मुलीस दोघींना बॅटने मारहाण

मोहोळ तालुक्यातील कोरवली येथे दहा वर्षाच्या मुलीसह दोघींना बॅटने मारहाण करून जखमी करण्यात आले. हा प्रकार रविवार २० एप्रिल रोजी रात्री ९.३० वाजता घडला. दिप्ती राजकुमार राठोड (वय १०) व अश्विनी गोरख पवार (वय २३, दोघी रा. कोरवली ता मोहोळ) असे मारहाण झालेल्या दोघींची नावे आहेत. कोरवली येथील रहाते घराजवळ अश्विनी आणि दिप्ती या थांबल्या होत्या. त्यांना अज्ञात कारणातून गोरख पवार याने लाकडी बॅटने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. या मारहाणीत दिप्ती हिला सर्वांगास मुकामार लागला तर अश्विनी हिच्या पाठीला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सोमवारी मध्यरात्री २.३० वाजता त्या दोघी स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बेशुध्दावस्थेत आढळून आलेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू

मोहोळ तालुक्यातील विरवडे (ब्रुदूक) येथील पाच नंबर कॅनालजवळील ज्ञानेश्वर साठे यांच्यावस्तीसमोरील रस्त्याच्या कडेला बेशुध्दावस्थेत आढळून आलेल्या एकाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. हा प्रकार सोमवारी सकाळी ८.३० वाजता उघडकीस आला. प्रशांत हेमंत थोरात (वय ३८, रा. विरवडे (ब्रु) असे तरुणाचे नाव आहे. सोमवारी सकाळी ८.३० च्या सुमारास प्रशांत हा विरवडे (ब्रुदूक) येथील पाच नंबर कॅनालजवळील ज्ञानेश्वर साठे यांच्यावस्तीसमोरील रस्त्याच्या कडेला बेशुध्दावस्थेत आढळला. वडील हेमंत यांनी त्यास बेशुध्द अवस्थेत सकाळी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महत्त्वाचे...

### विद्युत पोलला डोके आपटून तरुण जखमी

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

दारुच्या नशेत तरुणाने स्वत:चे डोके विदयुत पोलला आपटून घेतल्याने तो जखमी झाला. हा प्रकार रविवारी रात्री ११.४५ च्या सुमारास घडला. जगदिश गोविंद गाजूल (वय २०, रा.एमआयडीसी सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. रविवारी रात्री जगदिश याने दारु प्राशन केली होती. दारुच्या नशेत असताना त्याने घराजवळील विदयुत पोलला स्वत:चे डोके आपटून घेतले. यात डोक्याला जखम झाल्याने सोमवारी रात्री १२.५५ वाजता स्वत: उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुरकु-याचे पैसे मागितल्याने पानटपरी चालकास मारहाण

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

कुरकुरे घेतल्यानंतर त्याचे पैसे मागणा-या पानटपरीचालकाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुक्यातील बाळे येथे रविवारी रात्री ९.४५ वाजता घडला. ॠतुराज रघुनाथ सूर्यवंशी



(वय २५, रा. बाळे) असे मारहाण झालेल्या पानटपरीचालकाचे नाव आहे. ॠतुराज याची बाळे परिसरात पान टपरी आहे. यामधून तो कुरकु-याची विक्री करतो. रविवारी रात्री ९.४५ च्या सुमारास आलेल्या प्रदीप उबाळे याने खाण्यासाठी म्हणून टपरीतून कुरकुरे घेतले. याचे पैसे मागिल्याने ॠतुराज यास प्रदीप याने लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागला. रात्री १०.२० वाजता स्वत: उपचाराकरीता दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे..

### अभिनेता अभिनव शुक्लाला लॉरेन्स गँगच्या नावाने धमकी

**मुंबई, २१ एप्रिल**

टीव्ही रिॲलिटी शो अभिनेता अभिनव शुक्लाला जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. ही धमकी सोशल मीडियावरील एका व्यक्तीने दिली आहे. त्यासंदर्भात त्यांनी एक पोस्ट शेअर केली आणि पंजाब आणि चंदीगड पोलिसांकडून या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली आहे. ही संपूर्ण घटना शुक्लाची पत्नी अभिनेत्री रुबिना दिलैक आणि मॉडेल असीम रियाझ यांच्यातील वादाशी जोडली जात आहे. अभिनेता अभिनव शुक्लाने प्रसिद्ध केलेल्या पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला आहे की त्याला असीम रियाझच्या चाहत्यांकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या.

## अक्कलकोट नगरपरिषदेने यात्रा अनुदानातून सोयी सुविधा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ एप्रिल-**

लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांना नगर परिषदेकडून यात्रा अनुदान मधून विविध सोयीसुविधा देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

राज्य शासनाकडून अक्कलकोट नगरपरिषदेस तत्कालीन नगराध्यक्षा शोभाताई खेडगी यांच्या मागणीवरून गेल्या ५ वर्षापासून १ कोटी रुपयाचा निधी मिळत आहे. त्या निधीतून शहरातील भक्ताभिमुख विकासकामे हाती घेण्याच्या सूचना शासनाकडून निद्रेषित केल्याप्रमाणे श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, बुधवार पेठेतील श्री स्वामी समर्थ सम ाधी मठ ' स्टेशन रोड राजेराय मठ ' टिळक गल्ली जोशी मठ गुरुमंदिर 'व शहरातील विविध मंदिर परिसरात, पालखी मार्गावर अनुषंगीक कामांसाठी सदरचा निधी त्वरित वापरून सोयीसुविधा उपलब्द करून देण्याची मागणी पुढे येत आहे.राज्यासह परराज्य व विदेशातून लाखोंच्या संख्येने स्वामी भक्तांची रेलचेल श्री क्षेत्र अक्कलकोट मध्ये नित्य होत असल्याची चित्र असताना त्या प्रमाणे नगर परिषदेकडून आवश्यक विकासाची कामे सुरु आहेत. श्रींच्या पुण्यतिथी उत्सव काळात तरी सुलभ सुविधा भक्तांना देण्याकामी यात्रा अनुदानातून कामे घ्यावेत अशी मागणी होत आहे.

यामध्ये सध्याचे कडक उन्हाळा पाहता ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय, वाहनतळ, स्वच्छता गृह, रस्ते व त्यावरील अतिक्रमणे काढून बॅरीगेट्स, पालखी मार्गावरील स्वच्छता व मॅटिंग, दिवाबत्ती, सांड पाण्याचा निचारा अशा विविध विकास कामांना नगर परिषदेने प्राधान्य देऊन येत्या दोन दिवासात भक्तांच्या सेवेर्थ श्री क्षेत्र अक्कलकोट नागरी ही सज्ज करण्याची मागणी शहर वाशियातून होत आहे.

सोयीसुविधा बाबत प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करू नये, या पुण्यतिथी उत्सवात पोलीस प्रशासना कडून देखील चोख बंदोबस्त व वाहतूक व्यवस्था ठेवण्याची मागणी केली जात आहे. वाहने पार्किंग करिता स्वतंत्र व्यवस्था करावी अशी मागणी होत आहे .

## दिव्यांग व दुर्धर आजारी शिक्षकांच्या फेर वैद्यकीय तपासणीचे आदेश

### आज होणारे धरणे आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

सन २०२५ मध्ये होणाऱ्या जिल्हांतर्गत शिक्षक बदली प्रक्रियेत संवर्ग एकमधून अर्ज दाखल करणाऱ्या दिव्यांग व दुर्धर आजारी शिक्षकांना जे. जे. हास्पिटल मुंबई येथून फेर वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागणार आहे. याबाबतीत सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने स्पष्ट आदेश काढण्यात आल्याने उद्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पुकारण्यात आलेले धरणे आंदोलन स्थगित करण्यात आल्याची माहिती बार्शी तालुका प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीचे निमंत्रक संजय पाटील यांनी दिली.

सोलापूर जिल्ह्यात विशेषतः बार्शी तालुक्यातील अनेक शिक्षकांनी शासनाचे बदली धोरण डोळ्यासम ोर ठेवून सोयीच्या शाळेवर बदली व नियुक्ती मिळावी या हेतूने बोगस दिव्यांग प्रमाणपत्रे मिळवलेली आहेत. बार्शी तालुक्यातील एकूण ५७१ शिक्षकांपैकी ८५ शिक्षकांकडे अशी प्रमाणपत्रे आहेत. तर उच्च शिक्षण घेणाऱ्या काही पाल्यांना मतिमंद असल्याचे दाखवून काहीजण बदली धोरणातील सवलतींचा लाभ घेत आहेत. अनेक तालुक्यांत देखील काही अंशी हे प्रमाण दिसून येते.

संवर्ग एक मधून बदलीसाठी माहिती सादर केलेल्या सोलापूर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांच्या केवळ वैद्यकीय प्रमाणपत्रांची पडताळणी न करता जे. जे. रुग्णालय , मुंबई येथे फेर वैद्यकीय तपासणी करण्यात यावी व तेथून प्राप्त झालेल्या वस्तुनिष्ठ अहवालाच्या आधार बोगस वैद्यकीय दाखले जोडलेल्या कर्मचाऱ्यांना यातून बाजूला करण्यात यावे . या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. याबाबतीत शिक्षणाधिकारी कादर शेख यांची भेट घेऊन शिष्टमंडळाने वस्तुस्थिती विशद केली होती.

सोलापूर जिल्ह्यात सुरु असलेला हा प्रकार रोखण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी संवर्ग एक मधील सवलतीचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांना फेर वैद्यकीय तपासणी करुन घेण्याचे आदेश दिले असून चूकीची माहिती सादर करणार्या शिक्षकांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यामुळे बोगसगिरीला आळा बसणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने सजगता दाखवून याबाबतीत धोरण स्पष्ट केल्याने उद्या मंगळवारी होणारे धरणे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. मात्र एवढ्यावरच न थांबता ज्यांनी संवर्ग एक मधून लाभासाठी अर्ज दाखल केले आहेत अथवा बदलीसाठी नकार दिला आहे.

अशांची यादी संकलित करुन जे. जे. हास्पिटल मुंबई येथून संबंधितांकडून फेर वैद्यकीय तपासणी होईपर्यंत पाठपुरावा सुरुच राहील अशी भूमिका समन्वय समितीच्या वतीने घेण्यात आल्याचे अनिल काळे, श्रीकृष्ण मुळे, धनाजी कुंभार, दिपक काळे, सुरेश व्हळे, अशोक लोहार, दत्तात्रय पाटील, विष्णू मिरगणे, उत्तम ओहोळ यांनी सांगितले .

## बाजार समितीच्या निवडणुकीसाठी मतदान केंद्र जाहीर

### ग्रामीणमध्ये ७ तर शहरात १ मतदान केंद्र

### निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १८ संचालक मंडळासाठी घेण्यात येणारी पंचवार्षिक निवडणूक रविवार दि. २७ रोजी सकाळी ८ पासून ते संध्याकाळी ५ पर्यंत संपन्न होणार आहे. सोलापूर शहर व ग्रामीण भागात सदरचे मतदान केंद्र असणार आहे. त्यामध्ये ग्रामीण भागात ६ तर शहरी भागात २ मतदान केंद्रावर बाजार समितीचे मतदान होणार असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी माहिती दिली आहे.



दरम्यान, बाजार समितीच्या मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार किंवा गैर प्रकार घडू नये यासाठी मतदान केंद्र येथे चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. तसेच मतदान प्रक्रियेसाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या देखील निश्चित करणार असल्याची माहिती गायकवाड यांनी दिली.

त्याच पद्धतीने व्यापारी मतदारसंघातून १२७६ तर हमाल तोलार मतदारसंघातून १०८४ मतदार मतदान करणार आहेत. यासाठी मतदान केंद्र हे श्री सिद्धेश्वर प्रशाला मतदान केंद्र असणार आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणुकीची धामधूम जोरात सुरू असून, निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार केंद्राची निश्चिती त्यानंतर प्रक्रिया संदर्भात तयारी करण्यात निवडणूक प्राधिकरण कार्यालय कामकाजात व्यस्त असल्याचे दिसत आहे.

**मतदान केंद्र याप्रमाणे**

१)सिद्धेशवर प्रशनाला पासपोर्ट कार्यलय शेजारी-सहकारी संस्था / ग्रामपंचायतोची मतदान केंद्रास जोडलेलो गावे-एकरूख, कुमठे, केगांव, खेड, गुळवंची, दहिटणे, देगांव, बाणेगांव, बाळे, भोगांव, मजरेवाडी, शेळगी, सोरेगांव, सोलापूर, हगलूर, हिप्परगे, होनसळ, राळेरास-मतदार संख्या-३३६, ग्रामपंचायत मतदार संघ-२ मतदार संख्या-७८.

२) तिऱ्हे- बेलाटी, कवठे, कोंडी, डोणगांव, तिऱ्हे, तेलगांव, नंदूर, पाकणी, शिवणी, पाथरी, हिरज-२४७ सहकारी संस्था,ग्रामपंचायत -११७,

३) नान्नज-मार्डी, रानमसले, वडाळा, वांगी, अकोलेकाटी, कळमण, कारंबा, कौठाळी, गावडी दारफळ, नरोटेवाडी, नान्नज, पडसाळी, बीबी दारफळ, साखरेवाडी, भागाईवाडी, सेवालाल नगर.-२७३ सहकारी संस्था,ग्रामपंचायत-१७५.

४) निंबर्गी-कुसूर, अंत्रोळी, खानापूर, तेलगांव, निबगी, बाळगी, भंडारकवठे, लवंगी, वडापूर, विंचूर, शंकरनगर, सादेपूर, कंदलगांव, कारकल, गुंजेगांव, माळकवठे-स. संस्था-२३१,ग्रामपंचायत-१५१

५) मंद्रुप - चिंचपूर, हत्तरसँग, होनमुर्गा, अकोले मंद्रुप, ओज मंद्रुप, औराद, कुडल, कुरघोट, टाकळी, नांदणी, बरूर, बसवनगर, बोळकवठे, मंद्रुप, मनगोळी, येळेगांव, वडकबाळ, वांगी, गावडेवाडी-स संस्था-२४८,ग्रामपंचायत- १७५,

६)आहेरवाडी-इंगळगी, कणबस (गं), हत्तूर, हिपळे, होटगी (सा), होटगी स्टेशन, आलेगांव, आहेरवाडी, ओज (आ), तिल्हेहाळ, फलाटेवाडी, बंकलगी, बोरूळ, मद्रे, राजूर, शिरवळ, संजवाड, सिंदखेड, घोडातांडा सह संस्था-२३१,ग्रामपंचायत-१७०.

७) वळसंग-कदेहळ्ळी, दिङूर, हणमगांव, आचेगांव, कुंभारी, तीर्थ, तोगराळी, धोत्री, बेत्नाळ, रामपूर, लिंबी चिंचोळी, वडगांव-शिर्पनहळ्ळी, बळसँग, शिगडांव: संस्था;१७४ ग्रामपंचायत-१४६,

८) बोरामणी-कासेगांव, दर्गनहळ्ळी, दोड्डी, उळे, उळेवाडी, गंगेवाडो, तांदुळवाडी, पिंजारवाडी, बक्षीहिप्परगे, बोरामणी, मुळेगांव, मुळेगांव तांडा, मुस्ती, वहजी, वरळेगांव, संगदरी स संस्था-१५५, ग्रामपंचायत-१६४.

## राहुल गांधींच्या नागरिकत्वाबाबत दहा दिवसांत अहवाल सादर करा

### अलाहाबाद उच्च न्यायालयाचा केंद्राला निर्देश

**नवी दिल्ली, २१ एप्रिल**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी देशाचे नागरिक आहे की नाही, याबाबतचा अहवाल दहा दिवसांत सादर करण्याचा निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने केंद्र सरकारला दिला आहे. या संदर्भात पुढील सुनावणी ५ मे रोजी होणार आहे. राहुल गांधी देशाचे नागरिक आहेत की नाही, याबाबतची विचारणा न्यायालयाने केंद्र सरकारकडे केली आहे. न्यायालयात दाखल एका याचिकेतून राहुल गांधी यांच्या नागरिकत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. राहुल गांधी यांचे नागरिकत्व संदिग्ध आहे, असा आरोप करीत याचिकेतून त्यांच्या लोकसभा सदस्यत्वाला आव्हान देण्यात आले.

## आगामी स्थानिक स्वराज्य ...

पान एक वरुन...

युवा सेनेचे शहर प्रमुख समर्थ मोटे, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख मनोज साठे, युवा सेना राज्य कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द उपस्थित होते. उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, शिवसेनेचे नेतृत्व असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिवसभरात २० तास काम करतात सर्व शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनीही शिवसेना पक्षासाठी अशाच पद्धतीने काम केले तर शिवसेना राज्यात क्रमांक एकचा पक्ष होईल. आणि याच जोरावर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भगवा फडकवता येईल. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असल्याने एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे नेतृत्व करू शकले. सावंत परिवाराने सुरू केलेल्या राजवी ॲग्रो ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि. मुळे माढा आणि परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा फायदा होणार आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी भविष्यात अनेक उद्योग प्रकल्प देणार असून शासनाला प्राप्त झालेल्या निवेदनाबाबत पुढील आठ दिवसात बैठका घेण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई म्हणाले, सर्वसामान्य जनतेची कामे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तालुका, जिल्हास्तरावर करावीत. सत्तेचा उपयोग शिवसैनिकांनी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी करावा. विधानसभा निवडणुकीत निवडून आलेले शिवसेनेचे ६० आमदार म्हणजे मोठी जबाबदारी असून शिवसेनेची बांधिलकी जनतेशी असल्याचेही पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई याप्रसंगी म्हणाले. शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत यांनी प्रास्ताविक केले. ऐश्वर्या हिबारे यांनी सूत्रसंचालन तर यांनी राजवी ॲग्रो ऑइल इंडस्ट्रीज प्रा. लि पृथ्वीराज सावंत यांनी आभार मानले.

## महाराष्ट्रासह परराज्यात घरफोडी करणाऱ्या दोन गुन्हेगारांना अटक

### सोलापूर ग्रामीण पोलिसांची कामगिरी

### ८३ लाखांचा मुद्देमाल जप्त

### जिल्ह्यात नाव बदलून वावरत होते आरोपी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

महाराष्ट्रसह अनेक परराज्यात घरफोडी करणाया २ अट्टल गुन्हेगारांना सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. या आरोपीकडून ८.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. हे आरोपी गुजरात, कर्नाटक, तेलंगना व महाराष्ट्रातील सांगली, पुणे, पिंपरी चिंचवडसह सोलापूर जिल्ह्यात नाव बदलून वावरत होते.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सोलापूर ग्रामीण यांनी जिल्ह्यामध्ये घरफोडी करणायांच्या शोध घेण्याचे आदेश आढावा बैठकीत दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील तपास पथकांचे अधिकारी यांना मार्गदर्शन करून गुन्हे उघड करण्याच्या सूचना दिल्या होत्या, यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बायकर हे त्यांच्या पथकासह अकलुज व पंढरपुर उपविभागात मालाविषयी घडलेल्या गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेत होते. असताना, सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषण आधारे आरोपी निष्पन्न करण्यात आले. गोपनीय माहितीनुसार नातेपुते पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेला आरोपी ठाणे हा मंगळवेढा येथील सांगोला ते सोलापुर महामार्गाच्या ब्रीज खाली जुना टोल नाका येथे साथीदासह येणार आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सपोनि वायकर व त्यांचे पथक मंगळवेढा येथे पोहोचले.या पथकाने सापळा रचुन आरोपींना ताब्यात घेतले. तपासात आरोपीने साथीदारासोबत गुन्हा केल्याची कबुली दिली. अधिक चौकशीत त्याने सोलापूर ग्रामीण मध्ये घरफोडीचे गुन्हे केल्याचे सांगितले. आरोपींकडून गुन्ह्यातील १२० ग्रॅम २ मीली सोने व २० ग्रॅम चांदीचे सिक्के व एक चारचाकी स्वीफ्ट कार असे एकुण ८ लाख ८२ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, व वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक, विशाल बायकर, सहाय्यक फौजदार निलकंठ जाधवर, प्रकाश कारटकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल विरेश कलशेट्टी, पोलीस कॉन्स्टेबल बाळराजे घाडगे, अजय वाघमारे, अन्यर अत्तार, राहुल दोरकर, हरीष थोरात, चालक सुनिल पवार, नातेपुते पोलीस ठाणेकडील पोलीस नाईक राकेश लोहार, सायबर पोलीस ठाणेकडील पोलीस हवालदार व्यकंटेश मोरे यांनी बजावली.

## शेतकऱ्यांनी सोलारसाठी जास्तीचे पैसे देऊ नयेत

### महावितरणचे आवाहन

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

सोलार बसविण्यासाठी शेतकऱ्यांकडून खड्डे खोदून घेणे, वाहतुकीसाठी पैसे मागणे तसेच त्यांना सिमेंट, वाळू आणण्यास सांगणे आदी तक्रारी काही भागातून महावितरणकडे आहेत. त्यांची महावितरणने दखल घेतली आहे. शेतकऱ्यांनीही कोटेशन व्यतिरिक्त रक्कम कोणालाही देऊ नये असे आवाहन महावितरणने केले आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप योजना' सुरु आहे. तर यापूर्वी केंद्रसरकारच्या 'कुसुम-बी' योजनेतून सौर पंप आस्थापीत केले आहेत. अनुसुचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांना ९५ टक्के तर इतर शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानातून सौर पंप मिळतात. त्यासाठी तीन अश्वशक्तीला अनुसुचित जाती व जमातीकरिता ११४८६ रुपये, इतरांकरिता २२९७१ रुपये, पाच अश्वशक्तीसाठी अनुक्रमे १६०३८ रुपये व ३२०७५ रुपये आणि ७.५ अश्वशक्तीला २२४६५ रुपये व ४४९२९ रुपये भरावे लागतात. त्यातून सोलारपंप आस्थापित करणे, कार्यान्वयन व देखभाल दुरुस्तीचा समावेश आहे. त्याम ुळे कोटेशनच्या रकमे व्यतिरिक्त कोणतेही आगाऊ शुल्क घेतले जात नाही. शेतकऱ्यांनीही अशी आगाऊ रक्कम कोणाला देऊ नये अथवा साहित्य आणून देऊ नये. त्यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर महावितरणशी संपर्क साधावा. तक्रारीची दखल न घेतल्यास नोडल अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता कय्युम मुलाणी यांच्या ९०२९११४६८० या क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

॥ उसंतवाणी ॥
१४८७

बांगला देशाला । बसे चपराक ।
व्यापाराचे चाक । फसलेले ॥१॥

हिंदुविरोधाचा । त्यांनी केला खेळ ।
आता आली वेळ । भोगण्याची ॥२॥

रस्त्यावरतून । व्यापाराला रोक ।
निषेधाचे टोक । भारताचे ॥३॥



माल भरलेले । ट्रक ते सडले ।
पाऊल अडले । उद्योगाचे ॥४॥

हिंदू विरोधात । माजवून दंगा ।
भारताशी पंगा । घेतला तो ॥५॥

आलीया अंगाशी । आपलीच खेळी ।
बसे दातखिळी । व्यवहारात ॥६॥

कांत भारताला । उगी जो नडला ।
गाडा तो अडला । विकासाचा ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
२१ एप्रिल २०२५

# एपीआय अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणी अभय कुरुंदकरला जन्मठेप

## इतर दोन आरोपींना सात वर्षांची शिक्षा, 'खाकी'तील अनैतिक संबंध, अपहरण व हत्या

**तभा वृत्तसेवा,**
**पनवेल, दि. २१ एप्रिल-**

पोलीस दलातील बहुचर्चित सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे यांच्या अपहरण व हत्या प्रकरणात मुख्य आरोपी व बडतर्फ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरला जन्मठेप व २० हजारांचा दंड सुनावला आहे. तर पुरावे नष्ट करण्यास सहकार्य करणाऱ्या कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर यांना प्रत्येकी ७ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

पनवेल सत्र न्यायाधिश के. जी. पालदेवार यांनी हा निकाल दिला. अनैतिक संबंधातून २०१६ मध्ये अश्विनी बिद्रे यांची निघृण हत्या केली. तिच्या शरीराचे तुकडे तुकडे करून खाडीमध्ये फेकण्यात आले होते.

या प्रकरणात दोन क्रमांकाचा आरोपी ज्ञानदेव उर्फ राजू पाटील याला सबळ



पुराव्याअभावी निर्दोष सोडण्यात आले आहे. पोलीस दल हादरून सोडलेल्या या प्रकरणाचा तब्बल ९ वर्षानंतर निकाल लागला आहे. या प्रकरणातील पोलिसांच्या भूमिका आणि कार्यपध्दतीवर न्यायालयाने ताशेरे ओढले.

अश्विनी बिद्रे यांच्या हत्येने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली होती. त्यांची २०१५ मध्ये नवी मुंबईतील कळंबोली पोलीस ठाण्यात बदली झाली होती. मात्र त्या कळंबोली पोलीस ठाण्यात रुजू झाल्याच नव्हत्या. दीड वर्षांपासून त्या बेपत्ता होत्या. अश्विनी यांच्या कुटुंबीयांनी कळंबोली पोलीस ठाण्यात अभय कुरुंदकर यांच्याविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. मात्र पोलिसांनी कुरुंदकर यांच्यावर कारवाई करण्यात आली नव्हती. यामुळे हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात पोहोचले होते. उच्च न्यायालयाने अश्विनी बिद्रे यांचा शोध घेण्याचे आदेश पोलिसांना दिले होते.

११ एप्रिल २०१६ रोजी अश्विनी बिद्रे यांची हत्या झाल्याची बाब उघड झाली. अनैतिक प्रेमसंबंधातून ही हत्या करण्यात आली. या प्रकरणात भाईंदरच्या नवघर पोलीस ठाण्याचा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकर मुख्य आरोपी होता. अश्विनी बिद्रे यांची हत्या करून आपल्या साथादीरांच्या मदतीने मृतदेहाची विल्हेवाट लावली होती. या याप्रकरणी अभय कुरुंदकर, ज्ञानदेव पाटील, कुंदन भंडारी आणि महेश फळणीकर यांना अटक करण्यात आली होती.

अश्विनी बिद्रे पोलिस दलात २००५ साली उपनिरीक्षक म्हणून रूजू झाल्या होत्या. सांगलीत पोस्टिंग असताना तिची अभय कुरुंदकरशी ओळख झाली दोघेही विवाहित होते मात्र त्यांच्यात अनैतिक संबंध प्रस्थापित झाले. कुरूंदकरला पत्नीसह मुले होती. बिद्रे हिला पती राजू गोरेपासून एक मुलगी आहे. तिने त्याच्याशी संबंध तोडले होते. तिने कुरूंदकरकडे लग्नाचा तगादा लावला होता. त्यावरुनच कुरुंदकर आणि बिद्रे यांच्यात रोजच भांडणे होत होती. कुरूंदकर पहिल्या पत्नीला व मुलांना सोडू शकत नव्हता तर बिद्रे यांनी लग्नाचा तगादा लावल्याने एकदाची कटकट संपवावी, म्हणून त्यांची हत्या करण्याचा डाव रचला. यासाठी त्याने बालपणीचा मित्र महेश फळणीकर याला सोबत घेतले व अश्विनीची हत्या केली. त्यानंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे फ्रिजमध्ये ठेवले होते. कुरूंदकरला याप्रकरणात राजू पाटील आणि कारचालक कुंदन भांडारी यांनी साथ दिली. महेश फळणीकर व राजू पाटीलच्या मदतीने मृतदेहाचे तुकडे वसई खाडीत फेकून विल्हेवाट लावली होती.

अश्विनी बेंद्रे बेपत्ता झाल्याबाबत तिच्या पतीने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र त्याबाबत तपास न झाल्याने उच्च न्यायालयात त्यांनी धाव घेतली होती. न्यायालयाने खडसावल्यानंतर पोलिसांनी याबाबत सखोल तपास करून अपहरण व हत्येचा गुन्हा कुरुंदकर याच्यावर दाखल केला होता. तिच्या मृतदेह अखेर पर्यंत मिळाला नाही. मात्र अन्य सबळ पुरावाच्या आधारे विशेष पथकाने खटला दाखल केला होता

## महत्त्वाचे...



### राज्यपालांकडून राहुल पांडे यांना राज्य मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ

**मुंबई, दि. २१ एप्रिल-**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी सोमवारी ज्येष्ठ पत्रकार राहुल पांडे यांना राज्याच्या मुख्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर व गजानन निमदेव यांना देखील राज्य माहिती आयुक्त पदाची शपथ दिली. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे तसेच इतर माहिती आयुक्त यांच्या नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तसेच समारोप राष्ट्रगीताने झाला.या सोहळ्याला विधान परिषद सदस्य परिणय फुके, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### ३ जुलैपासून सुरू होणार अमरनाथ यात्रा

**नवी दिल्ली, २१**

एप्रिल यंदा अमरनाथ यात्रेला ३ जुलैपासून सुरुवात होणार असून ९ ऑगस्टला संपणार आहे. अमरनाथ यात्रा दरवर्षी श्रावण महिन्यात सुरू होते. सावन पौर्णिमेला संपते. अमरनाथ धामच्या यात्रेला धार्मिक महत्त्व आहे. तसेच ही यात्रा करणे पुण्याचे मानले जाते. या यात्रेचे आध्यात्मिक महत्त्व ज्यांना माहिती आहे त्यांना एकदा ही यात्रा करण्याची इच्छा असते. ६२ दिवस चालणाऱ्या अमरनाथ यात्रेसाठी १४ एप्रिलपासून ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने नोंदणी सुरू झाली आहे. यात्रेकरू श्री अमरनाथजी श्राइन बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटद्वारे ऑफलाइन आणि ऑनलाइन नोंदणी करू शकतात. श्री अमरनाथजी श्राइन बोर्डाच्या संपूर्ण भारतात ५४० पेक्षा अधिक बँक शाखा आहेत. येथून नोंदणी करू शकतात. जर यात्रेकरूंना ऑफलाइन नोंदणी करायची असेल तर ते नोंदणी केंद्र किंवा बँक शाखेत जाऊ शकतात. सहसा, यात्रेच्या निवडलेल्या दिवसाच्या तीन दिवस आधी वैष्णवी धाम, पंचायत भवन आणि महाजन हॉलसारख्या ठिकाणी टोकन स्लिप्स वाटल्या जातात. यात्रेकरूंनी दुसऱ्या दिवशी अधिकृत नोंदणी आणि वैद्यकीय तपासणीसाठी सरस्वती धामला जावे.

# शुद्ध वाळू उपसा केल्याप्रकरणी ठेकेदारांवर गुन्हा दाखल करावा

### विरोधी पक्षनेते दानवे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२१ एप्रिल-**

गाळ मिश्रित वाळू उपसाच्या नावाखाली ठेकेदाराकडून शुद्ध वाळू उपसा होत असून त्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करून संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. कारवाई न केल्यास संबंधित मंत्री, अधिकारी यांच्यावर हक्कभंग मांडणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. छत्रपती संभाजीनगर, पैठण हिरपुडी येथील गोदावरी नदी पात्रातून अवैधरित्या होत असलेल्या वाळू उपसाबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात १७ मार्चला विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सभागृहात विषय उपस्थित केला म्हणून २४ तासासाठी निविदेला स्थगिती देऊन तात्काळ स्थगिती उठविली. मात्र मूळ मुद्दा हा निविदेचा नसून गाळ मिश्रित वाळूच्या नावाखाली शुद्ध वाळू उपसा ठेकेदाराकडून केला जात आहे.


उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तलाठी व महसूल निरीक्षक हे वाळू निविदे संबंधी तक्रार असल्याचे सांगून ठेकेदारासोबत असलेले आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी मंत्री व सरकारची दिशाभूल करत असल्याचा आरोप दानवे यांनी केला आहे. तसेच याप्रकरणी त्या ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करावा व सभागृहाची, मंत्री महोदयांची दिशाभूल व चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही तात्काळ कारवाई करण्याची मागणी दानवे यांनी केली आहे.

# नाशिक बाह्यवळण प्रकल्पाचा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर करा

### मुख्यमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ एप्रिल-**

कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक परिसरात वाढणारी रहदारी, साधू-संत-महंत आणि भाविकांची होणारी गर्दीचा विचार करुन योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमिवर नाशिक बाह्यवळण प्रकल्पाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी तातडीने सादर करा , असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. तसेच नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्तावही तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



नाशिक बाह्यवळण रस्त्याच्या कामांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात आढावा घेतला. या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बाह्यवळण रस्त्यांतर्गत येणाऱ्या मार्गांची कामे प्राधान्याने हाती घेण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक विभागीय आयुक्त आणि नाशिकचे पालक सचिव यांनी प्राधान्याने सुरु करावयाच्या रस्त्यांचा आराखडा येत्या १० दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करावा. बाह्यवळण मार्ग, परिक्रमा मार्ग यांच्याबरोबरच अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे तातडीने सुरु करावीत. विमानतळ, समृद्धी महामार्ग यांना जोडणाऱ्या मार्गांची कामे युद्धपातळीवर सुरु करा. तसेच शहरातील आवश्यक रस्त्यांची कामे देखील महापालिकेमार्फत नगर नियोजन अंतर्गत घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गाने भाविक येण्याची शक्यता आहे. त्या मार्गातील रस्त्यांचे बळकटीकरण करण्यासह त्या रस्त्यांवर वाहनतळांची सुविधा निर्माण करावी. नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्ताव तयार करा. नाशिकमधील रहदारीचे योग्य नियोजन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करा, असे निर्देशही मुख्यमंत्री त्यांनी दिले.

नाशिक बाह्यवळण मार्गातील १३७ किलोमीटरचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ग्रीनफील्ड अलाईनमेंटद्वारे उभारण्यात येणार आहेत. जुन्या नाशिक-मुंबई महामार्गापासून पुढील ६९ किलोमीटरचा मार्ग हा 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'मार्फत बांधण्यात येणार आहे. यातील ४१ किलोमीटरचे रस्ते महापालिका हद्दीबाहेरून जातात. या रस्त्यांसाठी ४० गावांमधील ५०० हेक्टरचे भूसंपादन करावे लागणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते.

# समर्पित भावनेने काम करा; पक्ष तुम्हाला नक्कीच संधी देईल : आमदार देवेंद्र कोठे यांची ग्वाही

### अक्षय अंजीखाने, नागेश सरगम, नागेश खरात यांचा केला सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

भाजप कार्यकर्त्यांनी समर्पितपणे काम करावे. जुन्या-नवीन कार्यकर्त्यांची सांगड घालून त्यांना न्याय द्यायचे काम पक्ष निश्चितच करेल, अशी ग्वाही शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोमवारी दिली.

भारतीय जनता पक्ष शहर कार्यालयात मंडल अध्यक्ष नियुक्ती जाहीर कार्यक्रमात ते बोलत होते. प्रदेश भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदारसंघातील मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. याअंतर्गत भारतीय जनता पक्ष शहर कार्यालयात सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मंडल अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली. आमदार देवेंद्र कोठे, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही नावे जाहीर करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी शहर मध्य मतदार संघात मध्य पूर्व मंडल अध्यक्षपदी अक्षय अंजीखाने, मध्य मध्य मंडल अध्यक्षपदी नागेश सरगम तर मध्य पश्चिम मंडल अध्यक्षपदी नागेश खरात यांची पक्षाने नियुक्ती केल्याचे जाहीर केले. यावेळी या तीनही नूतन अध्यक्षांचा आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी पुढे बोलताना आमदार देवेंद्र कोठे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा केवळ भारतातच नव्हे जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. देशभरात सुरू असलेल्या भाजपच्या संघटन पर्व अंतर्गत महाराष्ट्रात दीड कोटी प्राथमिक सदस्य करण्यात आले. सोलापूर शहर मध्य मतदारसंघात संघटन पर्व अंतर्गत पहिल्या टप्प्यात प्राथमिक सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले. दुसऱ्या टप्प्यात सक्रिय सदस्य नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाली आणि तिसऱ्या टप्प्यात मंडल अध्यक्ष नियुक्त करण्यात आले. ही अध्यक्ष निवड प्रक्रिया अतिशय प्रेरणादायी म्हणावी लागेल. कारण या पक्षात रचना, प्रक्रियेला महत्त्व आहे.

शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू यांनीही आपले विचार मांडले. या कार्यक्रमास भाजपचे सरचिटणीस विशाल गायकवाड, संघटन पर्व निवडणूक अधिकारी श्रीनिवास करली, माजी सभागृह नेते देवेंद्र भंडारे, प्रशांत फत्तेपुरकर, प्रवीण दर्गोपाटील, कार्यालय प्रभारी अनिल कंदलगी, शहर चिटणीस बजरंग कुलकर्णी, जेम्स जंगम, माजी नगरसेवक अनिल पल्ली,मेघनाथ येमुल, राजकुमार हंचाटे, राजेश अनगिरे, माजी नगरसेविका रामेश्वरी बिरू, मीनाक्षी कंपली, महिला मोर्चाचे संगीता खंदारे, अंजली वलसा,शर्वरी रानडे, जैन प्रकोष्ठेचे एड . साधना संगवे, व्यंकटेश कोंडी, दत्तात्रय पोसा, आनंद बिरू, रामदास मगर, अंबादास (बाबा) करगुळे, शिक्षक आघाडीचे दत्तात्रय पाटील सर, मा. जिल्हा नियोजन समिती सदस्य अशोक दुस्सा, डउ मोर्चा प्रदेश सचिव राजाभाऊ माने, भटक्या विमुक्त जाती मोर्चाचे लक्ष्मण गायकवाड, डउमोर्चा मोर्चा शहराध्यक्ष मारेप्पा कंपेली, अनंत गोडलोलू, महेश बनसोडे, क्रीडा प्रकोष्टचे यशवंत पाथरूट, जइउ मोर्चा उपाध्यक्ष श्रीनिवास जोगी, विजय महिंद्रकर, प्रशांत पल्ली, सिद्धेश्वर कमटम, महेश अलकुंटे, मनोज कलशेट्टी, राम गड्डम, सोशल मीडियाचे अभिषेक चिंता, अंबादास सकीनाल, किरण भंडारी, अप्पू कडगंची, शिरीष गायकवाड, इजाज सय्यद, रवी भवानी, रमेश पतंगे, नरेश पतंगे, राजशेखर येमुल, बाबुराव शिरसागर, मनोज पिस्के, सतीश तमशेट्टी, विशाल धोत्रे, विजय धोत्रे, प्रकाश गाजुल, गोविंद बत्तुल, रमेश मिट्ठा, ज्ञानेश्वर गवते आदी उपस्थित होते.

# आरोपी महिलेचा जबाब व फिर्यादीतील विसंगती तपासणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

मेंदूविकार तज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणात ताब्यात घेतलेल्या महिला आरोपीने दिलेली माहिती आंणि फिर्यादीने दिलेली फिर्याद यातील विसंगती तपासणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



एस. पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक तथा प्रसिध्द मेंदू विकारतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटक केलेल्या त्यांच्याच हॉस्पिटलमधील महिला कर्मचाऱ्याची पोलिसांनी कसून चौकशी सुरु केली आहे.

मनीषा महेश मुसळे ऊर्फ मनीषा माने (वय ४५, रा. बसवराज नेलेनगर, जुळे सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. मुसळे हिने तिचे अधिकार कापले आहेत. पगार कमी केला आहे, मी दोन्ही मुलांना मारणार आणि येथे हॉस्पिटलमध्ये येऊन पेटवून घेणार आणि त्याला सर्वस्वी जबाबदार राहाल, असा धमकी दिलेला ईमेल डॉक्टरांना पाठवला होता. त्यांच्या या खोट्या आरोपामुळे डॉ. शिरीष वळसंगकर हे व्यथित झाले होते. त्या धमकीवजा पत्रामुळे डॉ. शिरीष वळसंगकर यांनी तिच्या त्रासाला कंटाळून पिस्तूलने गोळी झाडून आत्महत्या केली होती. त्यानंतर पोलिसांनी मुसळे हिला अटक केली. तिला रविवारी सुटीच्या न्यायालयात हजर केल्यानंतर तिला तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली. पोलिसांनी आरोपी मुसळे हिची सोमवारी कसून चौकशी केली. तिच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित व्यक्तींकडे पोलीस तपास करणार आहेत. डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या मोबाइलचा सीडीआर मागविण्यात आला असून त्यांनी शेवटचा फोन कोणाला केला याबाबत तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### मुसळेकडे पोलिसांची कसून चौकशी


डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेली चिठ्ठी पोलिसांनी जप्त केली असून ती हस्ताक्षर तज्ज्ञांकडे तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्या पिस्तूलमधून गोळी झाडून डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या केली, ती पिस्तूल, गोळी व पुंगळी बॅलेस्टीक अहवालासाठी पाठविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शवविच्छेदनानंतरचा व्हिसेरा राखून ठेवला असून तो ही तपासणीसाठी पुणे येथे प्रयोगशाळेत आज पाठवून दिला आहे.

# स्वत्व जपले तरच कुटुंब व्यवस्था टिकेल

### केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांचे प्रतिपादन

**पुणे, दि. २१ एप्रिल-**

''आपण आपले स्वत्व विसरलो त्यामुळे कुटुंब व्यवस्था धोक्यात आली आहे, येणाऱ्या पिढीला संस्कारित करण्याची जबाबदारी ही कुटुंबप्रमुखांची आहे आपले स्वत्व जपून, स्व जागरण करून आपण कुटुंब व्यवस्था मजबूत केली पाहिजे'', असे प्रतिपादन केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी केले. ते निगडी प्राधिकरण येथील सी.एम. एस. शाळेत आयोजित कुटुंब संगम कार्यक्रमात बोलत होते.



**पंतप्रधानांचे युवा पिढीवर लक्ष**

विकसित भारताचे लक्ष साध्य करण्यासाठी भक्कम समाजाभिमुख कुटुंब उभे करणे व त्यातील युवा पिढी कडे लक्ष देऊन नशामुक्त सशक्त युवक घडविण्याचे आवाहन पंतप्रधानांनी केल्याचा उल्लेख राज्यपालांनी केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एस.एन.जी.सी चे महासचिव सी.पी.राजू, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी सिंबोईसिस इन्स्टिट्यूट ऑफ आय टीचे संचालक डॉ. धन्या प्रमोद, नवोदयाचे अध्यक्ष डॉ.बिजू पिल्लई, टी.पी. विजयन प्रामुख्याने उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले ''पूर्वी एकत्रित कुटुंब पद्धती होती. त्यामुळे नकळत संस्कार होते होते. कालांतराने परिस्थिती बदलली. त्यामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. परिवर्तनआधी माझ्यात झाले पाहिजे मग कुटुंबात आदर्श व्यवहार होतील. शिक्षण पद्धतीत बाहेरील आक्रमणे झाले. त्यामुळे संस्कार कमी झाले. केवळ मेकॉलेला दोष देऊन उपयोग नाही तर आमचाही तेवढाच दोष आहे. कारण आम्ही स्वत्व विसरलो त्याचे पुनर्जीवन झाले पाहिजे.'' लर्निंग इंग्लिश ऐवजी लर्निंग ईन इंग्लिश झाले. त्यामुळे भाव, विश्व बिघडले, पिढी नशेच्या अधिन झाली आहे. त्यांचेकडे लक्ष दिले पाहिजे,. वसुधैव कुटुंबमचा उल्लेख करून कुटुंबाने संस्कार व मानवता जपली पाहिजे, असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी मुकुंद कुलकर्णी यांनी प्रत्येक कुटुंबाने एकत्रित भोजन केले पाहिजे व राष्ट्रीयतेची भावना जपण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. बिजू पिल्लई यांनी तर आभार उन्नीकृष्णन यांनी मानले. कार्यक्रमापूर्वी सांस्कृतिक कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, शाळेतील पालक, परिसरातील कुटुंब, आजी माजी लोकप्रतिनिधी यांनी उपस्थिती लावली.

# अवमानना याचिकेसाठी परवानगीची गरज नाही

### भाजप खासदार दुबेंचे टीका प्रकरण

**नवी दिल्ली, २१ एप्रिल**

भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी सरन्यायाधिशांवर टीका केली होती. याप्रकरणी अवमान याचिका दाखल करण्यासाठी आमच्या परवानगीची गरज नाही, असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायालयाने याचिकाकर्त्याला सांगितले. न्यायमूर्ती बी.आर. गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपिठासमोर हे प्रकरण आले होते. खासदार दुबे यांच्याविरोधात अवमान याचिका दाखल करण्यासाठी न्यायालयाची परवानगी हवी आहे, असे याचिकाकर्त्यांने म्हटले होते. यावर तुम्ही याचिका दाखल करा, आमच्या परवानगीची गरज नाही, असे न्यायमूर्ती गवई यांनी सांगितले. याप्रकरणी परवानगी हवी असल्यास ॲटर्नी जनरल यांची मागावी, असेही खंडपिठाने म्हटले आहे. वक्फ कायद्यातील दोन तरतुदींना सर्वोच्च न्यायालयाने तात्पूरती स्थगिती दिल्यानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी सरन्यायाधीशांवर टीका करताना देशातील गृहयुद्धाला ते जबाबदार असल्याचे म्हटले. तसेच सर्वोच्च न्यायालयालाच जर कायदे करायचे असतील तर संसद बंद करा, असेही दुबे म्हणाले होते.

## अग्रलेख...

# भगीरथाचे आम्ही वंशज...

उन्हाळा सुरू झाला की देशात तसेच राज्यातही पाणीटंचाईची समस्या उग्र रूप धारण करते. पाण्यासाठी लोकांची विशेषत: महिलांची पायपीट सुरू होते. दुर्गम आणि ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या तशीही तीव्र असते. गेल्या काही वर्षांत त्याची झळ शहरी भागांतही बसू लागली आहे. यावर्षी संपूर्ण राज्याला पाणीटंचाईच्या समस्येला सामोर जावे लागेल, असे दिसते आहे. एप्रिल महिनाही संपला नसताना राज्यातील धरणातील पाणीसाठा ३८ टक्क्यांवर आला आहे. पूर्ण मे महिना अजून बाकी आहे. त्यामुळे मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात काय होणार याचा विचार अंगावर काटा आणतो आहे.

विदर्भात तर सूर्य आग ओकू लागला आहे. आताच विदर्भातील अनेक शहरांतील तापमान ४५ अंशांवर गेले आहे. सूर्य हा आगीचा गोळा झाला आहे. मे महिन्यात तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. उन्ह जेवढे तापेल, तेवढी सर्वच क्षेत्रांत पाण्याची गरज वाढत असते. एरवी एक वेळा अंघोळ करणाऱ्याला उन्हाळ्यात दोन वेळा अंघोळ करायची इच्छा असते, नव्हे परिस्थितीचीच तशी गरज असते. उन्हाळ्यात आगी लागण्याच्या घटनाही वाढत असतात, आग विझवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज भासत असते. पण नेमका उन्हाळ्यातच जनतेला पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. वाढती उष्णता आणि पाणीटंचाईमुळे जनतेच्या तोंडचे पाणीही पळून जाते. पाण्याचे महत्त्व उन्हाळ्यातच आमच्या लक्षात येते, पण तोपर्यंत वेळ निघून गेली असते. महाराष्ट्रात सहा महसूल विभाग आहेत. त्यापैकी पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या तीन महसूल विभागांत धरणातील पाणीसाठा आताच ४० टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे. पुणे विभागातील पाणीसाठा तर राज्यात सर्वांत कमी आहे. पाण्याच्या टंचाईमुळे दैनंदिन जीवनात लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मराठवाड्यात तर दहा-बारा दिवसांत एकदा नळ येतो, अकोल्यात पाणी चोरी जाऊ नये म्हणून लोकांनी टाक्याला कुलपेही लावली आहेत, असे म्हणतात. माणसालाच जर प्यायला पाणी मिळत नसेल तर पशुपक्ष्यांचे काय हाल होत असतील, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. विशेष म्हणजे पाणीटंचाईची समस्या ही फक्त महाराष्ट्रात आणि भारतातच नाही तर संपूर्ण जगात आहे. म्हणजे ही जागतिक समस्या झाली आहे. तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यासाठी होईल, असे म्हटले जाते. ही अतिशयोक्ती नाही तर वस्तुस्थिती आहे. पाण्याचे महत्त्व आम्ही आताच ओळखले नाही आणि पाणी वाचवणे तसेच त्याचा जपून आणि काटकसरीने वापर करणे सुरू केले नाही, तर पाण्यासाठी होणारे तिसरे महायुद्ध आमच्या घराच्या उंबरठ्यापर्यंत यायला फारसा वेळ लागणार नाही.

जगातील तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. जगाच्या अनेक भागांत उष्णतेच्या लाटा सुरू झाल्या आहे. याचे कारण पृथ्वीचे तापमान वाढत आहे. पृथ्वीचे तापमान वाढल्यामुळे अंटार्टिकावरील बर्फ वितळू लागला आहे. यामुळे दुहेरी समस्या उदभवत आहे. पहिली म्हणजे तापमान वाढल्यामुळे त्याचा प्रतिकूल परिणाम जसा होत आहे, तसेच अंटार्टिकावरील बर्फ वितळू लागल्यामुळे समुद्रातील पाण्याची पातळीही वाढत आहे. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरच्या शहरांना असलेला धोका वाढला आहे. येत्या पन्नास-शंभर वर्षांत समुद्र किनाऱ्यावरील अनेक शहरांना जलसमाधी मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे, ती उगीच नाही.

पाणीटंचाईच्या समस्येचा आम्हाला समग्र आणि व्यापक विचार करावा लागणार आहे. आजच आमचे डोळे उघडले नाही तर येणारा काळ आमच्यासाठी मोठे संकट घेऊन येणार आहे, आमचे भविष्य अंधकारमय करणार आहे. पाणी वाचवा आणि पाण्याचा जपून वापर करा, असे अभियान आम्हाला राबवावे लागणार आहे. पाणी मुबलक आहे, म्हणून लोक पाण्याचा अपव्यय करतात, नको त्या गोष्टीसाठी पाण्याचा दुरुपयोग केला जातो. त्यामुळे पाण्याची उधळपट्टी आम्ही टाळली पाहिजे. पाणी वाचवा अभियान फक्त दैनिकातील छायाचित्रासाठी म्हणजे प्रसिद्धीसाठी राहणार नाही, याची काळजीही आम्हाला घ्यावी लागेल. आम्ही पाणी वाचवले नाही तर पाणी आम्हाला वाचवणार नाही, हे आम्ही लक्षात ठेवले पाहिजे. कारण पाणी आमचे भविष्य आहे. पाणी नसले तर जगात काहीच होऊ शकणार नाही. देशातील असो वा जगातील कोणताही विकास हा पाण्यावर अवलबूंन असतो.

पाऊस आला नाही तर आम्हाला प्यायला पाणी मिळणार नाही, शेतीत अन्नधान्य, भाजी फळफळावळे पिकू शकणार नाहीत. म्हणजे आम्हाला प्यायला पाणी तसेच खायला अन्नही मिळणार नाही. पाणी आणि अन्न मिळाले नाही तर आम्ही जगू तरी कसे. माणूस जगला तरच विकासाचा मुद्दा उद्भवेल, माणूसच नसेल तर विकासाचा मुद्दाच उद्भवणार नाही. ही थोडी अतिशयोक्ती वाटत असली तरी ती वस्तुस्थिती आहे. जगातील तापमान हळूहळू वाढत आहे. पंचवीस तीस वर्षांपूर्वी आजच्या एवढे तापत नव्हते. तापमान ३५ अंशांच्या वर जात नव्हते. आता मात्र तापमान पन्नाशी ओलांडत आहे. गेल्या काही वर्षांत जगातील उष्ण दिवसांची संख्या वाढत आहे, उष्णतेच्या लाटांचे (हिट वेव्ह) प्रमाण वाढले आहे. सरासरीपेक्षा तापमान ४ अंशांनी वाढले आणि हे तापमान सलग तीन दिवस कायम राहिले तर त्याला उष्णतेची लाट मानले जाते. अशा उष्णतेच्या लाटांचे प्रमाण गेल्या वर्षांत धोकादायकपणे वाढले आहे. गेल्या काही वर्षांत वातावरणातील हा बदल कशामुळे झाला, याचा विचार आम्हाला करावा लागणार आहे. पाण्याचे महत्त्व लोकांना पटवून द्यावे लागणार आहे.

राजकीय पक्षांनीही याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. पाणीटंचाईमुळे महानगरपालिकांसमोर माठ फोडले आणि दैनिकात छापून आलेले आपले छायाचित्र पाहिले म्हणजे राजकीय नेत्यांना आपले जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटते. पण त्याने मूळ समस्या सुटत नाही, लोकांनाही न्याय मिळत नाही. राज्याच्या अनेक भागांत पाणीटंचाईची समस्या हे टँकरलॉबीसाठी मोठे कुरण आहे. पाणीटंचाईची समस्या जेवढी मोठी तेवढी टँकरवाल्यांची चांदी असते. पाणीटंचाईमुळे त्याच्या घरात पाणी धो धो येत नसले तरी पैसा मात्र धो धो येत असतो. त्यामुळे काही मूठभर टँकरचालक, सरकारी अधिकारी आणि राजकीय नेत्यांसाठी पाणीटंचाई ही हवीहवीशी आहे. मात्र सर्वसामान्य जनतेच्या तसेच शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी पाणीटंचाईच्या कारणांचा शोध घेत त्या कारणांचे कायमस्वरूपी निराकरण करण्याची गरज आहे. त्यासाठी पावसाचे प्रमाण वाढवावे लागणार आहे. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात होणारी वृक्षतोड हे पाऊस कमी पडण्याचे एक कारण आहे. पाऊस पडला तर त्याचे पाणी वाहात जाते, पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची गरज आहे. मध्यंतरी शासनाची पाणी अडवा पाणी जिरवा अशी मोहीम होती. पण या मोहिमेने पाणी किती अडले आणि जिरले हे माहिती नाही, पण शासनाचा पैसा काही मूठभर नेत्यांच्या आणि ठेकेदारांच्या घरात नक्की जिरला होता.

आमच्या देशात जेवढा पाऊस पडतो, त्याच्या काही टक्केच पाऊस इस्रायलसारख्या देशात पडतो. पण त्या देशाने पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब वाचवला आहे. कमीतकमी पाण्याचा वापर करत इस्त्रायलला नंदनवन बनवले आहे. आमच्यापेक्षा त्यांच्याकडची शेती आणि बगिचे अतिशय देखणे आहेत. डोळ्यांचे पारणे फेडणारे आहे. कारण त्या देशातील जनतेला पाण्याचे महत्त्व कळले आहे. आमच्या देशात अति तेथे मातीची लोकांची मानसिकता झाली आहे. अजूनही वेळ गेली नाही. पाणीटंचाईच्या या संकटाचा आम्ही सामना करू शकतो, या संकटावर मात करू शकतो. आम्ही आजपासून कामाला लागलो तर धरणातील पाणीसाठा उद्यापर्यंत निश्चित वाढवू शकतो. पण त्यासाठी प्रामाणिक आणि दृढ इच्छाशक्तीची गरज आहे. मनात आणले तर आमच्यासाठी अशक्य असे काही काही नाही. गंगेचा प्रवाह अथक प्रयत्नाने वळवून भारतात आणणाऱ्या भगीरथाचेच आम्ही वंशज आहोत, याचा विसर कोणी पडू देऊ नये.

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश-पाकमध्ये भरपाईचा मुद्दा कळीचा

**प्रा. जयसिंग यादव**

बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये परराष्ट्र सचिव स्तरावरील बैठका नियमितपणे होत होत्या; मात्र या वेळी तब्बल १५ वर्षांनी ही बैठक झाली. पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी बांगलादेशची राजधानी ढाका येथे बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन यांच्याशी औपचारिक बैठक घेतली. याशिवाय त्यांनी परराष्ट्र व्यवहार सल्लागार आणि मुख्य सल्लागार यांच्याही स्वतंत्र बैठका घेतल्या. उभय देशांमधील संबंधांचा नवा अध्याय सुरू झाल्यानंतर पहिल्या औपचारिक चर्चेत त्यांच्यातील न सोडवलेल्या ऐतिहासिक मुद्यांवर चर्चा झाली, तर परस्परसंबंध दृढ करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही चर्चा झाली. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांनी सांगितले की, बांगलादेशने स्वातंत्र्यपूर्व काळातील कृत्यांची भरपाई म्हणून पाकिस्तानकडून ४.३२ अब्ज डॉलर्स म्हणजेच ३६ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. आमना बलोचसोबतची बैठक आटोपल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. १९७१ मध्ये दोन्ही देश एक असतानाच्या संयुक्त मालमत्तेतून पाकिस्तानने बांगलादेशला ही रक्कम दिली पाहिजे, असे बांगलादेशने या बैठकीमध्ये सांगितले. यासोबतच ते म्हणाले की, १९७० मध्ये आलेल्या चक्रीवादळाच्या वेळी बांगलादेशला (तत्कालीन पूर्व पाकिस्तान) मदत करण्यासाठी मिळालेले २०० दशलक्ष डॉलर (सुमारे २४०० कोटी रुपये) पाकिस्तानने द्यावेत. दुसरीकडे, स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या आकडेवारीनुसार या महिन्याच्या चार तारखेला पाकिस्तानचा परकीय चलन साठा १५.७५ अब्ज होता. याचा अर्थ बांगलादेशची मागणी पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानला आपल्या परकीय चलनाच्या गंगाजळीच्या एक चतुर्थांशपेक्षा जास्त रक्कम खर्च करावी लागेल.

याशिवाय बांगलादेशने १९७१ च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला; मात्र पाकिस्तानने या मुद्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही. जवळपास दीड दशकानंतर परराष्ट्र सचिव स्तरावर होणाऱ्या या बैठकीकडे अनेकांच्या नजरा खिळल्या होत्या; मात्र बांगलादेश आणि पाकिस्तानचे संबंध कधीच थेट राहिले नाहीत. अवामी लीग सरकारच्या गेल्या तीन टर्ममध्ये ते रसातळाला पोहोचले होते. गेल्या वर्षी ५ ऑगस्ट रोजी अवामी लीग सरकारला सत्तेतून काढून टाकल्यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संबंधांचे नूतनीकरण करण्याचे प्रयत्न दिसून आले. ही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांनी ढाका गाठले होते. बांगलादेशच्या स्वातंत्र्याचा इतिहास पूर्व पाकिस्तान काळापासून बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांशी अतूट जोडलेला आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतरही दोन्ही देशांच्या अंतर्गत राजकारणात आणि



द्विपक्षीय मुत्सद्देगिरीमध्ये हा इतिहास वारंवार चर्चिला गेला आहे. परराष्ट्र सचिव स्तरावरील ताज्या बैठकीत बांगलादेशने उभय देशांमधील परस्परसंबंध अधिक दृढ करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे.

यावेळी बांगलादेशचे परराष्ट्र सचिव मोहम्मद जशीमुद्दीन म्हणाले की, बैठकीदरम्यान अविभक्त मालमत्तेचे समान विभाजन, येथे अडकलेल्या पाकिस्तानींचे प्रत्यार्पण, १९७० च्या चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी परदेशातून आलेल्या मदतीचे पैसे देणे आणि १९७१ मध्ये तत्कालीन पाकिस्तानी सैन्याने केलेल्या सामूहिक हत्याकांडासाठी जाहीर माफी या मुद्यांवर चर्चा झाली. मोहम्मद जशीमुद्दीन पुढे म्हणाले, मी परराष्ट्र सचिवांसोबतच्या बैठकीत या आकडेवारीचा उल्लेख केला. बांगलादेशमध्ये अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांना पर्याय दिल्यास काहींना बांगलादेशमध्ये राहायचे आहे तर काहींना पाकिस्तानमध्ये परतायचे आहे. अशा प्रकारे देशात अडकलेल्या पाकिस्तानी नागरिकांची संख्या सुमारे ३.२५ लाख आहे. जशीमुद्दीन यांच्या म्हणण्यानुसार, या न सुटलेल्या मुद्यांवर चर्चा सुरू ठेवण्याचे आश्वासन पाकिस्तानने दिले आहे. बांगलादेश आता भारताऐवजी पाकिस्तानकडे झुकत आहे का, या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले की, सद्य:स्थितीमध्ये पाकिस्तानसोबतच्या बांगलादेशच्या संबंधांचा पाया मजबूत करण्यासाठी न सुटलेले प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशदरम्यान थेट विमानसेवा सुरू झाल्याचा उल्लेख करताना ते म्हणाले की, एका देशातील लोक दुसऱ्या देशात गेले तर त्याला सबमिशन म्हणता येणार नाही. एकमेकांचा आदर आणि परस्परहित हाच पाकिस्तानसोबतच्या आमच्या संबंधांचा आधार आहे. आम्ही यामध्ये आमचे फायदेशीर पैलू पाहात आहोत. आपली भूमिका स्पष्ट करणे आणि त्यासोबत पुढे जाणे हे मुत्सद्देगिरीचे काम आहे. या मुद्यांवर भविष्यात चर्चा सुरू ठेवू इच्छित असल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे.

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी व्यापाराच्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी पाकिस्तानशी संबंध अधिक दृढ करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. युनूस यांनी 'नॅशनल गेस्ट हाऊस'मध्ये पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिव आमना बलोच यांच्याशी झालेल्या भेटीदरम्यान हे आवाहन केले. युनूस म्हणाले, काही अडथळे नक्कीच आहेत; पण आम्हाला त्यावर मात करून पुढे जाण्याचे मार्ग शोधावे लागतील. दुसरीकडे आमना बलोच म्हणाल्या, बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यातील व्यवहारांच्या शक्यतांचा फायदा घेण्यासाठी मार्ग शोधावे लागतील. आमच्याकडे खूप मोठी प्रादेशिक बाजारपेठ आहे. आम्ही त्याचा पुरेपूर वापर केला पाहिजे. आम्ही प्रत्येक वेळी ही संधी सोडू शकत नाही. बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांची बैठक ढाका येथे झाली. ही बैठक १५ वर्षांनी झाली. बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या माध्यमांमध्ये या भेटीबाबत बरेच काही बोलले जात आहे. बहुतांश बांगलादेशी वृत्तपत्रांनी याबाबतच्या बातम्यांना प्रसिद्धी दिली आहे.

पाकिस्तानमधील प्रमुख वृत्तपत्र असलेल्या 'द डेली स्टार'ने लिहिले आहे की, १९७१ पूर्वीची पाकिस्तानची भूमिका बांगलादेशींसाठी वेदनादायक होती. दोन्ही देशांमध्ये वास्तविक आणि प्रभावी नातेसंबंध निर्माण करण्यात हा अडथळा आहे. पाकिस्तानी सैन्याने मारलेले नागरिक आणि बांगलादेशच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात कराव्या लागलेल्या दडपशाही आणि क्रूरतेचा सामना ही ऐतिहासिक नोंद आहे. बांगलादेशसाठी औपचारिक माफी किंवा नुकसानभरपाई हा बदला नाही, तर ऐतिहासिक शोकांतिका आहे, हे मान्य करून खऱ्या सलोख्याच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. यात गुंतागुंत आहे आणि त्यासाठी विचारपूर्वक पावले उचलली पाहिजेत. या वृत्तपत्राने पाकिस्तानने माफी मागावी या मागणीचे समर्थन केले असून अशा समस्या असतानाही बांगलादेशने पाकिस्तानसोबतचे संबंध सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे म्हटले आहे.

'डेली सन'च्या वृत्तानुसार, दोन नेत्यांच्या भेटीनंतरच्या संयुक्त निवेदनात, काश्मीरचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. यामध्ये पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांच्या आधारे काश्मीर प्रश्न सोडवण्याबाबत भाष्य केले. बांगलादेशने १९७१ च्या मुक्तिसंग्रामात पाकिस्तानने केलेल्या अत्याचाराबद्दल औपचारिक माफी मागण्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित केला गेला; मात्र पाकिस्तानने या मुद्यावर जाहीरपणे काहीही सांगितले नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# जीवनशैली बदला, वसुंधरेला वाचवा

**नितीन शिरसाट**

बदलत्या जीवनशैलीमुळे संपूर्ण वसुंधरेची प्रकृती ढासळत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अमर्याद प्लॅस्टिकचा वापर, कचरा, घाणीचे साम्राज्य या कारणांनी वसुंधरेचा श्वास गुदमरला आहे. पर्यावरणाचे संवर्धन करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी आणि संस्कृती आहे. सध्या दररोजच्या वापरात प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर वाढला आहे. दुधाची पिशवी, किराणा, फळभाजी विक्रेते, प्रत्येक लहान मोठे व्यापारी सर्रासपणे प्लॅस्टिकचा वापर करीत असतात. या पिशव्या सांडपाण्याच्या नाल्यात अडकल्याने पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी डास व दुर्गंधीने मलेरिया, डेंग्यूसारखे आजार होऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते. आर्थिक, शारीरिक नुकसान होऊन शासनाचा दरवर्षी स्वच्छता अभियानावर फार मोठा खर्च होतो. प्लॅस्टिकवर बंदी असताना सुद्धा प्रत्येक जण बाजारात जाताना आपल्याजवळ कापडी पिशवी न ठेवता विक्रेत्याकडून प्लॅस्टिक पिशवी घेतात. पूर्वी दूध, दही, ताकासाठी स्टीलचे भांडे सोबत घेऊन जाणारे, हातात कापडी पिशवी घेऊन जाणाऱ्यांची संख्या मोठी होती. आता आधुनिक युगात सर्वत्र झटपट झाल्याने त्याचा समाजजीवनावर दुष्परिणाम झालेला दिसतो. प्रत्येक जण आपल्या सोयीनुसार वागतो व आपल्या परिवाराला संकटात टाकतो. संशोधनाच्या मते, मानवाला होणाऱ्या वेगवेगळ्या आजारांना प्लॅस्टिक दुर्गंधी कारणीभूत ठरत आहे. वृक्षतोडीने पर्यावरण संवर्धनाचा मोठा ऱ्हास होत आहे. शहर व ग्रामीण भागांना जोडणारे दुपदरी, चारपदरी रस्ते, धरण प्रकल्पाच्या बांधकामात अडथळे निर्माण करणाऱ्या वृक्षांची कटाई झाल्यानंतर त्या ठिकाणी वृक्षारोपणाची तात्पुरती कामे होतात. परंतु भविष्यात या वृक्षाची वाढ होते की नाही, निसर्गाचा समतोल राखला जातो की नाही याची जबाबदारी कोण घेणार, या प्रश्नाचे कोणीही उत्तर देत नाही. विकास कामासाठी वृक्षतोड केल्याने जंगल नष्ट होत चालले आहे. त्यामुळे तापमानात कमालीची वाढ होऊन त्याचे चटके सर्वांना बसू लागले आहेत. जितकी झाडे तोडली जातात, त्याच प्रमाणात वृक्षलागवड होत नाही. सामाजिक वनीकरण विभाग, राष्ट्रीय हरित सेना, पर्यावरणप्रेमी, माझी वसुंधरा या शासकीय व सेवाभावी संघटना सातत्याने वृक्ष संवर्धनाच्या कामात सक्रिय सहभाग घेत असतात, सातत्याने जनजागृती अभियान राबवितात. या कार्यात टाटा समूह आणि भारतीय क्रिकेट निमायक मंडळाने पुढाकार घेतला आहे.

सध्या देशभरात क्रिकेट सामने सुरू आहेत. कोट्यवधी क्रिकेटप्रेमी खेळाचा आनंद लुटताना दिसतात. हेच निमित्त साधून प्रत्येक निर्धाव चेंडू मागे देशात ५०० झाडे लावण्याचा अनोखा प्रयोग टाटा समूह सेवाभावी संस्था संघटनेच्या मदतीने बीसीसीआय राबविणार आहे. गेल्या वर्षी या वृक्षसंवर्धनाच्या उपक्रमात चार क्रिकेट संघांत झालेल्या सामन्यात निर्धाव चेंडूवर दीड लाखांवर वृक्षारोपण करण्याचा हा उपक्रम यशस्वी झाला होता. सध्या सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यातील निर्धाव चेंडूंची संख्या लक्षात घेता साडेसोळा लाखांवर विविध झाडे लावण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्र, राजस्थान व कर्नाटक या तीन राज्यांत सर्वाधिक वृक्षारोपण या माध्यमातून होणार आहे. टाटा समूह वृक्षवाढीसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांकडे ही जबाबदारी सोपविणार आहे. देशात सर्वाधिक वृक्षतोड तेलंगणा राज्यात झाली आहे. गेल्या चार-पाच वर्षांत बारा लाखांवर झाडे तोडल्याचे खुद्द वन विभागाने मान्य केले आहे. हैदराबादजवळ शंभर एकर जमिनीवर गच्चीबावली भागात झाडे बुलडोजरने तोडल्याने न्यायालयाने या प्रकरणी ताशेरे ओढले आहेत. रक्तचंदन या झाडाची अवैध कत्तल व तस्करी आंध्र प्रदेशात शेषाचलम भागात मोठ्या प्रमाणात होते. सुगंधी, वनौषधी गुणधर्म व लाकूड टिकाऊ असल्याने त्याची किंमत एक ते पाच कोटींपर्यंत जाते. सिंचन, रेल्वे, रस्ते प्रकल्प बांधकामात अनेक वृक्षांची कटाई होते. शेतकऱ्यांना भूसंपादन कायद्यानुसार जमिनीचा व वृक्षाचा मोबदला शासकीय नियमाने दिला जातो. यवतमाळ जिल्ह्यातील खर्शी गावचे शेतकरी केशव शिंदे यांची शेतजमीन वर्धा-नांदेड रेल्वे प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली. त्यांना जमिनीचा व विहिरीचा मोबदला मिळाला. परंतु शेतातील शंभर वर्षे जुने रक्तचंदन व इतर झाडांचा मोबदला नाकारण्यात आला. त्यांनी अन्यायाविरुद्ध २०१४ पासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. यावर्षी रेल्वे मंडळाने त्यांना एक कोटी रुपये अंतरिम मोबदला जमा करण्याचा आदेश दिला. हा वृक्षतोडीचा संघर्ष न्यायालयीन लढ्यातून यशस्वी झाला आहे. २२ एप्रिल या जागतिक वसुंधरा दिनाला संपूर्ण देशात सेवाभावी संस्था, शाळांमधून वृक्षसंवर्धन जनजागृती, प्लॅस्टिकमुक्त भारत अभियान राबविण्यात येणार आहे. आधुनिकीकरणामुळे आपल्याला नैसर्गिक संपत्तीचा विसर पडला आहे. वसुंधरा म्हणजे आपली आई, तिला वाचविण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपण करण्याचा संकल्प करूया.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

# मरावे परी कीर्तिरूपे उरावे...

**दत्तात्रेय आंबुलकर**

भारताचे सुपुत्र उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनानंतर नुकतेच त्यांचे इच्छापत्रही समोर आले. टाटांनी आपल्या इच्छापत्रातून त्यांची सर्वोपरी सेवा केलेल्या अगदी छोट्यातल्या छोट्या व्यक्तीला आर्थिक राशी देऊन, कर्जमाफी करून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली. त्यामुळे 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' या उक्तीचे वास्तववादी दर्शन घडविणाऱ्या रतन टाटा यांच्या इच्छापत्राच्या निमित्ताने...

प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचे अवघे जीवनकार्य सुपरिचित. सध्या त्यांच्या मरणोत्तर इच्छापत्राची चर्चा विविध माध्यमांत रंगली आहे. यामध्ये त्यांच्या विशाल औद्योगिक-व्यावसायिक साम्राज्याचा व्याप, वैयक्तिक संपत्ती व मालमत्ता यांची विचारपूर्वक व नियोजनपूर्ण वितरण-विभागणी टाटांनी केली. आयुष्यात खऱ्या अर्थाने साथसंगत देणाऱ्या सहकारी-सेवकांबद्दल जाण ठेवून, जी मानवीय भावना त्यांनी इच्छापत्रांतून व्यक्त केली, ती अनेक कार्यांनी बेजोड व अनुकरणीय ठरावी. नुकत्याच जाहीर झालेल्या रतन टाटा यांच्या इच्छापत्राचा मागोवा घेणे म्हणूनच क्रमप्राप्त ठरावे. प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार, रतन टाटा यांनी त्यांचे इच्छापत्र सर्वप्रथम लिहिले होते ते १८ एप्रिल १९९६ रोजी. त्यानंतर सुमारे पाच वर्षांनी म्हणजेच टाटा उद्योग समूहाचे अध्यक्ष झाल्यावर या इच्छापत्रात काही बदल व सुधारणा त्यांनी केल्या. त्यानंतर या दोन्ही इच्छापत्रांना संयुक्त स्वरूप देऊन रतन टाटा यांनी आपले अंतिम इच्छापत्र तयार केले ते २३ फेब्रुवारी २०२२ रोजी व त्याचाच तपशील आता जाहीर करण्यात आला आहे.

यासंदर्भात थोडक्यात व महत्त्वाचे म्हणजे, रतन टाटा यांनी आपल्या एकूण संपत्तीच्या रकमेपैकी साडेतीन कोटी रुपये त्यांच्या कार्यालयीन कर्मचारी व वैयक्तिक, घरगुती कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यासाठी आवर्जून राखून ठेवले. यामध्ये रतन टाटा यांनी त्यांच्या वाहनाची साफसफाई करणारे, कार्यालयीन कामकाज करणारे सहायक, शिपाई इत्यादी सर्व स्तरांवरील कर्मचाऱ्यांचा आवर्जून समावेश तर केलाच; त्याशिवाय या मंडळींना त्यांनी दिलेल्या कर्जाऊ, उसन्या रकमेची संपूर्णपणे माफीसुद्धा दिली, हे विशेष! रतन टाटा यांनी त्यांच्या इच्छापत्रात नमूद केल्यानुसार, त्यांच्याकडे घरगुती स्वरूपाची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १५ लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये या घरगुती कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधीचा विचार करण्याची सूचना देण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या घरी विविध प्रकारची आपत्कालीन सेवा देणाऱ्या कामगारांना एक लाख रुपये मिळणार आहेत. इच्छापत्रात नमूद केल्यानुसार, रतन टाटा यांच्याकडे असणाऱ्या व ते वापरात असणाऱ्या विशेष दर्जाच्या व महागड्या कपड्यांसह नित्योपयोगातील वापरत्या येण्याजोग्या वस्तू व उपकरणे गरीब व गरजू लोकांमध्ये संबंधित समाजसेवी संस्थेच्या माध्यमातून वितरित केली जाणार आहेत. रतन टाटा यांनी त्यांच्या घरी स्वयंपाकी म्हणून काम करणाऱ्या राजन शौ याला एक कोटी रुपये देण्याची तरतूद केली असून यामध्ये त्यांना टाटा यांनी दिलेल्या ५१ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा समावेश आहे. याशिवाय त्यांना भोजनसेवा देणाऱ्या सुभाशीष कोनार यांना ३६ लाखांच्या कर्जमाफीसह ६६ लाख रुपये देण्याची तरतूद रतन टाटांनी आपल्या इच्छापत्रात व्यक्त केली आहे. यावरून रतन टाटांची त्यांच्या घरी व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाबद्दल आपल्या मरणोत्तर असणारी कणव आणि जाणीव स्पष्ट होते. कार्यालयीन सहकाऱ्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, रतन टाटांनी त्यांच्या इच्छापत्रात सचिव दिलनाझ ग्लॅझर यांच्यासाठी १० लाख लिहून ठेवले. त्यांचे विशेष सहायक शंतनू नायडू यांना कॉर्नेल विद्यापीठातून एमबीएचे उच्च शिक्षण घेण्यासाठी दिलेली एक कोटींची रक्कमही माफ केली आहे. याशिवाय रतन टाटा यांनी त्यांचा वाहनचालक असणाऱ्या राजू लिऑन यांची १८ लाख रुपयांची कर्जमाफी करून, त्याशिवाय आपल्या वाहनचालकाला १५ लाख रुपये देऊ केले आहेत.

वरील रकमा व विशेषतः त्यातील कर्जमाफीच्या संदर्भात आपल्या २३ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या इच्छापत्रानुसार, आपल्या इच्छापत्राची अंमलबजावणी करणाऱ्या विश्वस्त व विश्वासू संबंधितांना स्पष्टपणे निर्देश दिले आहेत की, त्यांच्या अंतिम इच्छांप्रमाणेच विशेषतः त्यांनी नमूद केलेल्या सहकाऱ्यांच्या कर्जमाफीच्या निर्देशांची कसोशीने अंमलबजावणी केली जावी. एवढेच नव्हे, तर, "माझ्या सहकाऱ्यांसाठी मी प्रस्तावित केलेली कर्जमाफी ही कुठल्याही प्रकारे मेहेरबानी न समजता, माझ्यातर्फे माझ्या या सहकाऱ्यांसाठी देण्यात आलेली माझी सदिच्छा भेटच समजावी," असे स्पष्ट निर्देश रतन टाटा यांनी दिले आहेत, हे महत्त्वाचे.

अन्य व्यक्तींच्या स्वरूपात उल्लेखनीय बाब म्हणजे, रतन टाटा यांनी 'टाटा ट्रस्ट'मध्ये सल्लागार म्हणून काम करणाऱ्या होशी मलेसरा यांच्यासाठी पाच लाख रुपयांची, तर अलिबाग येथील बंगल्याची काळजी घेणाऱ्या देवेंद्र कटामोलू यांच्यासाठी दोन लाख रुपयांची तरतूद आपल्या इच्छापत्रात नमूद केली आहे. याशिवाय त्यांनी आपल्या खाजगी सचिव दीप्ती दिवाकरन यांना दीड लाख, तर कार्यालयीन शिपाई म्हणून काम करणाऱ्या गोपालसिंह व पांडुरंग गुरव या उभयतांना प्रत्येकी ५० हजार रुपये दिले असून, एक अन्य सहायक सरफझ्र देशमुख यांचे दोन लाखांचे कर्ज माफ केले आहे. यावरून आपल्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकासाठीच्या रतन टाटा यांच्या आत्मिक आपुलकीच्या भावनाच स्पष्ट होतात. उच्च शिक्षण घेणाऱ्यांना रतन टाटा नेहमीच वैयक्तिक स्तरावर प्रोत्साहन देत असत. त्यामुळेच त्यांच्या शेजारी राहणाऱ्या जॅक मिलाईट यांना इंग्लंडमधील वॉरविक बिझनेस स्कूलमधून एमबीए करण्यासाठी दिलेले २३.७ लाख रुपयांचे कर्ज माफ करण्याचे निर्देश दिले आहेत.

रतन टाटा यांनी आपल्या मरणोत्तर इच्छापत्राचे सारासार व संपूर्णपणे क्रियान्वयन करण्यासाठी आपल्या ज्या नातेवाईक, मित्र व सहकाऱ्यांची निवड केली, त्यामध्ये योजनापूर्वक शिरीन जिजीभॉय व दीना जिजीभॉय या भगिनी, मित्र मिहिल मिस्त्री, 'टाटा ट्रस्ट'चे विश्वस्त दारियस खंबाटा यांची निवड केली. रतन टाटा यांनीच दिलेल्या निर्देशानुसार, त्यांच्या इच्छापत्राची अंमलबजावणी करताना वरीलपैकी कुणी वाद वा मतभेद निर्माण केले, तर त्यांचा रतन टाटांच्या संपत्तीत कुठलाही वाटा राहणार नाही, हे देखील स्पष्ट केले आहे. टाटांच्या मनाचे मोठेपण प्रकर्षाने जाणवते, ते त्यांनी आपल्याला प्रिय असणाऱ्या 'टिटो' या कुत्र्यासाठी आवर्जून राखून ठेवलेल्या १२ लाखांच्या तरतुदीमुळे. एकूणच काय तर रतन टाटा यांचे मोठेपण त्यांच्या मरणांती अधिक भावते.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### जागतिक वसुंधरा दिवस!

जागतिक वसुंधरा दिवस दरवर्षी २२ एप्रिल रोजी साजरा केला जातो. १९७० मध्ये अमेरिकेतील पर्यावरणप्रेमी गेलॉर्ड नेल्सन यांच्या पुढाकाराने पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. पृथ्वीच्या संरक्षणासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी याकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आपण जर पूर्वीचा काळ बघितला तर लक्षात येते की, पूर्वी पृथ्वीची स्थिती नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत समतोल होती. वने, नद्या, पर्वत, समुद्र आणि हवामान यांचे नैसर्गिक चक्र सुरळीत चालत होते. त्यामुळे प्रदूषण नव्हते.

कालांतराने जंगलतोड, खनिज संपत्तीचा अतिवापर, शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे नैसर्गिक समतोल बिघडला. वाहने, कारखाने आणि प्लॅस्टिकच्या वापरामुळे हवा, पाणी आणि माती यांचे प्रदूषण वाढले. त्याचाच परिणाम म्हणजे पृथ्वीचे तापमान वाढून ग्लोबल वॉर्मिंग निर्माण झाली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी झाडे लावणे, जंगलतोड थांबवणे, प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक पद्धतीने शेती करणे या उपाययोजना आहेत. तसेच पूर्वी ऋषिमुनी त्यांच्या साध्या जीवनशैलीमुळे निसर्गाशी जुळवून घेत होते. त्यांनी सदैव निसर्गाचा आदर केला. आजच्या यंत्रयुगात जर आपण ऋषिमुनींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून संयमी जीवनपद्धती अंगीकारली, तर वसुंधरेचं रक्षण नक्कीच होऊ शकेल.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

●● ●●

### गरज आहे विज्ञानासोबत अध्यात्म जगण्याची

सहज समाज माध्यम चाळताना 'सनातन शंखनाद महोत्सव' या विषयावर वाचनात आले. त्यामध्ये १७ ते १९ मे २०२५ दरम्यान गोवा येथे शंखनाद महोत्सव साजरा होणार असल्याचे लक्षात आले. त्या संदर्भात सनातन शंखनाद महोत्सव वेबसाईटचे उद्घाटन गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते झाल्याचे वाचण्यात आले. जगात अशी पण आध्यात्मिक संस्था आहे की, जी सर्वांच्या आध्यात्मिक प्रगतीसाठी सतत कार्यरत आहे याचा आनंद झाला. सर्वत्र पुन्हा एकदा रामराज्य यावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे वाचून अभिमान वाटला.

त्यांनी असेच लोकांपर्यंत वेगवेगळ्या माध्यमातून आध्यात्मिक विषय पोहोचवावे आणि सध्याच्या स्थितीत थोडासा ताण आला की आत्महत्या करणे, मनासारखं नाही झालं तर नैराश्यात जाणे किंवा व्यभिचार करून आपल्याच पतीला प्रेमीच्या साह्याने मारणे असे जे कुकृत्य होत आहेत, ते जर आपल्याला थांबवायचे असेल तर आज विज्ञानासोबतच गरज आहे ती अध्यात्म शिकण्याची. म्हणून आपले संत, महात्मे यासाठी सतत कार्यरत असतात. त्यांच्या ज्ञानाचा सर्वसामान्य जनतेने नक्कीच उपयोग करून घ्यावा आणि जीवनात यशासोबतच, ते यश कसे टिकवून ठेवायचे, अपयशाला कसे सामोरे जायचे याचा जो मूलमंत्र आहे तो तुम्हाला कुठेही विज्ञानात नव्हे, तर तो आपल्या अध्यात्मातच गवसेल. तेव्हा मी भारताचा एक जागृत नागरिक म्हणून सर्वांना आवाहन करते की, वरील संकेतस्थळाला भेट देऊन सर्वांनी त्याचा आध्यात्मिक लाभ घ्यावा.

**- डॉ. भारती अनिल हेडाऊ**/९४२१७७३९९९

●● ●●

### व्यसनाधीनता एक सामाजिक समस्या

व्यसनाधीनता ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे. लोकांमध्ये याविषयी जागरूकता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी कुटुंब आणि मित्रांचे सामूहिक समर्थन खूप महत्त्वाचे आहे, जे त्या व्यक्तीस व्यसनातून बाहेर पडण्यास मदत करू शकते. शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने व्यसनाधीन व्यक्ती विविध आजारांना बळी पडते. कौटुंबिक कलह वाढतात. शिवाय भांडणे, कलह होतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. कळतंय पण वळत नाही या उक्तीप्रमाणे, लोकांना याचे परिणाम समजत असूनही, त्याच्यापासून दूर राहणे गृहीत आहे. विशेषतः तरुण पिढी या विषारी विळख्यात वेगाने सामावली जात आहे. आजची तरुण पिढी काहीतरी जगावेगळं करण्याच्या चुकीच्या संगतीमुळे मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत चालली आहे.

शालेय आणि कौटुंबिक अपेक्षा, करीअरच्या दबावामुळे अनेक तरुण ताणतणावात राहतात. या ताणातून सुटण्यासाठी ते व्यसनांकडे वळतात. समाज माध्यम आणि ऑनलाईन गेमिंगमुळे अनेक तरुण व्यसनाधीन होतात. समाजाच्या अपेक्षा अनेक वेळा त्यांना अधिक त्रस्त करतात. अनेक ठिकाणी व्यसनकारक पदार्थांची सहज उपलब्धता असते, ज्यामुळे तरुणांना त्यांना चुकविणे कठीण होते. या समस्यांचा सामना करण्यासाठी, तरुणांमध्ये जागरूकता वाढवणे, मानसिक आरोग्याबद्दल चर्चा, मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

महत्वाचे...



## मुंबईतील जैन मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ गुरुवारी सोलापुरात जैन समाजाचो मोर्चा

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

मुंबईतील जैन मंदिर पाडल्याच्या निषेधार्थ सोलापूर सकल जैन समाजाने गुरुवार २४ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजता भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून त्यातील सोलापूर जिल्ह्यातून सकल जैन समाजाने सहभागी व्हावे असे आव्हान सोलापूर सकल जैन समाजाने केले आहे. सोलापूर येथे आदिनाथ महाराज जैन मंदिरमध्ये सकल जैन समाजाची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी हा निर्णय घेण्यात आला. मुंबई येथील विलेपार्ले येथील आरक्षित जागेवरील जैन मंदिर पाडल्याने त्याची राज्यात पडसाद उमटत असून त्या अनुषंगाने सोलापुरात ही सकल जैन समाजाने भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. यावेळी सुनील गांधी, कल्पेश मालू, केतन शहा, पदम राका, श्याम पाटील, धनंजय शहा, मनीष शहा, अभिनंदन विभूते, वालचंद पाटील, आनंद तालीकोटी, संजय शहा, सुकुमार संकेश्वरा, बाबुराव तंगा, डॉ. आदर्श मेहता, सुहास छचुरे, देवेंद्र षटगार आदींनी आपल्या मनोगतातून हा भव्य मोर्चा काढण्याचे आव्हान केले. हा मोर्चा बाळीवेस येथील गांधीनाथा रगंजी जैन बोर्डिंग येथून निघणार असून छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज चौक, चार पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, श्री सिद्धेश्वर मंदिर ते पुनम गेट असा काढण्यात येणार आहे. तरी समाजातील सर्व सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सकल जैन समाजाच्या वतीने करण्यात आले.

## इंग्रजी निवासी शाळेत प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर दि.२१ एप्रिल-**

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण मिळणे या योजनेंतर्गत इ.१ ली व इ.२ री मध्ये मोफत प्रवेश मिळण्यासाठी पुढील अटीच्या आधारे अर्ज करावेत. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसुचित जमातीचा असावा. इ. १ ली करीता विद्यार्थ्यांचे वय दि. ३१ डिसेबर, २०२५ पर्यंत ६ वर्षे पुर्ण असावे.अनुसुचित जमातीच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला, उत्पन्न दाखला इ. च्या प्रती सादर कराव्यात. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, जन्मतारखेसाठी ग्राम सेवकाचा दाखला अथवा अंगणवाडीचा दाखला जोडण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या व पालकाच्या आधारकार्डची छायांकित प्रत जोडावी. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नसावेत, विद्यार्थ्यांचे पालकांनी खोटी माहिती सादर केल्यास पाल्यांचा प्रवेश रद्द केला जाईल .सदर योजनेंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्चीती झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये पालकांच्या पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही. अनु. जमातीच्या पालकांनी इ. १ ली व इ. २ रीच्या प्रवेशाकरीता आपल्या पाल्यांचे अर्ज दि. ३१ मे. २०२५ पर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावेत. तसेच अधिक माहितीसाठी प्र. सहा प्रकल्प अधिकारी (शिक्षण) व्ही. वाय. सरतापे, मो. नं. ८६६८७७४२५४ यांचेशी संपर्क साधावा. रु. १.०० लक्ष वार्षिक उत्पन्न मर्यादा व सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रम ाणपत्र असलेल्या अनु, जमातीच्या इच्छुक पालकांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी या कार्यालयास दि. ३१ मे. २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत. असे आवाहन मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर सागर नन्नवरे यांनी केले आहे.

## जिल्ह्यात मनाई आदेश लागू; आरडीसी मनिषा कुंभार यांनी काढले आदेश

**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून २० एप्रिल ते ०४ मे २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू केले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

# मुदतीआधीच जिल्ह्यातील पशुगणनेचे काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेले पशुगणनेचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. काम पूर्ण करण्याची अंतिम तारीख १५ एप्रिल होती. मात्र, मुदतीपूर्वीच हे काम पूर्ण झाल्याचे पशुविभागाकडून सांगण्यात आले. शहर व जिल्ह्यातील १,४६० गावे व वॉर्डात फिरून सर्वेक्षण केले. दरम्यान, गायी, म्हैशी, मेंढ्या, शेळ्यांसह कोंबड्या, गाढव, देशी गायी, मेंढ्या, दुधाळ गायी, वराह, बकऱ्या, घोडे, गाढव, उंट, गोवंश, खेचर, बैल, रेडयांची यांची गणना करण्यात आली.

पशुगणनेचे काम १५ एप्रिल रोजी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. मात्र त्याआधीच गुरुवार १० एप्रिल रोजी हे काम झाल्याची माहिती देण्यात आली. यापुढे केंद्र सरकार व सांख्यिकी विभाग यांच्या मार्फत जिल्ह्यातील काही गावांची फेरपडताळणी करण्याचे आदेश देतील. आधी मिळालेली माहिती व नंतर मिळालेली माहिती यांची पडताळणी केली जाणार आहे. महिनाभर हे काम सुरू राहणार आहे. देशातून आलेल्या माहितीचे पृथकरण करण्यात येणार आहे. साधारणपणे पाच महिन्यात हे काम पूर्ण होईल. त्यानंतर पंतप्रधानांच्या हस्ते माहिती अहवालाचे प्रकाशन होईल. सध्या माहिती एकत्रित केली असली तरी ती लगेच प्रसिद्ध करता येत नाही.

### जुन्या माहितीप्रमाणे काम सुरू

जिल्ह्यातील पशुगणनेचे काम पूर्ण झाले असले तरी या मिळालेल्या माहितीचा वापर करता येत नाही. केंद्र सरकारकडून अधिकृतरीत्या अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर त्यातील माहितीचा वापर करुन धोरण निश्चित करता येतात. तोपर्यंत जुन्या माहितीप्रमाणे काम करावे लागणार आहे. जिल्ह्यातील पशुगणनेचे काम पूर्ण झाले आहे. आता पुढील काही दिवस केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार डेटा क्लिनिंग, डेटा वेरिफिकेशन, क्वालिटी कंट्रोल आदी कामे होणार आहेत. त्यानंतर केंद्र सरकारकडून देशातील पशुगणनेचा एकत्रित अहवाल प्रसिद्ध करण्यात येईल.

**- डॉ. विशाल येवले, पशु संवर्धन उपायुक्त, सोलापूर.**

### शासकीय योजनांसाठी गणनेचा फायदा

पशुपालकांनी कोणताही किंतु परंतु मनात न ठेवता आपल्या पशुधनाची माहिती प्रगणकाला दिली आहे. या नोंदी व गणनेचा खूप मोठा थेट अप्रत्यक्ष फायदा भविष्यात सर्वांनाच होणार आहे. पशुपालकांनी अडीअडचणी सोडविण्यासाठी पर्यवेक्षकांच्या संपर्कात राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे पशुसंवर्धन कार्यालयाने कळविले आहे.



## ज्ञान प्रबोधिनीच्या तंत्र प्रशिक्षितांना प्रशस्तीपत्र वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने आयटीआयच्या ६२ विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना संचालक डॉ. गिरीशराव बापट यांच्या हस्ते नुकतेच प्रशस्तिपत्राचे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम ज्ञान प्रबोधिनीच्या चैतन्य भुवन येथे संपन्न झाला. यावेळी संचालक डॉ. बापट, सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी, आयटीआयचे प्रशिक्षक सिद्राम गोलेकर, विजय भांगे, शिरीष शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. युवक-युवतींनी कौशल्य प्रशिक्षित व रोजगारक्षम व्हावे, यादृष्टीने आयटीआयच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना ज्ञानप्रबोधिनीतर्फे संगणकाचे नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण डिसेंबर ते २५ मार्च या कालावधीत देण्यात आले. प्रस्ताविक देविदास यादव यांनी केले. डॉ. बापट यांनी आयटीआय व प्रबोधिनी यांनी मुलांच्या प्रशिक्षणासाठी एकत्रित काम केले याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रबोधिनीच्या तंत्र शिक्षण विभागाचे प्रमुख अविनाश गवळी यांनी मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पर्यावरण संरक्षणासाठी जागरूकता गरजेची



जागतिक वसुंधरा दिन विशेष
**डॉ. मनोज देवकर, पर्यावरणदूत**

### जागतिक पृथ्वी दिनाचा इतिहास

पहिला पृथ्वी दिन २२ एप्रिल १९७० रोजी साजरा करण्यात आला आणि तो विस्कॉन्सिन येथील सिनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी तरुण कार्यकर्ते डेनिस हेस यांच्यासह साजरा केला. १९६९ मध्ये तेल गळतीच्या घटनेचे नुकसान पाहून त्यांना हा कार्यक्रम सुरू करण्याची प्रेरणा मिळाली आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व लोकांना समजावून सांगण्यासाठी जागरूकता दिवसाची आवश्यकता त्यांना जाणवली.

१९९० मध्ये, १४१ राष्ट्रांम धील २० कोटी लोक जगभरातील पुनर्वापराला प्रोत्साहन देण्यासाठी एकत्र आले आणि १९९२ मध्ये ब्राझील (रिओ दि जानेरो) येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण आणि विकास परिषदेचा पाया रचला गेला तेव्हा पृथ्वी दिन जागतिक स्तरावर ओळखला गेला. २०१० मध्ये, ERTHDY. ORG ने जगभरातील लोकांसाठी पर्यावरणासाठी कृती करण्यासाठी पृथ्वी दिन हा एक महत्त्वाचा क्षण बनवला. १९३ देशांतील लाखो लोक ERTHDY.ORG च्या नेतृत्वाखालील पर्यावरण चळवळीत सामील झाले आहेत. संस्थेने दरवर्षी १०० कोटींहून अधिक लोकांना पृथ्वी दिनाच्या कार्यक्रमात सहभागी करून घेतले आहे, ज्यामुळे जागतिक पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने होणाऱ्या चळवळीत हा एक महत्त्वाचा कार्यक्रम बनला आहे.

### उपाययोजना

- प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना
- एकदा वापरता येणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे.
- पुन्हा वापरता येण्याजोग्या पिशव्या, बाटल्या आणि कंटेनर वापरणे.
- प्लास्टिक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा, शक्य असेल तेव्हा त्याचा पुनर्वापर करा.
- प्लास्टिक पर्यायांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांना पाठिंबा देणे.
- प्लास्टिक प्रदूषणाच्या परिणामांबद्दल इतरांना शिक्षित करणे.

### जागतिक पृथ्वी दिनसाठी वर्षानुवर्षे थीम

- बुधवार २०२४ थीम: ग्रह विरुद्ध प्लास्टिक
- बुधवार २०२३ थीम: आपल्या ग्रहात गुंतवणूक करा
- बुधवार २०२२ थीम: आपल्या ग्रहात गुंतवणूक करा
- बुधवार २०२१ थीम: आपली पृथ्वी पुनर्संचयित करा
- बुधवार २०२० थीम: हवामान कृती
- बुधवार २०१९ थीम: आपल्या प्रजातींचे रक्षण करा
- बुधवार २०१८ थीम: प्लास्टिक प्रदूषण संपवा
- बुधवार २०१७ थीम: पर्यावरण आणि हवामान साक्षरता

### जागतिक पृथ्वी दिन २०२५ थीम

या वर्षी, २०२५, जागतिक पृथ्वी दिनाची थीम आपली शक्ती, आपला ग्रह आहे. ही थीम लोक, संघटना आणि सरकार यांच्या अक्षय ऊर्जा स्रोतांकडे वळण्यासाठी आणि शाश्वत भविष्य घडवण्याच्या सामान्य जबाबदारीवर लक्ष केंद्रित करते. २०३० पर्यंत, जगभरात उत्पादित होणाऱ्या अक्षय ऊर्जेचे प्रमाण तिप्पट करण्याचे लक्ष्य आहे, ज्यामध्ये भूऔष्णिक, जलविद्युत, भरती-ओहोटी, पवन आणि सौर ऊर्जा यासारख्या स्वच्छ ऊर्जा स्रोतांवर विशेष भर दिला जाईल.

### दिनाचे महत्त्व

लोकसंख्या वाढ आणि जागतिक तापमानवाढ यामुळे नैसर्गिक आपत्ती मानवतेसाठी अधिकाधिक धोकादायक होत आहेत, ज्यामुळे हवामान बदल आणि समुद्राच्या पातळीत वाढ होत आहे. भविष्यात, मानवजातीला दरवर्षी असंख्य आपत्तींना सामोरे जावे लागेल ज्यामुळे हजारो लोकांचा मृत्यू होईल अशी शक्यता जास्त आहे. २०२२ मध्ये, जगभरातील सरकारांनी अनेक महत्त्वाचे हरित धोरण प्रस्ताव स्वीकारले. तथापि, २०५० पर्यंत हरितगृह वायू तटस्थता साध्य करण्यासाठी उपाययोजना राबवत असलेले मोजकेच लोक आहेत. हवामान बदलावरील अलीकडील आंतरसरकारी पॅनेलच्या अहवालानुसार, हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी त्वरित पावले उचलली गेली नाहीत तर पृथ्वीचे तापमान औद्योगिकीकरणापूर्वीच्या पातळीपेक्षा ३.२ओ सेल्सिअस जास्त असेल, जे मानवी जीवनासाठी विनाशकारी असेल. नैसर्गिक आपत्तींपासून पृथ्वीचे संरक्षण करणे आणि राहण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी एक चांगले स्थान प्रदान करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. जागतिक पृथ्वी दिन स्थानिक पर्यावरण अधिकाऱ्यांनी नवीन धोरणे तयार करण्याचे आणि विद्यमान पर्यावरणीय समस्यांवर कृती अंमलात आणण्याचे महत्त्व दर्शवितो. याव्यतिरिक्त, लोकांना परिसंस्थेवर परिणाम करणारे घटक आणि पृथ्वीवरील वनस्पती आणि प्राण्यांचे संरक्षण कसे करावे याबद्दल वसुंधरा दिनानिमित्त जनजागृती व शिक्षित करते.



**REQUIRED**

Brahmin groom required. Bride divorced fair. Height 5.8 inches,1 daughter. 9 Year

**Contact 9009998062**

### सचिव नेमणे

शेटफळ बृहत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, शैटफळ ता. मोहोळ जि. सोलापूर सचिव नेमणे आहे. शेटफळ बृहत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित शैटफळ ता. मोहोळ जि. सोलापूर या संस्थेचे सचिव पदाचा नेमणुक करार पध्दतीने (Contract basis) मानधन तत्वावर करण्यात येणा असून पात्रतेच्या अटी शर्ती खालील प्रमाणे आहेत.

**पात्रता :-**

१) तो महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असला पाहिजे.
२) त्याचे वय नेमणुकीच्या तारखेस किमान २३ व कमाल ३५ वर्ष असावे
३) तो नेमणुकीच्या तारखेस शाखेचा पदवीधर असावा त्याने / तिने हायर डिप्लोमा इन को. ऑप म्यानेजमेंट/ जी.डी.सी. ॲन्ड ए/ वाणिज्य शाखा पदवी प्राप्त असल्यास प्राधान्य राहील.
४) तो महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इनफॉरमेशन ॲन्ड Technology (MSCIT) परीक्षा उत्तीर्ण असला पाहिजे किंवा तो विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था संस्थेत लिपिक म्हणून काम केले असल्यास
**अ)** शैक्षणीक पात्रता किमान १२वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष ५ वर्ष कामकाजाचा अनुभव
**ब)** शैक्षणीक पात्रता किमान १०वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष १० वर्ष कामकाजाचा अनुभव.
५) तो महाराष्ट्र स्टेट को. ऑप युनियन पूरस्कृत सहकारी पदविका (LDC किंवा DCM) धारण करणारा असल्यास प्राधान्य.
६) तो CAS प्रमाणे दप्तर लिहिण्याबाबत प्रशिक्षण घेतलेला असल्यास प्राधान्य तरी इच्छुक दिनांक २९/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा मूळ कागदपत्रासह येथील शेटफळ बृहत संस्थेच्या कार्यालयात व्यक्तीशः संचालक मंडळासमोर मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

**सही/-**
**चेअरमन**
**शेटफळ बृहत वि.का. सेवा. सह. संस्था**
**मर्या. शेटफळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर**

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, उत्तर सोलापूर, कसबे सोलापूर, शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील तेलंगी पाच्छा पेठेतील सि.स.नं. १०३८०/७४८ पैकी प्लॉट नं.२१८पै. क्षेत्रफळ ९१.१ चौ.मी. यातील जुने विट, मातीचे कच्चे बांधकाम त्यावर पन्हाळी लोखंडी पत्रे असून, त्यात तीन खोल्या व संडास बाथरुम, एकूण बांधकाम क्षेत्र ४१.८२ चौ.मी. त्यातील पश्चिम बाजुची भिंत समाईक मालकीची असून, बाकीच्या निती स्वतंत्र मालकीच्या आहेत. सदर घर जागेत अर्धा इंची पिण्याच्या पाण्याचे नळ कनेकशन आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विद्युत पुरवठा दिनांक १३/०५/१९७४ रोजी घेतलेला असून, त्यांचा ग्राहक क्र.३३०२४०३१२५४९ आहे. सदर मिळकतीचा म्यु.पल नं.७४/अ आहे, यांसी चतुः सिमा खालीलप्रमाणे :- पूर्वस सि.स.नं.१०३८०/७५, दक्षिणेस रस्ता, पश्चिमेस सि.स.नं.१०३८०/७, उत्तरेस बोळ रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमेतील ही मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे.

सदर मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर यांनी आमची अशिल कंपनी श्रीराम सिटी युनियन फायनान्स लि. यांचेकडे कर्ज मागणी केलेली असुन त्या कर्जापोटी वरील मिळकत तारण देण्याचे मान्य केलेले आहे. सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचेही कसल्याही स्वरूपाचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा सदर गहाणखतास हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाचे आत आमचेंशी संपर्क साधुन लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे कोणाची हरकत न आल्यास सदर मिळकतीवर मुस्ताक अहमद नुरमहंमद काडगांवकर यांचे व्यतिरीक्त अन्य कोणाचीही हक्क, अधिकार नाही, असे गृहीत धरून सदर मिळकतीचे गहाणखत आमचे अशिल कंपनीचे हक्कात करून घेण्यास येईल व त्यानंतर कोणाचीही कसल्याही स्वरूपाची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस दिली. दिनांक : २१/०४/२०२५

**सही/-**
**ॲड. योगेश घनशामराव अबूज**
**आनंद नगर, आनंद बाजार जवळ,**
**धाराशिव ता. जि. धाराशिव. ४१३५०१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## बार्शी नगरपरिषद, बार्शी

**पाणी पुरवठा विभाग**

क्र.२०२५/बानप/पापु/प्रशा-३/१९९७
नगरपरिषद कार्यालय,
बार्शी, दिनांक २१/०४/२०२५

### जाहीर निविदा नोटीस क्रमांक : १

बार्शी नगरपालिका खालील नमूद केलेल्या कामाची बंद लखोटयातून परसेंटेज व बाबनिहाय दराची निविदा मागवित आहे. निविदा प्रत्रके दि. ०६/०५/२०२५ रोजी दुपारी ४-०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा विभागाकडे विकत मिळतील. दि. ०७/०५/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत भरलेली निविदा पत्रके नागरी सुविधा केंद्र कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रक्कमेपोटीचे धनाकर्ष (डी.डी.) व्दारे स्विकारण्यात येईल. रोख रक्कम भरणा करुन घेतली जाणार नाही. धनाकर्ष सोबत असल्याशिवाय निविदापत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दिनांक ०७/०५/२०२५ रोजी दुपारी ५.०० वा. हजर निविदाधारका समोर अथवा त्यांचे प्रतिनिधी समोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांचे कार्यालयात उघडणेत येतील. बंद लखोटयावर ज्या त्या कामाचे नांव लिहावे. निविदा २ पाकीट पध्दतीने स्विकारल्या जातील. पाकीट क्र.१ मध्ये आवश्यक कागदपत्रे नमूद अटी शर्तीप्रमाणे देणे आवश्यक आहे. तसेच पाकीट क्र.२ मध्ये भरलेली निविदा सादर करावी. निविदाच्या अटी शर्ती वगैरे संपूर्ण माहिती सुट्टी खेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. कमी अथवा जादा दराची निविदा मंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

| अ. नं. | कामाचे नाव | अंदाजे खर्च | सुरक्षा ठेव | बयाणा रक्कम रु. | निविदाची किंमत रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ ते ३६ इंची साईज पर्यंत स्लुईस व्हॉल्व्ह करिता स्टिल बारमधून स्पिंडल, गनमेटल, ग्लॅन तयार करून देणे. | वार्षिक काम | ४% | १५,०००/- | १,०००/- | वार्षिक काम |
| २ | बार्शी नगरपरिषद मालकीच्या अस्तित्वास असलेल्या उंच टाक्या हौद स्वच्छ करणे. | वार्षिक काम | ४% | ५,०००/- | १,०००/- | वार्षिक काम |
| ३ | बार्शी, कुर्डवाडी व चांदणी पाणी पुरवठा योजना, मलशुध्दीकरण केंद्र येथील फ्लोमीट००२ देखभाल दुरूस्ती करणे. | वार्षिक काम | ४% | ५,०००/- | १,०००/- | वार्षिक काम |
| ४ | बार्शी, कुर्डवाडी व चांदणी पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्र, येथील व्हॅक्युम क्लोरीन गॅस प्लँटच्या यंत्रेणेची देखभाल दुरूस्ती करणे. | वार्षिक काम | ४% | ५,०००/- | १,०००/- | वार्षिक काम |
| ५ | उजनी चांदणी जलशुध्दिकरण केंद्रावर ९०० के.जी.मध्ये लिक्वीड क्लोरीन गॅस टनर पुरविणे. | वार्षिक काम | ४% | १०,०००/- | १,५००/- | वार्षिक काम |
| ६ | पंकजनगर येथे विंधनविहीर घेऊन सबमर्सिबल पंप बसविणे व टाकीसाठी कट्टा बांधून टाकी बसविणे वगैरे काम करणे. | २,०६,८९५/- | ४% | ३,०००/- | ५००/- | १ महिना |
| ७ | बार्शी नगरपालिकेच्या विविध ठिकाणच्या उंच पाण्याच्या टाकीमध्ये पाण्याची पातळी दर्शविणारे वॉटर लेव्हल इंडिकेटर्स पुरविणे व बसविणे | २,३६,४९०/- | ४% | ३,०००/- | ५००/- | १ महिना |
| ८ | न.पा. मालकीच्या शाळा नं ८ व ४२२ येथे विंधनविहीर घेणे, सबमर्सिबल पंप पुरविणे बसविणे वगैरे कामे करणे. | ४,१३,७९२/- | ४% | ४,२००/- | ५००/- | १ महिना |
| ९ | ढगे मळा येथे भागवत पवार यांचे घराशेजारील ओपन स्पेसमध्ये विंधनविहीर घेऊन सबमर्सिबल पंप बसविणे व टाकीसाठी कट्टा बांधून टाकी बसविणे वगैरे कामे करणे. | २,०६,८९५/- | ४% | ३,०००/- | ५००/- | १ महिना |
| १० | बार्शी येथील परांडा रोडवर मलिक साहेब दर्गा तांबोळी स्मशनभुमीमधील विहीरीतील गाळ काढणे. | २,३६,२१५/- | ४% | ३,०००/- | ५००/- | १ महिना |
| ११ | बार्शी शहर गट क्रमांक ११९४ व ११९५ येथील रेखांकनातील खुल्या जागेमध्ये २००० वृक्ष लागवडीसाठी विंधनविहीर घेऊन सबमर्सिबल पंप बसविणे व ठिबक सिंचन करणे. | २,९९,६८८/- | ४% | ३,०००/- | ५००/- | १ महिना |
| १२ | बार्शी नगरपरिषदेच्या गट नंबर १०८९, ख्रिश्चन स्मशानभुमी शेजारील जागेमध्ये विंधनविहीर खोदणे व इतर कामे करणे. | २,०८,६६९/- | ४% | २,१००/- | ५००/- | १ महिना |

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**

## कंत्राटदार नेमणे आहेत

**एन. एम. वाडीया चॅरिटेबल हॉस्पिटल येथील विविध प्रकारच्या वातानुकूलीत यंत्रणा, जलशुध्दीकरण यंत्रणा, अग्निशमन यंत्रणा व उपकरणे यासाठी पुरवठा व उभारणी करणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांकडुन पूर्व पात्रता करण्यात येत आहे.इच्छुकांनी पूर्वानुभवासाहित खालील पत्यावर संपर्क साधावा –**

**आर्किटेक्ट शशिकांत चिंचोळी**
ऑफिस नं.३/४, पहिला मजला, श्रध्दा एम्पायर, रेल्वे लाईन्स, सोलापूर–४१३००१.

Jhaveri

Classifieds

**पाहिजेत**

**पार्ट टाईम काम करु इच्छिणाऱ्या शंभर महिला, मुले, मुली पाहिजेत. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटून काम सुरू करणाऱ्यांना नावनोंदणी व हजाराची वस्तू मोफत. मात्र अटी लागू. संपर्क: 9765641261**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### दुखापतीमुळे संजू सॅमसन बंगळुरुविरुद्ध खेळणार नाही

**जयपूर** : राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन २४ एप्रिल रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) विरुद्ध होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) सामन्यासाठी बंगळुरूला जाणार नाही, अशी माहिती फ्रॅन्चायझीने सोमवारी दिली.



सध्या दुखापतीमुळे ग्रस्त असलेला सॅमसन संघाच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली जयपूरमध्येच राहील. संघ व्यवस्थापन त्याच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे व त्याच्या पुनरागमनाबाबत प्रत्येक सामन्याचा दृष्टिकोन अवलंबून राहणार आहे, असे फ्रॅन्चायझीने म्हटले आहे. राजस्थानच्या फलंदाजी व नेतृत्व गटातील महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या सॅमसनची अनुपस्थिती चिन्नास्वामी स्टेडियमवर पुनरुज्जीवित आरसीबीविरुद्धच्या सामन्यासाठी तयारी करत असताना संघासाठी धक्कादायक आहे. राजस्थान या सामन्यासाठी एका स्थायी कर्णधाराची निवड करण्याची शक्यता आहे. सामन्याच्या दिवसापूर्वी आणखी एक नवीन बातमी येणे अपेक्षित आहेत.

### सात्त्विकसाईराज-चिराग सुदिरमन चषकाला मुकणार

**नवी दिल्ली** : सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी ही भारतीय पुरुष दुहेरी जोडी आजारपणामुळे आगामी सुदिरमन चषक बॅडमिंटन स्पर्धेला मुकणार आहे. दुखापतीतून सावरल्यानंतर जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेली ही जोडी पुन्हा स्पर्धेत उतरणार होती, परंतु आता आजारपणामुळे सात्त्विक-चिरागने बीडब्ल्यूएफ सुदिरमन चषक फायनल २०२५ मधून माघार घेतली आहे, असे बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाने एका इंस्टाग्राममध्ये लिहिले आहे. सात्त्विक व चिरागने गत महिन्यात ऑल इंग्लंड ओपन सुपर १००० मध्ये शेवटचा भाग घेतला होता. तेव्हापासून ते आंतरराष्ट्रीय स्पर्धेतून अनुपस्थित आहेत आणि बॅडमिंटन आशिया स्पर्धेतूनही माघार घेतली आहे. महिला दुहेरी जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंदने माघार घेतल्यानंतर, या प्रतिष्ठित स्पर्धेतून माघार घेणारी ही माजी जागतिक क्रमांक एकची जोडी आहे. भारताच्या संघात आता माजी विश्वविजेती पीव्ही सिंधू, जागतिक अजिंक्यपद पदक विजेत्या लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय यांचा समावेश असेल. जागतिक मिश्र संघ अजिंक्यपद स्पर्धा म्हणून ओळखली जाणारी ही द्वैवार्षिक स्पर्धा २७ एप्रिल ते ४ मे दरम्यान चीनमधील झियामेन येथे होणार आहे.

### टीसीएस वर्ल्ड १० कि.मी. शर्यत बंगळुरूमध्ये रविवारी

**बंगळुरू** : आगामी २७ एप्रिल रोजी बंगळुरूमध्ये टीसीएस वर्ल्ड १० कि. मी. शर्यत होणार आहे. या शर्यतीत ३० हजारहून अधिक स्पर्धक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या शर्यतीत पुण्यातील काही युवा अभियंते सहागी होणार आहे. सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेला केतन अभोंकर १० किमी शर्यत पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल. अभोंकर हे सतत जॉगिंग करताना पूर्ण मॅराथॉन पूर्ण करणारे भारतातील पहिले आणि एकमेव खेळाडू मानले जाते. २०१५ पासून एक अनुभवी अंतर धावपटू अभोंकरला साथीच्या काळात जगलिंगचा शोध लागला व स्वतःहून प्रशिक्षण सुरू केले. अभोंकर यांना २०२४ मध्ये पुणे पॅशन आयकॉन म्हणून नाव देण्यात आले आणि त्यांना वर्ल्डवाइड जॉगलर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला. त्यांच्या मॅरेथॉन जॉगलिंग कामगिरीला इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सर्समध्येही स्थान देण्यात आले आहे. अभोंकर यांचे प्रशिक्षण कठोर आणि काळजीपूर्वक नियोजित आहे.

### जेलेना ओस्टापेन्को स्टुटगार्ट ओपन विजेती



**स्टुटगार्ट** : जेलेना ओस्टापेन्कोने स्टुटगार्ट ओपन टेनिस स्पर्धेत स्वप्नवत कामगिरी करत २०१७ नंतर क्लेवर पहिले जेतेपद पटकावले. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ओस्टापेन्कोने प्रथम मानांकित आर्यना सबालेन्काला ६-४, ६-१ असे पराभूत करून आपल्या कारकिर्दीतील नववे होलॉजिक डब्ल्यूटीए टूर जेतेपद पटकावले. सबालेन्का जेतेपदाच्या सामन्यात गत तीन पराभवांनंतर विजयी होईल असे वाटत होते, परंतु ओस्टापेन्कोने चौथ्या प्रयत्नात सबालेन्कावर आपला पहिला विजय नोंदविला. या स्पर्धेत लॅटव्हियाच्या ओस्टापेन्कोने धमाकेदार विजय मिळवला. या आठवड्यात उपांत्यपूर्व फेरीत इगा स्वियातेकलाही हरवल्यानंतर, ओस्टापेन्को एकाच स्पर्धेत सबालेन्का व स्वियातेक दोघींनाही हरवणारी नववी खेळाड ठरली.

# रोहित, कोहली अव्वल श्रेणीत कायम

## ३४ खेळाडू केंद्रीय करारबद्ध ● ऋषभ पंतला बढती ● अय्यर, ईशान किशनचे पुनरागमन



◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी बीसीसीआयच्या केंद्रीय करारबद्ध खेळाडूंच्या ३४ जणांची यादी जाहीर केली. या यादीत भारताचा कसोटी व वन-डे कर्णधार रोहित शर्मा व स्टार फलंदाज विराट कोहलीने अव्वल श्रेणीत आपले स्थान कायम ठेवले आहे, तर श्रेयस अय्यर व ईशान किशनने तळाच्या श्रेणीत पुनरागमन केले आहे. ऋषभ पंतला करारांत पढती देण्यात आली आहे.

सात कोटी रुपये वार्षिक रिटेनरशिप शुल्क असलेल्या अ+ श्रेणीत गेल्या काही वर्षांप्रमाणेच रवींद्र जडेजा व वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांचाही समावेश आहे.

भारताचा चॅम्पियन्स चषकाचा शिल्पकार श्रेयस अय्यर याने या यादीत उल्लेखनीय पुनरागमन आहे. त्याला गट ब मध्ये समावेश करण्यात आला असून या श्रेणी अंतर्गत त्यांना वार्षिक तीन कोटी रुपये मानधन मिळणार आहे.

आयपीएलसाठी स्थानिक क्रिकेटकडे दुर्लक्ष केल्याबद्दल गत हंगामात अय्यरला वगळण्यात आले होते. याच कारणामुळे वगळण्यात आलेला यष्टिरक्षक-फलंदाज ईशान किशननेही श्रेणी क मध्ये पुनरागमन केले आहे. या क श्रेणीतील खेळाडूंची वार्षिक किंमत एक कोटी रुपये आहे.



ईशान किशन



श्रेयस अय्यर

२०२३-२४ च्या हंगामात जीवघेण्या अपघातातून बरे झाल्यामुळे गट ब मध्ये स्थान न मिळालेल्या ऋषभ पंतला निवृत्त रविचंद्रन अश्विनच्या जागी अ श्रेणीत परत आणण्यात आले आहे. श्रेणी अ मध्ये दरवर्षी पाच कोटी रुपयांचे मानधन मिळते.

श्रेणी क मध्ये सर्वाधिक १९ खेळाडू आहेत, यात हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, अभिषेक शर्मा व नितीश कुमार रेड्डी हे चार नवीन खेळाडू आहेत. (वृत्तसंस्था)

### बीसीसीआय केंद्रीय करार यादी

- **अ+ श्रेणी** : रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा.
- **अ श्रेणी** : मोहम्मद सिराज, के. एल. राहुल, शुभमन गिल, हार्दिक पांड्या, मोहम्मद शमी, ऋषभ पंत.
- **ब श्रेणी**: सूर्यकुमार यादव, कुलदीप यादव, अक्षर पटेल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर
- **क श्रेणी**: रिंकू सिंग, टिळक वर्मा, ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर, मुकेश कुमार, संजू सॅमसन, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा, रजत पाटीदार, ध्रुव जुरेल, सर्फराज खान, नितीश कुमार रेड्डी, ईशान किशन, अभिषेक वर्मा, दीपकुमार शर्मा, दीपिका वर्मा, हरिष शर्मा, रजत पाटीदार.

# दिल्लीच्या सलामीवीरांकडून अपेक्षा

◆ **लखनौ, २१ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमिर लीग हंगामात मंगळवारी येथे दिल्ली कॅपिटल्स वि. लखनौ सुपर जायण्ट्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आत्मविश्वासाने परिपूर्ण असलेल्या लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध दिल्ली कॅपिटल्सला त्यांच्या सलामीवीरांकडून दमदार कामगिरीची अपेक्षा आहे.

सध्या गुजरात, दिल्ली, बंगळुरू, पंजाब व लखनौ या पाचही संघांचे प्रत्येकी १० गुण असून सरस धावगतीच्या आधारे ते अनुक्रमे पहिल्या पाच क्रमांकात आहे. एकीकडे दिल्लीला आपले अव्वल चार क्रमांकातील स्थान मजबूत करायचे आहे, तर दुसरीकडे लखनौ अव्वल चार क्रमांकात स्थान मिळवण्यास उत्सुक आहे.

या हंगामात दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात थोडीशी रंजक राहिली आहे. फाफ डु प्लेसिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, अभिषेक पोरेल व नवीनतम प्रवेश करणारा करुण नायर अव्वल फळीत फलंदाजीसाठी येत आहेत. गत पाच सामन्यांमध्ये या चार फलंदाजांमध्ये तीन वेगवेगळ्या सलामीवीरांची जोडी होती, यात त्यांची २३, ३४ ०, ९, ० अशी भागीदारी झाली. दक्षिण आफ्रिकेच्या फाफ डु प्लेसिसच्या दुखापतीमुळेही हे घडले. या सामन्यापूर्वी डु प्लेसिसच्या तंदुरुस्तीवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल.



ऋषभ पंत



अक्षर पटेल

दिल्ल कॅपिटल्सने आतापर्यंक आपल्या सातपैकी पाच सामने जिंकले आहेत आणि के. एल. राहुलच्या नेतृत्वाखालील मधल्या फळीनेही चांगली कामगिरी केली आहे.

पण लखनौच्या दिग्वेश राठी, रवी बिश्नोई, आवेश खान व शार्दुल ठाकूर या सक्षम गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व गाजविले आहे.

राजस्थान रॉयल्सविरुद्ध लखनौ संघाच्या दोन धावांनी झालेल्या विजयात आवेशने १८ व्या व २० व्या षटकांत ज्या प्रकारे उत्कृष्ट कामगिरी केली, हे त्याचे एक उदाहरण आहे. त्यामुळे लखनौ संघाचा आत्मविश्वासी दुप्पट असेल व ते कोणत्याही परिस्थितीत विजय मिळवू शकतात.

दिल्ली कॅपिटल्स संघ व्यवस्थापनाला सलामी जोडीकडून भरीव कामगिरीची अपेक्षा आहे, जेणेकरून मधल्या फळीतील फलंदाजांवर अधिकाधिक धावा काढण्याचे दडपण येणार नाही, याची खात्री करायला पाहिजे.

लखनौ संघाकडून मिचेल मार्श, निकोलस पूरन व एडन मार्करामने अनेकदा उत्तम कामगिरी केली आहे.

**कर्णधार पंत, अक्षर यांचे कष्ट**

कर्णधार ऋषभ पंतचा फॉर्म लखनौ संघासाठी एक मोठी समस्या आहे. पंतने आठ सामन्यांत १०६ धावा केल्या आहेत व त्यापैकी ६३ धावा एकाच सामन्यातून आल्या आहेत. दिल्लीविरुद्ध खेळताना पंतला मिशेल स्टार्क, कुलदीप यादव, विप्रज निगम व मुकेश कुमार यांच्यासारख्या उत्कृष्ट गोलंदाजांचा सामना करावा लागेल.

पण लखनौ प्रमाणेच, दिल्ली कॅपिटल्स संघाला सुद्धा त्यांचा कर्णधार अक्षर पटेलबद्दल काही चिंता असतील.अक्षरने चांगले नेतृत्व केले आहे आणि १५९ च्या स्ट्राईक-रेटने १४० धावा केल्या आहेत. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**दिल्ली कॅपिटल्स**
**वि. लखनौ सुपर जायण्ट्स**
**स्थळ** : लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# युनायटेड व निलेश गायकवाड क्रिकेट अकादमीची विजयी सलामी

## चौदा वर्षांखालील एनजीसीए करंडक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

एनजीसीए करंडक क्रिकेट स्पर्धेत युनायटेड क्रिकेट क्लब व निलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने विजयी सलामी दिली.

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजिलेली ही स्पर्धा येथील डोणगाव रोड पुष्प जिमखानाच्या मैदानावर सोमवारी सुरु झाली. या स्पर्धेचे उद्घाटन ॲड. सिराज शेख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दैनिक तरुण भारतचे वृत्त संपादक अजितकुमार संगवे, जिल्हा क्रिकेट संघटनेचे १४ वर्षांखालील गटाचे निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे, क्रीडा संघटक सुदेश मालप, सोलापूर कृषी उत्पन्न समिती सचिव विनोद पाटील, बार्शीचे उद्योजक श्री येवणकर, बुद्धिबळ प्रशिक्षक उदय वगरे आदी उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजक निलेश गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले.





श्रीराज कबडे | स्वरीश शहा | नितकेश गज्जम | रणवीरसिंग बोमरा | विहान येवणकर

सलामीच्या सामन्यात युनायटेड क्रिकेट अकॅडमीने मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीवर ६ गडी राखून विजय मिळविला. युनायटेडने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. मॉडेलने प्रथम फलंदाजी करताना ३० षटकात ७ बाद १५२ धावा केल्या. यामध्ये रुद्र चौगुले ४०, निहार पॉल ३५, कार्तिक पाटोळे २३, झैद शेख १९ धावा केल्या. युनायटेडने विजयी लक्ष्य २६.५ षटकात चार गडी गमावात १५३ धावा करीत पूर्ण केले. यामध्ये श्रीराज कबाडे ६९ व अभय अजेला पुरकरने ३५ धावा केल्या. मॉडेलच्या आयुष भोसले व आदित्य भालकरने प्रत्येकी एक गडी बाद केला. सामनावीर व गोलंदाजाचे पारितोषिक स्वरीश शहा तर फलंदाज म्हणून श्रीराज कबाडे यांनी वैयक्तिक पारितोषिक पटकाविले.

दुसऱ्या सामन्यात एनजीएसीए क्रिकेट अकादमीने मास्टर क्रिकेट क्लबवर ५२ धावांनी मात केली. एनजीसीएने नाणफेक जिंकून ३० षटकात ९ बाद १६६ धावा केल्या. यामध्ये रणबिर सिंह ३८, ऋग्वेद पाटील २०, विहान येवणकर १७ व जयवर्धन भोसलेने ३० धावा केल्या. मास्टर क्लबकडून नितिकेश गज्जमने २० धावांत पाच बळी टिपले. बंदपट्टेने २ धावात २ गडी बाद केले. विजयी लक्ष्य गाठणाऱ्या मास्टर क्रिकेट अकॅडमी डाव २७.१ षटकात ११४ धावांत आटोपला. यात निशिकेश गज्जम १५, अभिषेक देशमुख १८, श्रीवर्धन नंदले १२, ओम धोत्रे नाबाद १६, ऋग्वेद पाटीलने २८ धावांत ३ वानकरने ८ धावांत दोन बळी, नमन माने याने ९ धावांत २ तर अनुज वाल्मिकीने एक गडी बाद केला. विहान येवणकर सामनावीर ठरला. उत्कृष्ट फलंदाजाचे रणवीर सिंग बोमरा तर उत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिके नितिकेश गज्जम याने पटकाविले.

या सामन्यासाठी पंच म्हणून चिराग शहा व शुभम मुतुर तर गुणलेखक म्हणून गणेश पवार व सीमा मॅडम यांनी काम पाहिले.

# नीरज चोप्रा क्लासिकचे स्थळ बदलले
# पाकिस्तानच्या अर्शद नदीमला निमंत्रण

## स्पर्धेचे ठिकाण पंचकुलाहून बंगळुरूला हलवले

◆ **नवी दिल्ली, २१ एप्रिल**

नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धा मूळतः २४ मे रोजी पंचकुला येथे होणार होती, मात्र आता हीच स्पर्धा त्याच तारखेला बंगळुरूच्या कांतीरवा स्टेडियममध्ये हलवण्यात आली आहे, असे भारताचा ऑलिम्पिक सुवर्णपक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने जाहीर केले.

पंचकुला येथील ज्या स्टेडियममध्ये नीरज नियमितपणे सराव करतो, त्याच ठिकाणी ही नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धा होणार होती, परंतु प्रकाश व्यवस्थेत काही समस्या आल्यामुळे तसेच मे महिन्याच्या अखेरीस उत्तर भारतातील तापमान ४० अंशांपेक्षा जास्त असेल, या कारणांमुळे नीरज क्लासोक स्पर्धा पंचकुलाहून बंगळुरूमध्ये हलविण्यात आली आहे. पंचकुलाच्या तुलनेत बंगळुरूमधील वातावरण थंड असेल.

या स्पर्धेत दोन वेळचा विश्वविजेता ॲण्डरसन पीटर्स, ऑलिम्पिक विजेता थॉमस रोहलर, ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता ज्युलियस येगो आणि वर्ल्ड लीडर कर्टिस थॉम्पसन सहभागी होणार आहे, असे नीरजने आभासी माध्यमातून सांगितले.



नीरज चोप्राने (डावीकडे) पुढील महिन्यात बंगळुरू येथे होणाऱ्या एनसी क्लासिकसाठी पाकिस्तानचा ऑलिम्पिक विजेता अर्शद नदीम (मध्यभागी) याला आमंत्रित केले

आम्ही या स्पर्धेसाठी पाकिस्तानच्या ऑलिम्पिक विजेत्या अर्शद नदीमला आमंत्रित केले असले तरी, त्यांना भारतात भाग घेण्यासाठी परवानगी मिळालेली नाही. मी अर्थातच अर्शदशी बोललो आहे. त्याने सांगितले आहे की त्याला त्याच्या प्रशिक्षकाशी याबद्दल चर्चा करावी लागेल.

मी केवळ अर्शदच नाही. मी या स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगातील सर्व अव्वल भालाफेकपटूंशी संपर्क साधला आहे. मी अर्थातच स्पर्धा करणार आहे असे नीरज म्हणाला.

नीरज चोप्राने आंतरराष्ट्रीय ॲथ्लेटिक्समध्ये जवळजवळ सर्व काही साध्य केले असेल. त्याने ऑलिम्पिक, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, राष्ट्रकुल खेळ आणि आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदके जिंकली आहेत आणि डायमंड लीग विजेता सुद्धा राहिला आहे.

भारतात आंतरराष्ट्रीय जागतिक दर्जाची स्पर्धा आणण्याची क्षमता माझा सर्वात मोठा वारसा असेल, असे तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

### सीएसके पुढील हंगामासाठी खेळाडू शोधण्याचा प्रयत्न करणार : फ्लेमिंग

◆ **मुंबई, २१ एप्रिल**

चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) संघाला या वर्षीच्या इंडियन प्रीमियर लीगमधील स्थानाबद्दल चांगली जाणीव आहे, परंतु पाच वेळा विजेता पुढील हंगामासाठी खेळाडू शोधण्यात कोणतीही कसर सोडणार नाहीत असे सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग म्हणाले

मुंबई इंडियन्सने रविवारी येथे नऊ गड्यांनी पराभव करून महेंद्र सिंह धोनीच्या नेतृत्वाखालील सीएसके संघाला गुणतालिकेत तळाशी ठेवले. सीएसकेला आठ सामन्यांमधील सहावा पराभव पत्करावा लागला. सीएसकेने ५ बाद १७६ धावा केल्या व मुंबईसमोर १७७ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. रोहित शर्मा (नाबाद ७६) व सूर्यकुमार यादवने (नाबाद ६८) दमदार फलंदाजी करत मुंबईचा विजय साकार केला.

जेव्हा तुम्ही खालच्या पातळीवर खेळत असता तेव्हा स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्साही असणे कठीण असते. सीएसके अशा अनुभवांमधून शिकून आपले नशीब बदलण्याचा प्रयत्न करेल, से ते म्हणाले.

सीएसके संघाने २०२२ मध्ये नववे स्थान मिळवल्यानंतर २०२३ मध्ये जेतेपद पटकावले होते. (वृत्तसंस्था)





# सिंहगड स्कूलच्या तिघांची राष्ट्रीय शालेय गतका स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ एप्रिल -**

स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडियाअंतर्गत २२ ते २७ एप्रिल दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ६८व्या राष्ट्रीय शालेय राष्ट्रीय गतका स्पर्धेसाठी सिंहगड पब्लिक स्कूलच्या दोघांची निवड झाली. १९ वर्षे वयोगटात सागर नायर व शिवप्रिय सावंत यांची फरीसोटी या प्रकारात निवड झाली. तसेच १७ वर्षे वयोगट कार्तिकी कतारे हिची सिंगल सोटी या प्रकारात निवड झाली.

त्यांच्या यशाबद्दल संस्थापक एम. एन. नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, प्राचार्य स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर आदींनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# अनीश सहस्त्रबुद्धे आयपीएल सामन्यात पंच

## प्रथम श्रेणीचे सोलापूरचे पहिले पंच, आतापर्यंत ११ सामन्यात पंच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

आयपीएलच्या सामन्यात पंचाची भूमिका बजावणारे येथील अनिष सहस्त्रबुद्धे हे पहिले पंच ठरले आहेत. सोमवारी कोलकाता येथील ईडन गार्डन स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध गुजरात टायटन्स या सामन्यात त्यांनी पंचाची भूमिका बजावली आहे.

अनीश हे सोलापूरातले प्रथम श्रेणीचे पहिलेच पंच आहेत. गुवाहाटीत झारखंड विरुद्ध छत्तीसगड या पहिल्या रणजी सामन्यापासून त्यांनी आपली प्रथमश्रेणी पंचाची कारकीर्द सुरू केली. तेथेच झारखंड विरुद्ध दिल्ली आणि तामिळनाडून हे तीन सामने केले. महिलांच्या टी-२०च्या सहा सामन्यासह यंदाच्या वर्षात त्यांनी ११ वेळा पंच म्हणून काम केले. त्यानंतर प्रथमच आयपीएलच्या सामन्यात त्यांना संधी मिळाली आहे.

क्रिकेटची त्यांना आवड लहानपणापासूनच होती. यूनायटेड क्रिकेट क्लबचे संजय मोरे यांच्याकडे त्यांनी क्रिकेटचे प्रशिक्षण घेतलं. दहावीची परीक्षा झाली आणि दहावीच्या परीक्षेनंतर क्रिकेटमधल्या आवडीमुळे तेव्हा क्रिकेट पंच परीक्षा परीक्षा दिली. तेव्हा महाराष्ट्रातल्या सगळ्यात लहान वयातल्या क्रिकेट पंच म्हणून त्यांची निवड झाली आणि तिथून क्रिकेटची सुरुवात झाली तेव्हा ते फक्त सोळा वर्षांचे होते.

### क्रिकेट संघटनेमुळे माझी भरारी : अनीश

दैनिक तरुण भारतशी बोलताना अनिश म्हणाले, ''महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनमध्ये पुण्याच्या बाहेरचे फार कमी बीसीसीआयचे प्रथम श्रेणीचे पंच आहेत. पुण्यात शिक्षणाला गेलो आणि सामने करीत राहिलो. तेव्हा प्राथमिक सामने केले. तिथे शिकायला गेलो आणि तिथे मला खूप चांगली माहिती मिळाली, स्कोप मिळाला. २०१० मध्ये बीसीसीआय लेव्हल वन आणि २०१५ मध्ये लेव्हल २ परीक्षा उत्तीर्ण झालो. ही सगळ्यात शेवटची परीक्षा असते. सहा-सात वर्षांच्या अनुभवानंतर रणजी ट्रॉफी सामन्यासाठी निवड झाली. माझ्या या पंच कामगिरीची दखल भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने रणजी सामना देत मला प्रथम श्रेणी पंचाचा दर्जा दिला. यासाठी मला सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रेसिडेंट दिलीप माने, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, संयुक्त सचिव धैर्यशील मोहिते-पाटील व चंद्रकांत रेंबर्सू, खजिनदार संतोष बडवे यांचे सहकार्य लाभले.''



## महत्वाचे...



### 'गुरूकृपा'मध्ये आयटीआयच्या प्रशिक्षणार्थ्यांना ऑनजॉब प्रशिक्षण

**सोलापूर,दि.२१ एप्रिल-**

येथील मरिआई चौकातील गुरूकृपा इलेक्ट्रीकल वर्क्स येथे महात्मा बसवेश्वर औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूरच्या तारतंत्री या व्यवसायातील प्रशिक्षणार्थींना ऑन जॉब ट्रेनिंग देण्यात आले. आयटीआय मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव येण्यासाठी हा उपक्रम राबवला गेला. गुरूकृपा इलेक्ट्रीकल वर्क्सचे युवराज जगताप यांनी या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामातील बारकावे समजावून सांगितले. याशिवाय त्यांच्या शंकांचे निरसन केले.

### दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी अब्दुल मतीन वळसंसगकर यांची एकमताने निवड

**सोलापूर,दि.२१ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघटनेची मीटिंग जि.प. दक्षिण सोलापूर येथे घेण्यात आली. मीटींगच्या अध्यक्षस्थानी राज्य उपाध्यक्ष लिंबराज जाधव हे होते. यावेळी जिल्हा अध्यक्ष राजाराम चव्हाण यांनी मीटिंगचे प्रास्ताविक केले. आज दक्षिण सोलापूर तालुक्याच्या अध्यक्षस्थानी अब्दुलमतीन वळसंगकर यांची निवड एकमताने करण्यात आली. मीटींगमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. तसेच शिक्षणाधिकारी कादर शेख यांची समक्ष भेट घेऊन सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या प्रश्ना संदर्भात निवेदन देऊन सकारात्मक चर्चा करण्यात आली. आपले प्रश्न लवकरात लवकर सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. असे सांगितले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष रामचंद्र पाटील, श्रीमंत गुंड, पवार सर, शिंगोटे सर, तालुकाध्यक्ष सुधीर नाचणे, रावसाहेब भालेराव, भारत हेंबाडे, मोठ्या संख्येने तालुका पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. तसेच दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी अब्दुल मतीन वळसनकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सोलापूर जिल्हा परिषद कक्षअधिकारी सचिन साळुंखे यांनी अभिनंदन केले.

## निधन वृत्त...

### आसिफ मुजावर



**सोलापूर,दि.२१ एप्रिल-**

जेलरोड पोलीस ठाण्यातील पोलीस हवलदार आसिफ महेबूब मुजावर (वय ४१ वर्ष, रा. १४ आदर्श नगर, लक्ष्मीनारायण टॉकीज मागे, एमआयडीसी रोड, सोलापूर ) यांचे अल्पशा आजाराने रविवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील जडेसाब मुस्लिम कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. कब्रस्तानमध्ये शहर पोलीस दलातर्फे तीन वेळा हवेत गोळ्या झाडून सशस्त्र मानवंदना देण्यात आली. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी ,चार भाऊ असा परिवार आहे. आसिफ मुजावर हे मार्च २००३ साली शहर पोलीस दलात भरती झाले होते. जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी १०० मीटर धावणे, लांब उडी, ट्रिपल जंप प्रकारात अनेक पारितोषिके प्राप्त केली.

### संतोष वाघमोडे



**सदाशिवनगर,दि.२१ एप्रिल-**

माळशिरस ग्रामपंचायतीचे माजी सदस्य, माळशिरस प्रशालेचे संचालक व भारतीय जनता पार्टीचे माळशिरस शहराध्यक्ष संतोष गंगाराम वाघमोडे (वय ४०) यांचे आज अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, भाऊ, भावजय असा परिवार आहे.

### अशोक मादास



**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

दत्तनगर येथील रहिवासी अशोक यल्लप्पा मादास (वय ७०) यांचे सोमवार, दि. २१ एप्रिल रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### कृष्णाहरी वड्डेपल्ली



**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

अशोक चौक येथील रहिवाशी कृष्णाहरी तुकाराम वड्डेपल्ली यांचे दि.२१ एप्रिल रोजी संध्याकाळी ६.२२ वाजता दुःखद निधन झाले आहे. अंत्ययात्रा दि. २२ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता अशोक चौक येथील त्यांच्या राहत्या घरातून निघणार आहे.

# आषाढी वारीत 'स्वच्छ पालखी' संकल्पना राबविणार

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन**

**पंढरपूरात वारीच्या पूर्वतयारीसाठी घेतली बैठक**

**आमदारांसह जिल्हाधिकारी यांचीही उपस्थित**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ एप्रिल -**

यंदाच्या आषाढी वारीच्या अनुषंगाने पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहरातील पालखीचा विसावा व मुक्काम याठिकाणी शासनाच्यावतीने वारकरी व भाविकांना उत्कृष्ठ सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच यंदाच्या आषाढी वारीत पालखीतळावरून पालखी विसावा, मुक्काम घेऊन गेल्यानंतर स्वच्छ पालखी संकल्पनेअंतर्गत तत्काळ स्वच्छता मोहीम स्वतंत्रपणे राबवली जाणार असल्याची माहिती ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी सोहळा २०२५ च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, गटविकास अधिकारी सुशील संसारे तसेच अन्य विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने पालखी मार्ग, पालखीतळ, मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, शौचालये, स्वच्छता तसेच अन्य अनुषंगिक सर्व सुविधा प्रशासनाने वारकऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. या वारीमध्ये कुठेही अस्वच्छता दिसली नाही पाहिजे या अनुषंगाने जिल्हा परिषद व नगरपालिका प्रशासनाने योग्य ती उपाययोजना राबवावी निर्देश त्यांनी दिले. प्रशासनाने मागील दोन-तीन आषाढी वारीच्या अनुषंगाने त्यांना आलेल्या अडीअडचणीचा प्रथम अभ्यास करावा व त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना सुचवाव्यात. वारी कालावधीत कोणत्याही प्रकारे वारकरी, भाविक, पालख्या व दिंड्या यांना अडचण येणार नाही या दृष्टीने नियोजन करावे. पत्रा शेड, भक्ती सागर, वाळवंट या परिसरात शौचालयांची सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण करावी. पालखीतळ विसावा मुक्काम ठिकाणी पालखी दिंड्या जाण्यासाठी पक्के रस्ते तयार करावेत. त्यासाठी आवश्यक निधीची मागणी करावी. तसेच वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सर्व सोयी सुविधा वारीपूर्वी किमान एक महिना अगोदर पूर्ण कराव्यात. शौचालयाची साफसफाई करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सफाई कर्मचारी वर्ग नियुक्त करावा. महसूल, पोलीस व नगरपालिका विभागाने एकत्रित येऊन पालखी मार्ग व शहरातील अतिक्रमणे त्वरित काढावीत अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या.

पंढरपूर शहरात सर्व ठिकाणी वारकरी व भाविकांना दर्शन रांग, वाळवंट, ६५ एकर, पत्रा शेड तसेच शहरातील अन्य ठिकाणे याची माहिती व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर दिशादर्शक सूचनाफलक तयार करावेत व ते योग्य उंचीवर, दर्शनी भागात लावावेत. पंढरपूर शहराची स्वच्छता करून घ्यावी. एसटी स्टँडवर भाविक प्रवाशांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

**महत्त्वाचे निर्णय**

* आषाढी वारी २०२५ च्या अनुषंगाने पालखी तळ, विसावा व मुक्काम या ठिकाणी उत्कृष्ट सुविधा उपलब्ध कराव्यात या सर्व सुविधा एक महिना अगोदर झाल्या पाहिजेत.
* मागील दोन-तीन वर्षात आषाढी वारीत प्रशासनाला आलेल्या अडीअडचणीची माहिती घेऊन त्यावर प्रथम उपाययोजना कराव्यात.
* वारीत मोठ्या प्रमाणावर गर्दी होते वारकरी, भाविकांना दर्शन रांग, ६५ एकर, वाळवंट तसेच शहरात विविध ठिकाणी जाण्यासाठी दिशादर्शक सूचना फलक दर्शनी भागात व उंचीवर लावावेत.

**अरण विकास आराखड्यासाठी जमिनीचे अधिग्रहण त्वरित करावे**

श्री संत सावता माळी महाराज संजीवन समाधी अरण तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी आवश्यक असलेल्या चार एकर जमिनीचे भूसंपादन प्रशासनाने वेगाने करावे. अरण विकास आराखड्यासाठी शंभर कोटीचा निधी असून जमिनीचे अधिग्रहण करण्यासाठी वीस कोटींचा निधी ठेवण्यात आलेला आहे. या अंतर्गत विकास कामाचे मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते लवकरच भूमिपूजन करण्याचे प्रस्तावित असल्याचेही त्यांनी सांगितले. जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे समारक बांधणे तसेच श्री संत चोखामेळा यांचे स्मारक बांधणे यासाठी आवश्यक बाबी शासन स्तरावर करणे आवश्यक असल्याने याबाबतची लवकरच बैठक मुंबई येथे लावण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# भारतीय संविधान हे सर्वसमावेशक

**धर्मदाय आयुक्त संजय पाईकराव; पंचशिल रत्न पुरस्कारांचे वितरण**



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ एप्रिल-**

भारतीय संविधान हे समावेशक आहे देशाची राज्यघटना चालवणारे लोकप्रतिनिधी कसे आहेत यावर जनतेचा विकास अवलंबून आहे असे विचार धर्मदाय आयुक्त संजय पाईकराव यांनी व्यक्त केले.

ते येथील पंचशिल मंडळाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित पंचशिल रत्न पुरस्कार वितरण सोहळा व प्रशासकीय क्षेत्रातील आदर्श कर्मचारी पुरस्कार वितरण कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी मोहोळ नागरी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. कौशिक गायकवाड, रिपाई पश्चिम महाराष्ट्राचे नेते नागनाथ आहोळ, विद्युत मंडळाचे अभियंता राजेश मदने, रमेश बारसकर, मंडळाचे अध्यक्ष शशिकांत ठोकळे, अशोक पाचकुडवे, कुमार ढवळे, संजय आठवले, संदीप सोनवणे उपस्थित होते. प्रा.डॉ. कांबळे यांचे भाषण झाले. प्रास्ताविक हनुमंत भडकवाड यांनी केले. सूत्रसंचालन सुनील गायकवाड व प्रा.प्रकाश शिंदे यांनी केले. आभार शिवाजी जगताप यांनी मानले. सुरज पाचकुडवे, सचिन सोनवणे, सुदर्शन ठोकळे, पंकज भडकवाड, विशाल रोडे, ऋषिकेश जगताप, शर्मिला आवारे, दीपक मडीखांबे, आदर्श ढवळे, आदित्य आठवले, अक्षय आठवले, प्रशांत पाचकुडवे, विनोद रोडे आदींनी परिश्रम घेतले.

**यांना मिळाला पुरस्कार**

आंबेजोगाईचे प्रा. डॉ. कमलाकर कांबळे यांना पंचशील रत्न पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. तर प्रशासकीय क्षेत्रातील आदर्श कर्मचारी पुरस्कार शामराव गजघाटे (शिक्षक), बिभिषण खंदारे (शिक्षक),विजयकुमार तिकुटे (सह नोंदणी सहाय्यक), रोहित कांबळे (लेखापाल न.प.म ोहोळ), अजिज आवटे (महसूल कर्मचारी), विकास वाघमोडे (वधुत सहाय्यक महावितरण), सतीश ईखे (वरिष्ठ तंत्रज्ञ महावितरण), स्नेहल काळे (ग्रामसेवक पं.स मोहोळ), संतोष लादे (ग्राम सेवक पं.स मोहोळ), सुनाबी शेख (आय सी टी सी ग्रामीण रूग्णालय मोहोळ), हर्षनंद नामदेराव तायडे (तलाटी मोहोळ ), आणि युवा जागृती मंच सामाजिक संस्था मोहोळ यांना देण्यात आले.

# लायन्स क्लब शाळेचे मंथन परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २१ एप्रिल**

येथील लायन्स क्लब शाळेच्या विदयार्थ्यांनी मंथन परिक्षेत यश मिळवले. शंभूराजे शामकुमार भुजबळ या विद्यार्थ्याने अक्कलकोट केंद्रात प्रथम, जिल्ह्यात सातवा तर राज्यात बारावा क्रमांक पटकावला. शौर्य श्याम भोसले याने केंद्रात दुसरा, जिल्ह्यात १९ वा, राज्यात २४ वा क्रमांक पटकावला. सार्वम तानाजी चव्हाण यानेकेंद्रात प्रथम जिल्ह्यात सातवा व राज्यात बारावा क्रमांक पटकावला सिद्धेश्वर दादाराव भोंग ( दुसरी) या विद्यार्थ्यांने अक्कलकोट केंद्रात दुसरा जिल्ह्यात आठवा तर राज्यात तेरावा क्रमांक पटकावला स्मिथ महेश बिराजदार या विद्यार्थ्यांने केंद्रात चौथा जिल्ह्यात तेरावा व राज्यात १८ वा क्रमांक पटकावला बसवराज इरप्पा बसरगाव (तिसरी)या विद्यार्थिनी अक्कलकोट केंद्रातून तिसरा जिल्ह्यात २४ वा राज्यात २९ वा क्रमांक पटकावला. केदार सोमनाथ सांगवे चौथी) या विद्यार्थ्याने अक्कलकोट केंद्रात तिसरा जिल्ह्यात विसावा तर राज्यात २५ वा क्रमांक पटकावला.आराध्या राजेंद्र साखरे या विद्यार्थिनीने केंद्रात सहावा जिल्ह्यात पंचविसावा तर राज्यात ३४ वा क्रमांक पटकावला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका श्रीदेवी खुने , शुभांगी गडसिंग , कलशेट्टी हरवाळकर बिराजदार ,माळी यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे लायन्स क्लबचे अध्यक्ष हत्ते ,उपाध्यक्ष सुभाष गडसिंग व सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.



### अक्कलकोट येथे साळुंखे परिवाराकडून अन्नदान

**अक्कलकोट :** कै. विठ्ठल साळुंखे, रुक्मिणी साळूंखे, भिमराव साळुंखे, गुजाबाई साळुंखे यांच्या पुण्यतिथीनिमित्त साळुंखे परिवाराकडून १०१ गरजू लोकांना अन्न वाटप करण्यात आले. यावेळी लाला साळुंखे, हिरा बदपट्टे, किरण मोरे, नागेश घोडके आदी उपस्थित होते.

# माळशिरसमध्ये माने-पाटील, देशमुख व मोहिते भाजपाचे मंडल अध्यक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते,दि.२१ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनांत व माळशिरसचे माजी आ राम सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि २० एप्रिल रोजी भाजपा माळशिरस विधानसभा बैठक संपन्न संपन्न झाली. या बैठकीत माळशिरस विधानसभेतील भाजपा मंडल अध्यक्ष निवडी घोषित करण्यात आल्या असून अकलूज मंडल अध्यक्षपदी सुजयसिंह माने-पाटील, माळशिरस मंडल अध्यक्षपदी नितीन मोहिते-माळी यांची तर नातेपुते मंडल



अध्यक्षपदी संजय देशमुख यांची निवड करण्यात आली. भाजपाच्या नवीन ध्येय धोरणानुसार तीनही मंडलाध्यक्षपदी युवकांना संधी देत जातीय समीकरण देखील जपल्याचे दिसून येत आहे. सातत्याने भाजपासाठी योगदान देत विधानसभेच्या निवडणुकीत भाजपासाठी झोकून देत ज्यांनी काम केले अशांना या निवडीत संधी मिळाल्याचे दिसून आले.

मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे व कार्याध्यक्ष चव्हाण यांच्या नेतृत्वात व मा आ राम सातपुते, जिल्हाध्यक्ष केदार यांच्या मार्गदर्शनाखाली मागील निवडणुकीत सर्वांच्या सहकार्याने भाजपा म ाळशिरस तालुक्यातील घराघरात पोहोचली. त्याचे फलित मागील निवडणुकीत दिसून आले आहे. यापुढेही सर्वांच्या सहकार्याने भाजपाने जी जबाबदारी दिलेली आहे ती यशस्वीपणे पार पाडणार आहे.

**-सुजयसिंह माने-पाटील, नवनिर्वाचित भाजपा अकलूज मंडल अध्यक्ष.**


# सोलापूरकर अद्याप बस योजनेच्या प्रतीक्षेत!

**कधी मिळणार ई-बस सुविधा?**

**चिमणीसाठी आंदोलन करणारे, बस सेवेसाठीही आंदोलन का करत नाहीत?**

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल -**

केंद्र शासनाच्या योजनेतून सोलापूरसाठी १०० ई-बस मंजूर आहेत. पण त्या बस अजून कधी सुरू होणार, असा सवाल संतप्त सोलापूरकर विचारत आहेत. यापूर्वी देखील केंद्र सरकारच्या योजनेतून सोलापूर महापालिकेला बसगाड्या मिळाल्या होत्या. तांत्रिक बिघाडामुळे त्या गाड्या फार काळ टिकल्या नाहीत. प्रवाशांना होणारी गैरसोय लक्षात घेता महापालिका प्रशासनाने तात्काळ नवीन योजनेच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी आता नागरिकांमधून होत आहे.



**रस्ता हरवलेली व्यवस्था**
भाग-५

शहराच्या रस्त्यांवर सध्या २० ते २५ सिटी बस धावत असल्या, तरी त्या शहराच्या गरजांपुढे अपुऱ्या ठरत आहेत. सोलापूरच्या नागरिकांसाठी या गाड्या सेवा देण्यात अपयशी ठरत आहेत. परिणामी कामगार, विद्यार्थी, गृहिणी आणि ज्येष्ठ नागरिक हे सगळेच रोज रिक्षा, टमटम आणि खासगी वाहनांच्या महागड्या आणि असुरक्षित प्रवासावरच अवलंबून आहेत.

**चिमणीसाठी आंदोलन करणारे बस सेवेसाठीही रस्त्यावर उतरतील का?**

सोलापूरच्या विमानसेवेसाठी अनेक आंदोलनं झाली. विमानसेवेसाठी अडथळा ठरणाऱ्या चिमणी पाडण्यासाठी आंदोलन झालं. पण चिमणी पाडून कित्येक महिने उलटले, तरी अद्याप विमानसेवा सुरू नाही. तसेच आता बस सेवेसाठी देखील आंदोलन करणं गरजेचे आहे, अस मत काही नागरिक करत आहेत. कारण सरकार आणि प्रशासन, दोघांचीही उदासीनता पाहता, लोकशक्तीनेच आवाज उठवण्याची वेळ आली आहे, असं नागरिकांना वाटू लागलंय.

**मी टॅक्सपेअर - कर भरतोय, सिटी बस आहे, पण सेवा कुठे आहे?**

मनपाकडे सोलापूरच्या नागरिकांकडून दरवर्षी कोट्यवधींचा कर जमा होतो. मात्र त्याचा योग्य वापर होतो का, हे पाहणं गरजेचं आहे. नागरिक आता मीटॅक्सपेअर हॅशटॅग वापरून सोशल मीडियावर आपला रोष व्यक्त करत आहेत. नागरिकांच्या टॅक्सचा उपयोग जनतेसाठी व्हावा असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

**२५% खर्च फक्त प्रवासासाठी!**

सार्वजनिक वाहतूक सुविधा अपुऱ्या असल्याने मजुरांना खाजगी रिक्षावाल्यांकडून अव्वाच्या सव्वा भाडे मोजावे लागते. सोलापुरात रोज तीनशे ते पाचशे रुपये मिळवणाऱ्या मजुराच्या कमाईतून, ५० ते १०० रुपये केवळ प्रवासात खर्च होतात.

**सक्रिय नागरी कृती समिती हवी**

आज सोलापूरसारख्या मोठ्या शहराला एक ठोस आणि सक्रिय नागरी कृती समिती हवी आहे. शहराच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारी, मनपा, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना जबाबदार धरू शकणारी ही संघटना हवीच.

**राजकीय इच्छाशक्तीचा अभाव**

सोलापूरमधून एक मुख्यमंत्री, अनेक मंत्री आणि नेते झाले. पण शहराच्या गरजा, समस्या आणि वाहतूक व्यवस्थेतील अडचणी सोडवण्याबाबत कोणतीही दूरदृष्टी वा कृती दिसत नाही. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिकसारख्या शहरांमध्ये स्थानिक नेते प्रगतीसाठी धडपडताना दिसतात. सोलापूरमध्ये मात्र केवळ घोषणांची झुलूस आणि प्रशासनाची उदासीनता पाहायला मिळते.

**बस आधी की विमान सेवा? उपरोधात नागरिकांचा सवाल**

अनेक आंदोलनं झाल्यानंतरदेखील कित्येक महिन्यांपासून विमानसेवा सुरू नाही. त्याआधी कित्येक वर्षांपासून बससेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे काही नागरिक सोशल मीडियावर भावनिक पोस्ट टाकत आहेत.

# सोलापूर बनतेय 'शो'लापूर; तापमानाचा आलेख ४३ अंशावर

### शीतपेयांच्या दुकानात नागरिकांची वाढती गर्दी

### ग्रीन नेट खरेदीकडे वाढतोय भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

सोलापूरच्या तापमानाचा आलेख गेल्या काही दिवसांपासून चढाच राहिलेला आहे. गता आठवड्यात राज्यामध्ये सोलापुरात सर्वाधिक तापमानाची नोंद केली गेली. एप्रिलमध्ये उन्हाचा पारा चांगलाच वाढत असल्याने दररोज गजबजलेल्या गहराच्या मुख्य बाजारपेठामध्ये शुकशुकाट दिसून येत आहे. मार्च महिन्यापासून तापमानात मोठी वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले आहे. १५ एप्रिल रोजी या वर्षातील सर्वात जास्त तापमान म्हणजे ४३.२ एवढी नोंद झाली होती. रविवारी तापमानाचा पारा पुन्हा ४३ पर्यंत वाढला आहे. मागील आठवड्यात आवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने तापमानात घट झाली होती. मात्र, दोन दिवसांपासून पुन्हा सूर्य आग ओकत असल्याने अंगाची लाहीलाही होत आहे. अनेक ग्राहक दुपारी खरेदी करणे टाळत असल्याचे सध्याचे चित्र बाजारपेठेत दिसून येत आहे. सराफ बाजार, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार, नवी पेठ येथे उन्हाचा मोठा परिणाम दिसून येत आहे. विक्रेत्यांना सायंकाळपर्यंत ग्राहकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. येत्या काही दिवसांत पारा आणखी वाढण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे.






**सोलापूर : सूर्य चांगलाच कोपल्याने सोमवारी तापमान ४३ अंशाच्यावर होते. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठांमध्ये हिरव्या कपड्याला मागणी वाढली आहे. दुसऱ्या छायाचित्रात शीतपेयाची मागणी वाढली आहे. (छाया : केवल तिवारी)**

#### शीतपेयांच्या दुकानात गर्दी

उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी शीतपेयांचा आधार घेतला जात आहे. लस्सी, ताकासह लिंबू सरबत, उसाचा रस या पेयांच्या मागणीत लक्षणीय वाढ झालेली आहे. बाजारपेठेत शुकशुकाट असताना या पेयविक्री करणाऱ्या दुकानांमध्ये मात्र ग्राहकांची गर्दी पाहायला मिळत आहे.

#### शेती कामावर परिणाम

सध्या रब्बी हंगाम संपला असून, शेतकरी येणाऱ्या खरी हंगामासाठी शेत मशागतीच्या कामाकडे वळला आहेत. शेतकरी नांगरणी, वखरणी, शेणखत टाकण्याबरोबरच, कपाशी पहाटे वेचणीवर भर देत आहेत. मात्र, उन्हामुळे शेती कामावरही परिणाम होत आहे. सकाळपासूनच उन्हाचे चटके बसण्यास सुरुवात होत असल्याने शेतमजूर सकाळी आणि सायंकाळच्या सत्रात काम करण्यावर भर देत असल्याची स्थिती दिसून येत आहे.

#### ग्रीन नेट लावण्यावर भर

दिवसा असलेल्या तुरळक ग्राहक वर्गाकडून वाढत्या उन्हाच्या झळापासून बचावासाठी टोपी, स्कार्फ, उपरणे अशा वस्तूंचा आधार घेतला जात आहे. काही बाजारपेठांमध्ये ग्राहकांना उन्हाच्या तडाख्यापन बचाव करण्यासाठी ग्रीन नेट लावण्यात आलेली आहे.

## महत्वाचे...

### जिल्ह्यात आज १ हजार २५ गावकारभाऱ्यांची आरक्षण सोडत


**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील १०२५ ग्रामपंचायतींच्या सरपंच आरक्षणाची सोडत दि. २२ एप्रिलला काढण्यात येणार आहे. अकराही तालुक्यांमध्ये तहसीलदारांच्या अध्यक्षतेत दुपारी बारा वाजता एका विशेष सभेत ही प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. त्यामुळे राजकीय वर्तुळाचे लक्ष या सोडतीकडे लागले आहे. दरम्यान, या आरक्षणामध्ये महिला वर्गाला ५० टक्के संधी दिली आहे. यामुळे ५० टक्के गावांवर महिलाराजच दिसून येणार आहे. शासनाने राज्यातील २०२५ ते २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या बिगरअनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामपंचायतींमधील सरपंचाच्या जागा आरक्षणनिहाय अंतिम केल्या. या जागांमध्ये जिल्ह्यातील १०२५ गावांचा समावेश असून, गेल्या महिन्यात त्याबाबतचे आदेश काढण्यात आले आहेत. शासनाकडून प्रवर्गनिहाय जागांची संख्या अंतिम केल्यानंतर प्रत्यक्षात आता गावनिहाय सरपंचपदासाठी आरक्षण सोडत प्रक्रिया राबविली जाणार आहे. हे आरक्षण काढताना ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव राहणार आहेत. यामध्ये करमाळा तालुक्यातील १०८ सरपंच पदे आहेत. तर माढा १०८, बार्शी १२९, उत्तर सोलापूर ३६, मोहोळ ९०, पंढरपूर ९५, माळशिरस १०३, मंगळवेढा ७९, सांगोला ७६, दक्षिण सोलापूर ८३, आणि अक्कलकोट ११८ अशा एकूण १०२५ जागांसाठी हे सरपंचपदाचे आरक्षण सोडत आहे. हे आरक्षण काढणे कामी संबंधित तहसीलदारांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

### ठेवूया मुक्या पक्षांना दाणा-पाणी, पाठवू या आनंदाची राज्य सेल्फी स्पर्धा

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघम यांच्या संयुक्त विद्यमाने ठेवूया मुक्या पक्षांना दाणा - पाणी, पाठवू या आनंदाची सेल्फी स्पर्धा दि. २३ ते ३० एप्रिल पर्यंत आयोजित केली आहे. जेव्हा पक्षी तुम्ही ठेवलेल्या जागी येऊन दाणा खातील, पाणी पीत असतील तेव्हाचा सेल्फी फोटो काढा. सेल्फी फोटो पाठवा. सहभागी होण्यासाठी ही राज्य स्पर्धा नि:शुल्क (विनामूल्य) आहे, अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा व सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांनी दिली आहे. सेल्फी फोटो काढताना, पक्षी आणि दाणा-पाण्याची वाटी दिसले पाहिजे. अशा फोटोनांच स्पर्धेत सहभागी करण्यात येईल. सेल्फी फोटो +९१९३७०४५४५९ या व्हाटसअॅप क्रमांकावर पाठवायचे आहेत. पाठवताना संपूर्ण नांव, पत्ता व मोबाइल नंबर सुध्दा पाठवावेत. अधिक माहितीसाठी ९०२१५५१४३१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावेत,असे आवाहन फाउंडेशनचे उपाध्यक्ष श्रीनिवास कामूर्ती, नागेश पासकंटी, नागेश सरगम यांनी केले आहे.



#### अशी आहेत स्पर्धेचे बक्षीसे

प्रथम - नेकलेस + कर्णफुल (शेखर इगे यांच्याकडून), द्वितीय - डिनर सेट, तृतीय - इस्त्री, चतुर्थ- बास्केट (लहान) लक्ष्मण दोंतूल यांच्या तर्फे. उत्तेजनार्थ : प्रथम - किचन भांडी, द्वितीय - डिनर सेट, तृतीय - टिफीन बॉक्स(राजकुमार गुजर यांच्या वतीने).

## शिक्षणाधिकारी यांच्या विरोधात आंदोलन



### संस्थापक व मुख्याध्यापकांना पाठीशी घालत असल्याचे आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात वारंवार लेखी तक्रार करूनही कर्मचाऱ्यांवर अन्याय करणाऱ्या संस्थापक व मुख्याध्यापकांवर कारवाई होत नसल्याने प्रोटॉन शिक्षक संघटनेच्या वतीने माध्यमिक शिक्षण अधिकारी सचिन जगताप यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या सभासदांचे प्रश्न सोडविण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सहविचार सभेचे पत्र दिले. परंतु पत्र देऊनही संस्थापक व मुख्याध्यापक कार्यालयात त्या दिवशी हजर नव्हते. यामुळे संघटनेच्या सभासदांचे प्रश्न प्रलंबित आहेत. शिक्षण अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपासमार होत आहे. शिक्षणाधिकारी जगताप हे संबंधित कर्मचाऱ्यांवर अन्याय करणाऱ्या संस्थापक व मुख्याध्यापक यांना पाठीशी घालून कर्मचाऱ्यांवर अन्याय करत आहेत. त्यामुळे शिक्षण अधिकाऱ्यांविरोधात आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी संघटनेचे राज्य सचिव सुधीर कांबळे, जिल्हा कार्याध्यक्ष अमन कोळी, महासचिव संतोष कांबळे, मिलिंद खंदारे, वैभव शेटे आदी उपस्थित होते.

#### सहा कर्मचाऱ्यांचे समायोजन करा

सोलापूर येथील सुभाषचंद्र बोस प्रशालेतील बसवराज सवळतोट, प्रशांत पटणे, मच्छिंद्र बिंदगे, श्रीशैल कलशेट्टी, परमेश्वर दोड्याळ व सिध्दारा बिराजदार हे ६ कर्मचारी व बेगम कमरूनिसा हायस्कूल येथील लिपिक जमील कोतकुंडे आदिंचे वेतनवाढ, शाळेत रूजू करून घेणे, शाळेवर प्रशासक नेमून समायोजन करणे या मागण्यांसाठी प्रोटॉन शिक्षक संघटनेकडून आंदोलन सुरू आहे.



**सोलापूर : सिद्धेश्वर मंदिरात सोमवारी कावड पूजा करण्यात आली. यावेळी अनेक भक्त उपस्थित होते.**

## मणिपुरी विद्यार्थ्यांच्या नृत्याविष्काराने सोलापुरकर मंत्रमुग्ध

### ज्ञान प्रबोधिनीत सहनिवासातील विद्यार्थ्यांची कला, क्रीडा, साहस प्रात्यक्षिके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२१ एप्रिल-**

येथील ज्ञान प्रबोधिनी संस्थेत सहनिवासातील मणिपुरी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, कुस्ती, व्हायोलिन, बासरी, सतार, संवादिनी वादनासह 'आविष्कार मणिपुरी स्पंदनांचा' कार्यक्रमाने सोलापूरकरांना मंत्रमुग्ध केले.

यामध्ये पुर्वांचलातील १९ विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रशालेचे आजी-माजी विद्यार्थी, युवक-युवती, शिक्षक, पालक, हितचिंतक असे २०० जण उपस्थित होते. पद्य, अनंतदादांचे मनोगत व दीपप्रज्वलनानंतर सादरीकरणास सुरुवात झाली. मुलांनी या वर्षात अवगत केलेल्या कला-कौशल्यांचे सादरीकरण केले. मणिपुरी वनवासी भागातील पारंपरिक वेशभूषेसह हातात भाला घेऊन ठेक्यावर केलेले नृत्य चित्तवेधक ठरले. सूरमयी स्वरांची बरसात करणारे व्हायोलिन, मधुरतम स्वर उमटवणारी बासरी, स्वरांचा झंकार करणारी सतार, स्वरांनी संवाद साधणारी संवादिनी, ह्रदयाला भिडणारे बोल काढणारा तबला अशा वादनातून विद्यार्थ्यांनी स्वरांची जादू दाखविली. नाटकामध्ये श्रवणीय मराठीतून वाक्यफेक करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. योगातून शरीराची लवचिकता तर कलंजर धोबीपछाड असे डाव मारत केलेल्या कुस्तीतून शरीराची बळकटी प्रदर्शित केली. बुद्धिबळ व विज्ञान प्रयोगातून आपली बौद्धिक चमक दाखवली. कार्यक्रमाच्या शेवटी 'ने मजसी ने परत मातृभूमीला' या गीताचे गायन करून भारतभूमीवरचे प्रेम व्यक्त केले.सभेच्या कार्यक्रमात संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. इरेश स्वामी यांनी मुलांचे भरभरून कौतुक केले. सर्व प्रशिक्षकांचा सन्मान केला. सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी यांनी सर्व देणगीदारांचे आभार मानले.



## शहरातील भाजपाच्या मंडल अध्यक्ष निवडी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी हे जगातील सर्वात मोठे राजकीय संघटन असून, संपूर्ण देशभर भाजपाचे सदस्यता नोंदणी अभियान मध्यंतरी झाले आणि यास अभूतपूर्व यशही आले. आत्तापर्यंत संपूर्ण देशात १० कोटीपर्यंत सदस्य जोडले गेले आहेत. तर सोलापूर शहरातील सदस्यता नोंदणी अभियान मोहिमेत येथील भाजपा आमदार, माजी नगरसेवक आणि भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून आजतागायत लाखोंची सदस्यता नोंदणी केली आणि आज (दि. २१) मंडलाध्यक्षांच्या निवडी जाहीर केल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दिली.

भारतीय जनता पक्ष शहर कार्यालयात मंडल अध्यक्ष नियुक्ती जाहीर करण्यात आली. प्रदेश भारतीय जनता पक्षाकडून महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदारसंघातील मंडल अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. याअंतर्गत भारतीय जनता पक्ष शहर कार्यालयात सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील मंडल अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली. यामध्ये उत्तर पूर्व सिध्दार्थ मंजेली, मध्यवर्ती उत्तर दत्तात्रय बडगू, उत्तर पश्चिम देविदास बनसोडे, मध्य पूर्व अक्षय अंजिखाने, मध्यवर्ती मध्य नागेश सरगम, मध्य पश्चिम नागेश खरात, दक्षिण पूर्व, अर्जुन जाधव आणि दक्षिण पश्चिम महेश देवकर यांच्या निवडी जाहीर झाल्या आहेत. आमदार देवेंद्र कोठे, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही नावे जाहीर करण्यात आली.

भाजपा नेत्यांनी शहरातील प्रत्येक बुथवर २०० सदस्य नोंदणीच्या उद्दिष्टानुसार उद्दिष्टपूर्ती केली आहे. तसेच घर चलो अभियान राबविण्यात आले होते. शहरातील आमदार सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

जुने व अनुभवी कार्यकर्ते या निकषावर पक्षाकडून मंडल अध्यक्ष नियुक्त करण्यात आले आहेत. नूतन मंडल अध्यक्षांवर जुन्या व नवीन कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची मोठी जबाबदारी आहे. त्यांना बूथ अध्यक्ष व बूथ सदस्यांसोबत संपर्क ठेवावा लागणार आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीचे गणित वेगळी होती. महापालिका निवडणुकीचे गणितही वेगळे आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची गणिते गृहीत धरून कार्यकर्त्यांनी महापालिका निवडणुकीबाबत गाफील राहू नये. महापालिका निवडणुकीसाठीदेखील जोमाने काम करण्याची गरज आहे.

**- नरेंद्र काळे, शहराध्यक्ष, भाजपा**

## 'फळबागां'मध्ये सोलापूर राज्यात अव्वल

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात एक म्हणजे एकच पीक शेतकरी घेत नाहीत. कोण द्राक्ष, कोण केळी, कोण आंबा, तर कोण बोरं, पेरू अशी नाना प्रकारची उत्पादने घेवून आपली आर्थिक उन्नती साधतात...या फळपिकांचा सरासरी अव्हरेज काढला तर फळबागांमध्ये सोलापूरचीच राज्यात आघाडी असल्याची अभिमानास्पद गोष्ट ऐकून समाधान वाटले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्याशी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सध्य स्थितीवर संवाद साधला...बोलताना जिल्ह्यातील फळबागांचा विषय समोर आला तर त्यांनी जिल्ह्याच्या अभिमानास्पद अशी माहिती दिली. ते बोलत होते...तसा तर हा जिल्हा रब्बी हंगामाचाच होता...सरासरी पाऊस पडत नसायचा...यामुळे ज्वारी, करडई, हरभरा, गव्हाचेच या ठिकाणी मोजके उत्पादन होत असे. मात्र उजनी धरणाचा उदय झाला अन् जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीची नवीन पहाटच निघाली. शेतकरी नव्या दमाने, उमेदीने कामाला लागले. यातून अनेक शेतकऱ्यांनी नाना प्रकारची उत्पादने आपल्या शेतात घेवून इतिहासही रचला आहे. सध्याही जिल्ह्यात फळबागा जोरात सुरू आहेत. विविध प्रकारच्या फलोत्पादन उत्पादनात आपल्या जिल्ह्याने राज्यातील सर्वच जिल्ह्यांना मागे टाकले आहे. अहो, सध्या सोलापूर जिल्ह्यात ३० हजार हेक्टरवर केळी बागा आहेत...सोलापूर जिल्हा केळी निर्यातीत राज्यातच आघाडीवर असून, लवकरच उत्पादनातही जळगाव जिल्ह्याला मागे टाकेल. द्राक्षबागा ३५ ते ४० हजार हेक्टरवर आहेत. डाळिंबला तर आपल्या जिल्ह्यात चॅलेंजच नाही, ३६ ते ३८ हजार हेक्टरवर डाळिंब पीक आहे, येथील डाळिंब पीक संशोधन केंद्राचाही स्थानिक शेतकऱ्यांना फायदाच होत आहे. डाळिंब निर्यातही मोठी आहे, ऊस गाळपातही आपण कायम आघाडीवर असतो. दरवर्षी १७० लाख मे. टनाच्या आसपास ऊस गाळप करतो. विविध प्रकारचा आंबा ५ ते ६ हजार हेक्टरवर डोलतो आहे, पेरू ३ हजार हेक्टरपर्यंत पोहोचला आहे, इतकेच नाहीतर ड्रॅगनफ्रुटही आता आपल्याकडे चांगले येत आहे, सध्या ८०० हेक्टरवर हे विदेशी फळ डोलत आहे, लिंबू ३ हजार हेक्टरवर आहे. याचबरोबर स्ट्रॉबेरी, बोर, खरबूज, चिकू यांचा तर विषय वेगळाच आहे. एकंदरीत, सरासरी विविध प्रकारच्या फळबागांच्या उत्पादनांचा विचार केला तर आपला जिल्हा इतर जिल्ह्याच्या तुलनेत आघाडीवर असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी दिली.



#### दुष्काळी स्थिती आली तरच उत्पादन खालावते

जिल्ह्यात अत्यल्प पाऊस झाला आणि उजनीही भरले नाहीतर मात्र जिल्ह्यातील या फळबागांची पंचायत होते. गतवर्षी अशीच स्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांना वरदायिनी असलेल्या उजनीत पाणी कमी असले की, त्यांचे पाण्याचे आवर्तन हुकते. यामुळे ऐन उन्हाळ्यात येणाऱ्या फळबागांचे, ऊस पिकांचे मोठे नुकसान होते. फळबागांच्या उत्पादनाचा आलेखही खाली येतो. फळे निर्यातीतही मग आपण मागे राहतो. यामुळे उजनी धरण भरले की, शेतकरी बिनघोरी असतात.

**- शुक्राचार्य भोसले,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**


बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद

पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?

सिड्पाईल्स टॅबलेट

मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज, दाह, टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज व असहनीय वेदना इ. त्रास दूर करण्या करीता मदत करते.



अभयामृत

बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करून पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.



वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याने चार जणांना मारहाण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २१ एप्रिल-
मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याने चौघांना सात ते आठ जणांच्या जमावाने मारहाण केली. हा प्रकार रेल्वे स्टेशनजवळील पोस्ट ऑफिसजवळ रविवारी रात्री घडला.
विवेक कल्याणराव सूर्यवंशी (वय २९, रा. अवंती नगर, निराळे वस्ती) विकास कल्याणराव सूर्यवंशी (वय २१), राज शंकर जगधने (वय २०) व प्रणव नागेश (वय २१, दोघे रा.सैफुल) असे मारहाण झालेल्या चौघांची नावे आहेत. वरील चौघे रविवारी झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मि रवणुकीत नाचत होते. त्यावेळी त्यांचा तेथेच नाचणा-यांना धक्का लागला. यातून सात ते आठ जणाच्या जमावाने कडयाने व फायटरने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात विवेक व विकासच्या डोक्याला तर प्रवण व राज याच्या चेह-याला जखम झाली. रात्री ९.४० वाजता ते स्वत: उपचारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## महत्वाचे...

### महिलेस मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २१ एप्रिल-
महिलेस दगडाने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सीमा पंढरीनाथ सर्जे (वय ३२, रा. रम ाबाई आंबेडकर नगर, न्यू बुधवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरून गंगाधर सावंत, सोमनाथ सावंत, विनायक सावंत, यशराज सावंत (सर्व रा. पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी न्यू बुधवार पेठ येथे सीमा सर्जे व त्यांची बहीण आई घरी असताना बहिणीचा नवरा बाळू सोनटक्के यांच्यात थोड्या वेळापूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सावंत यांनी सर्जे यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करून सोम नाथ सावंत याने हातातील दगडाने सीमा यांच्या आईच्या उजव्या पंजावर मारून त्यांना जखमी केले, अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. सहाय्यक फौजदार ओव्हळ पुढील तपास करीत आहेत.

### साईबाबा चौकातून दुचाकी चोरीस

सोलापूर, दि. २१ एप्रिल-
शहरातील साईबाबा चौकातून चोरट्याने दहा हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत गणेश नागनाथ इंदापुरे (वय ३६, रा. मौसाहेब मीनाताई ठाकरे विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ एप्रिल रोजी दुपारी इंदापुरे यांनी त्यांची झेड ५४ १९ या क्रमांकाची दुचाकी साईबाबा चौकात हँडल ब्लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलीस हवालदार शेख पुढील तपास करीत आहे.

### फायटरने मारहाण करणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २१ एप्रिल-
मागील भांडणाचा राग मनात धरून तरुणास फायटरने मारहाण करणाऱ्या विरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुमित उदय फत्तेवाले (वय १९, रा. उत्तर सदर बझार, लष्कर सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरून कृष्णा उर्फ इह्रि दीपक मौलावाले (रा. अडके हॉस्पिटल जवळ, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ एप्रिल रोजी सकाळी पावणे बाराच्या सुमारास सुमित फत्तेवाले हा त्याच्या काकाच्या मोटार सायकलवरून दयानंद कॉलेज येथे जात होता. त्यावेळी कुंकूबाई हॉस्पिटल समोर कृष्णा मौलावाले याने मागील भांडणाचा राग धरून सुमित यास अडवून गच्ची पकडून शिवेगाळ केली आणि खिशातील फायटरने सुमितच्या डोक्यात मारून दुचाकी तोडफोड करून नुकसान केले. म्हणून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस हवालदार मनोहर तपास करीत आहेत.



### पूर्व वैमानस्यातून हाणामारी; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर, दि. २१ एप्रिल-
पूर्व वैमनस्यातून मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गंगाधर सुरेश सावंत (वय ४९, रा. डॉ. आंबेडकर नगर, पंढरपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सीमा पंडित सर्जे (रा. न्यू बुधवार पेठ, सोलापूर) आणि बाळू सोनटक्के (रा. डॉ. आंबेडकर नगर, पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास गंगाधर सावंत यांची भाऊजय मीना सावंत हे न्यू बुधवार पेठ येथील त्यांच्या घरी आले असता घराजवळ सावंत यांचा नातेवाईक आल्याचा मुलगा बाळू सोनटक्के हा त्याच्या सासरवाडी समोर उभा होता. त्याने सावंत यांना पाहून पंढरपूरमध्ये सावंत यांच्या भावासोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करू लागला. त्याचवेळी त्याची मेव्हणी सीमा सर्जे ही देखील सावंत यांना शिवीगाळ करू लागली तसेच बाळू सोनटक्के याने लाकडी काठीने सावंत यांच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार वाडीकर पुढील तपास करीत आहेत.

# मार्केट कमिटीच्या सत्ताधाऱ्यांना राज्यातील सत्ताधारी देणार का शह?

● निवडणुकीसाठी नेतेमंडळी पोहोचले मतदारांच्या उंबरठ्यावर
● नेतेमंडळी बैठकीत दंग तर उमेदवार कार्यकर्त्यासंगे प्रचारात व्यस्त









तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २१ एप्रिल-
बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी जोरदारपणे सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनेक नेते प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या निवडणुकीमध्ये उतरले आहेत. या लक्षवेधी निवडणुकीकडे अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. निवडणुकीच्या प्रचाराला आता चांगलाच वेग आला आहे. गावोगाव अन् घरभेटीने वातावरण अक्षरक्ष: ढवळून निघत आहे. दोन पॅनलच्या प्रमुखांसह उमेदवारांनी पायला भिंगरी बांधून दक्षिण उत्तर तालुक्यात गावोगाव भेट देत आहेत. मतदारांना आपण केलेल्या विकास कामांची तसेच भविष्यातील कामांची माहिती देत आहेत. यामध्ये भाजप, काँग्रेस इतर प्रमुख पक्षांच्या नेतेमंडळींचादेखील समावेश आहे. विशेषत्वे, मतदारांमध्ये 'सांगा.. सांगा.. कधी अन् कुठे येऊ द्या' असा मोबाईलवर संवाद होत आहे, तो संवाद खूप काही सांगून जात असल्याची चर्चा निवडणुकीच्या धामधुमीत उठली आहे. दरम्यान, बाजार समितीची निवडणूक शेतकरी, शेती उत्पादन व उत्पन्न यावर आधारित विविध अडचणीचा आधार घेऊन निवडणूक लढवली जात आहे. यंदाच्या निवडणुकीमध्ये आमदार विरुद्ध आमदार असा थेट सामना होत आहे. शेती व शेतकरी हा विषय ध्यानात घेत शेतकरी विकास व शेतकरी परिवर्तन पॅनलची निर्मिती करण्यात आली आहे. बाजार समितीच्या यानिवडणुकीत एकूण ७० उमेदवार आपले नशीब आजमावत असले, तरी देखील खरी लढत भाजप आमदार विरुद्ध भाजप आमदार यांच्या मध्येच दिसून येत आहे. सोसायटी व ग्रामपंचायत मतदारसंघ हा उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूरमध्ये समाविष्ट असून बाजार समितीचा खरा मतदार हा ग्रामपंचायत सोसायटी मधील पदाधिकारी, सदस्य हे आहेत. तर व्यापारी मतदारसंघातील मतदार हे व्यापारी, हमाल व तोलार हे आहेत.



सत्ताधारी पॅनलचे सोसायटी आणि ग्रामपंचायतमध्ये मोठी ताकद आहे. दक्षिण उत्तर तालुक्यातील विविध सोसायटी आणि सहकारी संस्थांवर सत्ताधारी नेतेमंडळींचे वर्चस्व अबाधित आहे. अशा स्थितीत राज्यातील सत्ताधारी तथा बाजार समितीमधील विरोधक बापू आणि मालक हसापुरे व माने यांच्या विरोधात बाजार समितीसाठी कोणती व्यूहरचना आखतात, हे पहावे लागणार आहे. दक्षिण व उत्तर तालुक्यातील विविध सोसायटी ग्रामपंचायत तसेच सहकारी संस्थांमध्ये विविध पदाधिकारी आणि सदस्य यांना प्रत्यक्ष जाऊन भेटण्यासाठी पॅनलमधील उमेदवार गावोगाव जात आहेत. उत्तर व दक्षिण तालुक्यातील नेते शेतकरी सोसायटी व ग्रामपंचायतनेतेमंडळी बैठका घेण्यामध्ये दंग आहेत तर दुसरीकडे उमेदवार आणि कार्यकर्ते प्रचारात व्यस्त असते चित्र दिसत आहे.

### बाजार समितीचे होणार गुवाहाटी पॅटर्न ?

ही निवडणूक आता ही प्रतिष्ठेची निवडणूक बनली आहे. गत निवडणुकीत भाजप अंतर्गत देशमुख यांचे दोन गट सक्रिय होते. परंतु यंदाच्या निवडणुकीत दोन्ही देशमुख आमदार एकाच पॅनलखाली आल्याने आपल्याच पक्षातील आमदाराला आव्हान देत निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनवली आहे. त्यामुळे दुश्मन का दुश्मन अपना दोस्त ही भूमिका घेत सत्ताधारी तसेच विरोधी पॅनलप्रमुख नेतेमंडळींच्या तसेच मतदारांच्या उंबरठ्यावर जाताना दिसत आहेत. गावभेट दौरा तसेच गाठीभेटी घेऊन अनेकांना आपल्या पॅनलमध्ये ओढण्याचे गुवाहाटी पॅटर्न सुरू केलेले दिसत आहे. सत्ताधाऱ्यांनी भाजप काँग्रेस युती करत नवा फॉर्मुला तयार केला आहे. तर गत निवडणुकीत केवळ भाजपच्या एका आमदाराला आपल्या जाळ्यात ओढत सत्ताधाऱ्यांनी बाजार समितीवर आपले वर्चस्व आबाधीत राखले होते. तोच फार्मुला सत्ताधाऱ्यांनी पुढे वापरला आहे. मात्र त्या आमदाराऐवजी आता दुसऱ्या आमदाराच्या खांद्याचा आधार घेतला आपले कल्याण' करण्याचे ठरवले आहे. मात्र, दुसरीकडे या नव्या फॉर्मुलाचे साईड इफेक्ट जाणवण्यास सुरुवात झाली. पक्षांतर्गत कलह वाढत गेला शेवटी गत निवडणुकीत ज्या विरोधकांना आसमान दाखवले, त्यांच्याच पंक्तीत येऊन आज माजी सभापती बसले आहेत. भाजप कार्यकर्त्यांच्या न्यायासाठी मालक बापूंच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिलेले दिसत आहेत. तर दुसरीकडे माजी आमदार माने व हसापुरे यांनी आपले राजकीय सारिपाटातील चातुर्य पणाला लावत भाजप पक्षाचे आमदार कल्याणशेट्टी यांना सोबत घेऊन सरकारची मर्जी खप्पा होऊ नये, याची दक्षता घेतली आहे. मात्र, आता विरोधकांना अनेकांचा पाठिंबा मिळत असल्याचे लक्षात आल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी देखील बैठका, गावभेट दौरे, कार्यकर्त्यांच्या मेळावा घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता ही निवडणूक राज्यस्तरावर पोहोचल्याने, याकडे आता सर्वसामान्य जनता, मतदार यांच्यासह पक्षश्रेष्ठींचे देखील लक्ष लागून राहिले आहे.

## मिरवणुकीत नाचणाऱ्या मुलाच्या अंगावरून कंटेनर गेल्याने गंभीर जखमी

▸▸डफरीन चौक परिसरातील घटना

तभा वृत्तसेवा
सोलापूर दिनांक २१ एप्रिल -
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सांगता मिरवणुकीत नाचणाऱ्या मुलाच्या अंगावरून कंटेनर केल्याने मुलगा गंभीर जखमी झाला. ही घटना २० एप्रिल रोजी सायंकाळी सातच्या सुमारास डफरीन चौक परिसरात घडली.
याबाबत इम्तियाज अजीज पगडीवाले (वय ४५ रा. दक्षिण सदर बाजार हुमा मेडिकल समोर शिरा मशिदीच्या बाजूस, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंटेनर नंबर एम एच १२ क्यू डब्ल्यू १२४० च्या चालकाविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवार २० एप्रिल रोजी सोलापूर शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाची सांगता मिरवणूक होती. या मिरवणुकीमध्ये इम्तियाज पगडीवाले यांचा मुलगा गुफरान हा डफरीन चौक परिसरात मिरवणुकीतील डॉल्बीसमोर नाचत होता. सायंकाळी सातच्या सुमारास डफरीन चौक ते रेल्वे स्टेशन जाणाऱ्या रस्त्यावरील ऍक्सिस बँकेच्या समोर कंटेनर क्रमांक एम एच १२ क्यू १२४० वर ठेवलेले डॉल्बीच्या बाजूस गुफरान हा नाचत होता. नाचताना तो खाली पडला त्यावेळी कंटेनर चालकाने निष्काळजीपणे कंटेनर चालवून गुफरान याच्या अंगावर कंटेनर घातला. त्यामुळे गुफरान यास गंभीर दुखापत झाल्याने त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार वाघमारे पुढील तपास करीत आहेत

## मुळेगाव तांडा येथील राजश्री आर्केस्ट्रा बारवर छापा

▸ बारबाला आणि ग्राहकांसह ३८ जणांवर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
सोलापूर दिनांक २१ एप्रिल-
सोलापूर हैदराबाद महामार्गावर मुळेगाव तांडा येथील हॉटेल राजश्री आर्केस्ट्रा बार या ठिकाणी परिविक्षाधीन पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हीएस यांच्या पथकाने छापा मारून बारबाला आणि ग्राहक अशा ३८ जणांवर कारवाई केली. ही कारवाई २० एप्रिल रोजी पहाटे एकच्या सुमारास करण्यात आली.
याबाबत पोलीस शिपाई विक्रम जेटीतो यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दहा बार बालांसह ३८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिविक्षाधीन पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हीएस यांना हैदराबाद रोडवरील राजश्री आर्केस्ट्रा बारमध्ये काही महिला अंगावर तोकडे कपडे घालून विविधपणे अश्लील हावभाव करून संगीताच्या तालावर अश्लील नृत्य करत असल्याची माहिती मिळाली होती. या मि ळालेल्या माहितीवरून पोलीस पथकाने आर्केस्ट्रा बारवर छापा टाकला. त्यावेळी खाली आणि पहिल्या मजल्यावर असलेल्या हॉलमध्ये मुली तोकडे कपडे घालून नाचत असल्याचे दिसून आले. तसेच ग्राहक म्हणून बसलेली मंडळी या मुलींवर नकली नोटा उधळत असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी दहा बारबाला आणि हॉटेलमधील कामगार व ग्राहक यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला पोलीस हवालदार कटकधोड पुढील तपास करीत आहेत.



#### यांच्यावर झाला गुन्हा दाखल

महावीर गोस्वामी (रा. हरिदासपूर बिहार), कलम सुरेंद्र नाईक (रा. बालेश्वर उडीसा), संजीव गोस्वामी (रा. बाका बिहार), किरण नागनाथ चव्हाण (रा. मुळेगाव तांडा), सुनील विशाल जाधव (रा. रमाबाई आंबेडकर नगर), सजुद्दीन रजाक म मीन (रा. जुना कारंबा नाका बुधवार पेठ), सुनील प्रकाश वाबळे (रा. न्यू बुधवार पेठ), इरफान महबूब शेख (रा. सरवदे नगर), श्रीनिवास वंगारी (रा. गुरुवार पेठ), संजय अजित पोळ (रा. आर्य चाणक्य नगर सोलापूर), बसवण्णा कल्याणप्पा आजगे (रा. व्यंकटेश्वर नगर, मजरेवाडी), विपुल विठ्ठल तारे (रा. क्रांती सोसायटी विजापूर रोड), भगवान सौदागर घोडके (रा. जुनी पोलीस लाईन), इमरान फारूक बागवान (रा. शुक्रवार पेठ), सर्फराज सत्तार बागवान (रा. बागवान नगर, हैदराबाद रोड), राहुल सुभाष पवार (रा. मुळेगाव तांडा), विठोबा भीमराव जाधव (रा. नात्रज), बुद्ध प्रकाश अरविंद कसबे (रा. मुकुंद नगर भवानी पेठ), सागर मल्लिनाथ देवकुळे (रा. बुधवार पेठ), तुषार सुरेश शिंदे (रा. मुकुंद नगर भवानी पेठ), अमोल भगवान ठोंबरे (रा. मुकुंद नगर), सतीश उत्तम वाघमारे (रा. मुकुंद नगर), राहुल श्रीपाद घोडके (रा. रविवार पेठ बोरामणी नाका), विशाल मारुती कांबळे (रा. मुकुंद नगर), नरेंद्र मारुती सावंत (रा. सिद्धेश्वर पेठ), किरण ज्ञानेश्वर गरड (रा. सुशील नगर विजापूर रोड) आणि बार मालक रतन ज्योतिबा राठोड (रा. मुळेगाव तांडा)

#### ऑर्केस्ट्रा बारमध्ये नेमक्या किती स्टेजची परवानगी ?

परिविक्षाधीन पोलीस अधिकारी अंजना कृष्णा व्हीएस यांनी कारवाई केलेल्या राजश्री ऑर्केस्ट्रा बारमध्ये नेमक्या किती स्टेजला (डान्स फ्लोअरला) परवानगी होती, असा प्रश्न उपस्थित होतो. एका इमारतीमध्ये असलेल्या आर्केस्ट्रा बारमध्ये एकच डान्स फ्लोअरवर मुलींना गाणे म्हणण्याची परवानगी असते. परंतु राजश्री बार मध्ये तळमजला आणि पहिल्या मजल्यावर अशा दोन स्टेजवर मुलींना तोकड्या कपड्यात नाचवून ग्राहकांकडून पैसे उधळले जायचे. राजश्री बारवर यापूर्वी देखील कारवाई करण्यात आलेली असून बार चालकाकडे असलेल्या कागदपत्रांची परवान्यांची चौकशी होण्याची गरज असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




## 'सहकार महर्षि'चा सहवीज प्रकल्प देशात सर्वोत्कृष्ट

● को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियातर्फे पुरस्कार करण्यात आला प्रदान

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि. २१ एप्रिल-
सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पास को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडिया यांच्यावतीने सन २०२४चा देशातील सर्वोत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प पुरस्कार प्रदान करण्यात आला.
पुरस्कार वितरण सोहळा माजी केंद्रिय कृषी मंत्री व को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष, मा.खा.शरदचंद्र पवार यांचे हस्ते व सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, को-जन असोसिएशनचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, महासंचालक संजय खताळ, राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील यांचे उपस्थितीत शनिवार दि. १९ एप्रिल रोजी संपन्न झाला.
पुरस्कार स्विकारण्यासाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व को-जन मॅनेजर युवराज निंबाळकर, चिफ इंजिनिअर व फॅक्टरी मॅनेजर- सुर्यकांत गोडसे, डेप्युटी को-जन मॅनेजर-संतोष राजेभोसले व कार्यलक्षी संचालक रणजीत रणनवरे उपस्थित होते. कारखान्याचे मार्गदर्शक संचालक, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर चालू आहे. सहकार महर्षि कारखान्यास सन २०२४ चा देशातील सर्वोत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प पुरस्कार को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडीया कडून प्रदान करण्यात आला असून कारखान्यास यापूर्वी राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध पुरस्कार प्राप्त झाले असल्याची माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली.
को-जनरेशन असोसिएशन ऑफ इंडीया यांचे वतीने सन २०२४ चा देशातील सर्वोत्कृष्ट सहवीज निर्मिती प्रकल्प मिळाल्याने कारखान्याचे संचालक, कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे अधिकारी व कामगार तसेच हितचिंतक यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## धक्का लागल्याच्या कारणातून रॉडने मारहाण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. २१ एप्रिल-
मिरवणुकीच्या गाडीत जाताना धक्का लागल्याने तरुणाला लोखंडी रॉडने म ारहाण करण्यात आली. हा प्रकार रविवारी रात्री ११.४५ वाजता रामलाल चौकाच्या दरम्यान घडला.
युवराज सचिन गायकवाड (वय २७, रा. हब्बू वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव सांगता मिरवणुकीतील गाडीत युवराज हा जात होता. गाडी फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या जवळ असताना युवराज याचा धक्का अतुल प्रक्षाळे यास लागला. यातून प्रक्षाळे याने लोखंडी रॉडने युवराजला मारहाण केली. यात युवराजच्या हनुवटीला जखम झाली असून सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १२.३० वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाला. हा प्रकार रविवारी रात्री ११.४५ वाजता रामलाल चौकाच्या दरम्यान घडला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## आवाजाची मर्यादा ओलांडून डॉल्बी लावली

● धाकटा राजवाडा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेविरुद्ध गुन्हा दाखल



तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. २१ एप्रिल-
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताह सांगता मिरवणुकीत मर्यादेपेक्षा जास्त आवाज सोडून डॉल्बी लावणाऱ्या धाकटा राजवाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय संस्थेच्या पदाधिकारी व डॉल्बी चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे
याबाबत पोलीस शिपाई विठ्ठल जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संस्थापक अध्यक्ष सुरज गायकवाड, उत्सव अध्यक्ष अध्यक्ष उमेश खंडागळे (रा. डॉ. राजवाडा कोतम चौक), साऊंड सिस्टिमचे मालक संकेत माऊली बोडवे (रा. बुजूरवाडी, पुणे) आणि साऊंड सिस्टिम ऑपरेटर ऋषभ अनिल दुपारगुडे (रा. हडपसर, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी सोलापूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाची सांगता मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीत डॉ. आंबेडकर चौक पार्क चौक येथे कोणतं चौक येथील डॉ. राजवाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या मंडळांनी लावलेल्या साऊंड सिस्टिमवर सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन करून गाणी लावण्यात आली होती. यावेळी पोलीस प्रशासनाने मंडळाचे पदाधिकारी तसेच डॉल्बी सिस्टीमचे मालक आणि ऑपरेटर यांना आवाज कमी करण्याबाबत निर्देश दिलेले होते. या निर्देशांकडे मंडळाच्या पदाधिकारी व डॉल्बी मालक चालकाने पूर्णपणे दुर्लक्ष करून मोठ्या आवाजात हिंदी व मराठी गाणी लावून पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन केले. यामुळे या मंडळाच्या पदाधिकारी डॉल्बी मालक आणि ऑपरेटर यांच्याविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस उपनिरीक्षक बावणे पुढील तपास करीत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९४

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।**

माणूस कोणत्याही क्षेत्रात काम करणारा असो. त्याचे निसर्गाशी नाते हे चांगलेच असले पाहिजे. तरच त्याला त्याच्या क्षेत्रात खरा आनंद मिळू शकतो. अन्यथा केवळ पैसा आणि मोठेपण यातच समाधान माणून थांबावे लागेल. असे समाधान कधी ना कधी कंटाळवाणे वाटू लागते. पण जर निसर्ग मैत्रीचा स्वभाव असेल तर मिळणारा आनंद काही वेगळाच असतो. प्रशासकीय क्षेत्रात सुध्दा आवड असणा-यांना निसगाशी प्रत्यक्ष सहभागातून मैत्री करता येऊ शकते. उत्तम प्रशासनासाठी कायदा, तरतूदी, नियम, सूचना, परिपत्रके, मार्गदर्शक तत्त्वे तर आवश्यक असतातच; पण त्याचबरोबर प्रसंगानुरुप तसेच परिस्थितीला अनुसरुन का होईना कर्मचा-यांसाठी विनाखर्चाचे कांही उपक्रमही राबविले गेले पाहिजेत, असे आम्हास अनुभवाअंती वाटते. निसर्ग सर्वांनाच आवडत असतो. खरे म्हणजे केवळ आवडून चालत नाही, तर त्याच्या संवर्धनासाठी, संरक्षणासाठी शक्य होईल तेवढे प्रयत्नही केले पाहिजेत. हे प्रयत्न जाणीवपुर्वकच किंवा अट्टहासानेच केले पाहिजेत असेही नाही. अर्थात, सहजतेणे केलेल्या सकारात्मक कृतीतूनही निसर्गाचे व पर्यायाने आपल्या आनंदी मनाचे संवर्धन होण्यास मदत होऊ शकते. आवड असणारा माणूस कोठेही निसर्गाचे संवर्धन करु शकतो. आम्ही जवळून पाहिलेल्या व प्रत्यक्ष भेट दिलेल्या एका वरिष्ठ अधिका-याच्या शासकीय निवासस्थानी कोणालाही किमान अर्धा, पाऊण तास तेथे फिरत रहावे वाटेल, अशी निसर्गाची त्यांनी काळजी घेतली होती. निवासस्थानी मोठया प्रमाणावर जुनी झाडे तर होतीच; त्याचबरोबर या साहेबांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक लावलेली नविन वृक्ष, असंख्य तुळशी, फूले, झाडे, वेली, पाण्याचा धबधबा, झाडावरील मचान, पाण्यातील वेगवेगळी मासे, कारंजेअसे बरेच कांही मनमोहक वाटत होते. चोहिकडून सुगंध येत होता. जिकडे तिकडे विविध वृक्ष, वेली, फूले, पक्षी दिसत होती. विविध पक्षांचे वेगवेगळे आवाज ऐकू येवू लागल्याने आमच्या मनाला तेथे वेगळ्याने रम म्हणून सांगावे लागले नाही. मनाच्या रमण्याची अशी अवस्था होणे ही मूळात नैसर्गिकताच होय. येथे रमण्याचा हा केवळ आमचाच अनुभव नव्हता तर येथे भेट देणा-या अनेकांचा असाच अनुभव होता. या निवासस्थानी जाणाऱ्याला जगद्गुरु तुकाराम महाराजांचा,



**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।**
**तेणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ।।**

हा अभंग आठवला नसेल असे वाटत नाही. एखादा संत ज्ञानेश्वर प्रेमी येथे आला आणि येथील विविध फळांची झाडे पाहून श्री. ज्ञानेश्वर माऊलींची, जेथ अमृताचेनि पाडे । मुळेहीसकट गोडें ।जोडती दाटें झाडें । सदा फळती ।। ही ओवी आठवली नाही तर नवलच वाटेल! निसर्गाला आपण शक्यतो छेडूच नये, अशी त्यांची मानसिकता दिसून आली. असो, क्षेत्र कोणतेही असो, असे जर प्रत्येकाला वागता आले, निसर्गाला सांभाळता आले, निसर्गावर प्रेम करता आले तर अनेकांचे अनेक आजार, जीवनातील अनेक समस्या, ताणतणाव आपोआप कमी होऊन आनंदात वाढ होईल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २२ एप्रिल २०२५ | जागतिक वसुंधरा दिन |
| विक्रम संवत् २०८१ | लक्ष्मीदेवी यात्रा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी (१८.१२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - श्रवण (१२.४३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुभ (२१.१२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (०६.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील. विद्यार्थ्यांना लाभदायक राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. शक्यतो जिवनातील निर्णय योग्य व विचार करून घ्या. आनंदी रहा.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# चित्रपटगृहात राष्ट्रगीताची धून वाजविण्याचा निर्णय ठेवण्यात आला बासनात ?

## तत्कालिन उपमुख्यमंत्री स्व. आर.आर.पाटील यांनी दिले होते निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

सिनेमा पाहण्यासाठी चित्रपटगृहात येणाऱ्या प्रेक्षकांमध्ये देशप्रेमाविषयी स्पुलिंग चेतविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक चित्रपटगृहात 'जनगणमन* या राष्ट्रगीताची धून वाजविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. याबाबत राज्याचे तत्कालिन उपमुख्यमंत्री स्व.आर.आर. पाटील यांनी स्पष्ट निर्देशही दिले होते. परंतु सदर निर्णय बासनात गुंडाळून ठेवण्यात आल्याचे दिसून येत आहे.

केसरी टूस अन्ड ट्रॅव्हल्सच्या सहाय्याने आकारास आलेले 'जनगणमन या राष्ट्रगोताची ध्वनीचित्रपित ज्या चित्रपटगृहात वाजविले जाणार नाही अशांना शासनाकडून मिळणाऱ्या सायी-सवलती रद्द केल्या जातील, असेही तत्कालिन उपमुख्यमंत्री स्व.पाटील यांनी एका आदेशात नमूद केले होते. सन १९७० ते १९७५ या कालावधीत असा उपक्रम राज्यभरातील चित्रपटगृहात राबविण्यात आले होते, असे एका जाणकाराने सांगितले. तर दुसरीकडे ज्या-ज्या वेळी चित्रपटगृहात राष्ट्रगीताची धून वाजविली जायचे. त्या-त्या वेळी प्रेक्षकांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नव्हता. राष्ट्रगीताची धून सुरु असताना एका जागी स्तब्ध उभे राहण्याऐवजी चित्रपटगृहातून काढता पाय घेणे, आपापसात बोलणे असे प्रकार व्हायचे. अशा प्रकारांमुळे देशप्रेम जागृत होण्याऐवजी राष्ट्रगीताचा जणू अवमान व्हायचा, असे एका चित्रपटगृह चालकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

### बंद असलेली चित्रपटगृहे पुन्हा चालू?

सिंगल स्क्रीन असलेली महाराष्ट्र राज्यात जवळपास १२०० चित्रपटगृहे आहेत. त्यापैकी ४७५ चित्रपटगृहे सरु आहेत. त्यामुळे उर्वरित चित्रपटगृहांच्या सध्यस्थितीबद्दलची माहिती संकलित करुन बंद पडलेली चित्रपटगृहे पुन्हा चालू करावेत. त्या चित्रपटगृहांमध्ये केवळ मराठी चित्रपट दाखवला जावा, असे राज्याचे विद्यमान सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी संबंधितांना आदेश दिल्याचे सांगण्यात येते.



मराठी, हिंदी, तेलुगु, कन्नड, तामिळ, पंजाबी, मल्याळम, उरिया, इंग्रजी, बंगाली, भोजपुरी अशा विविध भाषेत चित्रपटांची निर्मिती केली जाते. त्या-त्या भाषेतील चित्रपटांची इतर भाषेत डबिंगही मोठ्या प्रमणात केली जाते. एकेकाळी चित्रपटगृहांसह परिसरात प्रेक्षकांची लक्षणीय गर्दी व्हायचो. मात्र, व्हिडीओ कॅसेट, मोबाईल, ओटीटी यांसारख्या आधुनिक तंत्रप्रणालींमुळे आता तशी परिस्थिती राहिली नाही.

# पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने ३० एप्रिल रोजी सामुदायिक विवाह सोहळा

### आठ जोडपी बांधणार रेशीमगाठी, श्रीमार्कंडेय मंदिरापर्यंत निघणार वरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून अक्षय तृतियेच्या दिवशी पद्मशाली समाजातील गरीब उपवर वधू-वरांचे मोपत सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी बुधवार, ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३९ या गोरज मुहुर्तावर अक्कलकोट रोडवरील बोमड्याल मंगल कार्यालय येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संघटनेचे प्रेसिडेंट नागेश बोमड्याल, अध्यक्ष शेखर कटकम, सरचिटणीस विजय निली, कार्याध्यक्ष नागेश बंडी यांनी दिली. या विवाह सोहळ्यात प्रियांका अशोक चिलवेरी व अंबादास रमेश मामड्याल, दिव्या देवीदास आरकाल व पवन विजय गुडा, अश्विनी राम गुंडेटी व अंबादास लक्ष्मण बेत, अंबिका विठ्ठल आडम व यल्लप्पा शिवाजी कल्याण, राणी अंबादास कडदास व शिवराज भद्रय्या गडुम, लावण्या राजू नल्ला व अरविंद हरिदास शेरला, अनुराधा अंबादास कनकी व गणेश पुंडलिक भंडारी, अंजली विजय गवंडी व श्रीकांत नागनाथ चिलकामारी असे एकूण आठ जोडपी रेशीमगाठी बांधणार आहेत.

पदाशाली युवक संघटनेच्या वतीने वधूस मंगळसूत्र, जोडवे, साडी, परकर, ब्लाउज तर वरास कपडे, टोपी, टॉवेल आणि वऱ्हाडी मंडळींना भोजन देण्यात येते. समाजातील दानशूर लोकांचे यासाठी विशेष सहकार्य लाभते. पद्मशालो पुरोहित संघमूच्या नेतृत्वाखाली पद्‌ब्राम्हण या विवाह सोहळ्याचे विधी पार पाडणार आहेत. अक्षता सोहळ्यानंतर बोमड्याल मंगल कार्यालय ते कुलदैवत श्री माकडेय मंदिरपर्यंत वधू-वरांची सवाद्य वरात काढण्यात येणार आहे.

# शिवसेना उबाठा गटाचे पदाधिकारी जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ एप्रिल-**

सोलापूर शहर आणि जिल्हा शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे पदाधिकारी जाहीर करण्यात आले आहेत. शिवसेना उबाठा पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून पाठविण्यात आलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती देण्यात आली आहे. सोलापूर शहर महानगर प्रमुख म्हणून दत्ता माने यांची निवड केली आहे. नाना मोरे (सोलापूर शहर मध्य) महेश धाराशिवकर (सोलापूर शहर उत्तर) लक्ष्मण जाधव (शहर दक्षिण) यांची शहरप्रमुख म्हणून निवड केली आहे. शहर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची जंबो यादी प्रसिध्द झाली.

**पदाधिकारी खालील प्रमाणे :**

जिल्हा संघटक : शरणराज केंगनाळकर (सोलापूर लोकसभा) जगदीश कलकेरी (सोलापूर शहर उत्तर व मध्य) सुनील शेळके (सोलापूर शहर उत्तर) नागेश सोलनकर (सोलापूर शहर मध्य) जिल्हा समन्वयक : रवि नागणकेरी (सोलापूर लोकसभा) रमेश चौगुले (सोलापूर शहर उत्तर व मध्य) अतुल भंवर (सोलापूर शहर उत्तर) दत्तापंत वानकर (सोलापूर शहर मध्य) उपजिल्हाप्रमुख : प्रताप चव्हाण (सोलापूर शहर उत्तर) दत्ता गणेशकर (सोलापूर शहर मध्य) संजय नामदेव शिंदे (करमाळा विभाग) काकासाहेब बाबूराव बुराडे (पंढरपूर) उपजिल्हा संघटक : प्रवीण काकडे (बार्शी तालुका) विधानसभाप्रमुख : शशिकांत बिराजदार (सोलापूर शहर उत्तर) बाळासाहेब गायकवाड (सोलापूर शहर उत्तर) सुधीर संगेपागा (सोलापूर शहर मध्य) चंद्रकांत मानवी (सोलापूर शहर मध्य) विधानसभा यंत्रणाप्रमुख : अभिजित धर्माधिकारी (सोलापूर शहर उत्तर) अंबादास चव्हाण (सोलापूर शहर मध्य) महानगरप्रमुख : दत्ता माने (सोलापूर उत्तर, मध्य, दक्षिण) शहर संघटक : डॉ. शकील अत्तार (सोलापूर शहर उत्तर व मध्य) सुरेश जगताप (सोलापूर शहर उत्तर व मध्य) जरगीस मुल्ला (सोलापूर शहर उत्तर) विजय पुकाळे (सोलापूर शहर उत्तर) व्यंकटेश नंदाल (सोलापूर शहर मध्य) अनिल कोंडूर (सोलापूर शहर मध्य) शहर समन्वयक : सुरेश शिंदे (सोलापूर शहर उत्तर व मध्य) संताजी भोळे (सोलापूर शहर उत्तर व मध्य) लहू गायकवाड (सोलापूर शहर उत्तर) राम वाकसे (सोलापूर शहर मध्य) शहरप्रमुख : संतोष महावीर खैरमोडे (टेंभुर्णी शहर) प्रवीण पोपटलाल कटारिया (करमाळा शहर) बापू मुरलीधर खराडे (मंगळवेढा शहर) युवराज विजय गोमेवाडीकर (पंढरपूर शहर) शहर सचिव अनिल जाधव (सोलापूर शहर) शहर सहसचिव : निरंजन बोददूल (सोलापूर शहर) तालुकाप्रमुख : रविकांत घंटे (सोलापूर शहर दक्षिण विधानसभा) विनोद वाणी (बार्शी तालुका) तुकाराम भोजने (मंगळवेढा शहर व ग्रामीण) उपतालुकाप्रमुख : सुरेश विष्णू लोंढ (माढा तालुका).



# शिवदारे महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

व्ही.जी. शिवदारे कॅालेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर येथे १७ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय विभागाचे उपायुक्त रविंद्र कदम-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी वेळेचे व अभ्यासाचे योग्य नियोजन केले तरच यश मिळेल. नवनवीन करण्याची त्यांनी उमेद बाळगावी त्यासाठी धाडस आणि निर्णय क्षमता हे गुण महत्त्वाचे ठरतात. तसेच जीवनाचा दृष्टिकोन विकसीत करावा. अपयशाने खचून न जाता ज्ञान आत्मसात करून पुढे जात रहावे.

अध्यक्षस्थानी विश्वस्त प्रा.भिमाशंकर शेटे हे होते. आजचे सामाजिक वातावरण दूषित होत चाललेले आहे यामध्ये विद्यार्थ्यांनी न अडकता आपला वेळ व ऊर्जा ही योग्य कारणासाठी सार्थकी लावली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. डी. एस. सुत्रावे यांनी महाविद्यालयाचा अहवाल सादर केला. शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील गुणवत्ता प्राप्त १५० विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. व्हीजीएस स्टार हा किताब बी. तमाम भाग - ३ चा विद्यार्थी समर्थ दिंडोरे या विद्यार्थ्याला देण्यात आला. सूत्रसंचालन प्रा. रेडसन व डॉ. उपासे यांनी केले. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्याच्या यादीचे वाचन प्रा. एम.बी. पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय श्री. स्वामी यांनी करून दिला तर आभार प्रा. व्ही. के. वराडे यांनी केले. याप्रसंगी सुभाष मुनाळे, अंजली तिवारी, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सौ. श्रुती गायकवाड, पूजा बाजपेयी, माजी प्राचार्य डॉ. बी. एस.कोनापूरे, मा. म्हेत्रे उपस्थित होते.



# वाहतूक संघटना संयुक्त महासंघातर्फे ईद मिलन, चालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

वाहतूक संघटना संयुक्त महासंघाच्या वतीने हैदराबाद रोडवरील गोल्डन न हॉलमध्ये ईद-ए-मिलन चालक मेळाव्याचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात आ. विजयकुमार देशमुख, वाहतूक संघटना संयुक्त महासंघाचे प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, माजी महापौर जनार्दन कारमपुरी, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहर युवक अध्यक्ष प्रशांत बाबर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सय्यद यांनी बोलताना म्हणाले हिट अँड रण कायद्याविरोधात सर्वात प्रथम वाहतूक संघटना संयुक्त महासंघातर्फे रस्ता चक्का जाम आंदोलन करण्यात आले होते. याचेच परिणाम म्हणून केंद्र सरकारने हिट अँड रनला स्थगिती दिली आहे असे म्हणाले मालवाहतूक प्रदेश अध्यक्ष लाडजी नदाफ यांनी मार्केट यार्डातील चालकांचे प्रश्न मांडले मुळेगाव रोड आणि हैद्राबाद हायवेचे विविध समस्या आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कडे मांडले. महासंघ सातत्याने चालकांसाठी काम करत आहे आपल्या मांगण्या लवकरात लवकर महासंघाला सोबत घेऊन पूर्ण करण्याचे आश्वासन आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मालवाहतूक प्रदेशाध्यक्ष लाडजी नदाफ प्रदीप शिंगे,अल्लाबक्ष शेख, देविदास कोळी, इरफान कल्याणी, शंकर राऊत, रमेश बनसोडे, अल्लीशेर पटेल, गोस शेख, इस्माईल गुंता, हकीम नदाफ, मोईन नदाफ, रफिक शेख, इरफान तहसीलदार, अजम मकानदार,साबीर कुरले, संजय कुराडे, अक्षय जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# घरकुल मधून ३० हजारांची दुचाकी चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

शहरातील घरकुल येथील पोशम्मा मंदिराजवळ लावलेली तीस हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली

याबाबत व्यंकटेश जयराम बोंम्मा (वय ३७, रा. वारदचाळ, मुरारजी पेठ, रामलाल चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ एप्रिल रोजी व्यंकटेश बोंम्मा यांनी त्यांची एम एच १३ बी एस ०२३९ क्रमांकाची दुचाकी ही पोशम्मा मंदिराजवळ हॅण्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलीस नाईक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# पूर्वभागात गोविंदमाला दीक्षेची जय्यत तयारी

### तीन, पाच, सात शनिवार अशा पध्दतीने करण्यात येणार श्रीवारी सेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

कलियुग दैवत म्हणून गणल्या जाणाऱ्या भगवान श्री व्यंकटेश्वर यांच्या भक्तगणांची संख्या देशविदेशात अगणित आहे. सोलापुरातील पूर्वभागात राहणारे श्री व्यंकटेश्वर भक्तगण गेल्या काही वर्षापासून गोविंदमाला दीक्षा अंतर्गत तीन, पाच, सात शनिवार अशापध्दतीने मनोभावे श्रीवारी सेवा करीत आहेत. यंदाच्या श्रीवारी सेवेच्या अनुषंगाने जय्यत तयारी सुरु असल्याचे गुरुस्वामी पं.विष्णूसुदर्शना जिल्ला यांनी सांगितले.

ब्रम्हांडरुप, भक्तरक्षक भगवान श्री व्यंकटेश्वर यांचे विशेष कृपानुग्रह मिळविण्याच्या अनुषंगाने सोलापुरातील अक्कलकोट रस्त्यावरील सृष्टी नगर येथील विष्णुसुदर्शना धार्मिक संस्कार केंद्र येथे शनिवार, ७ जून ते शुक्रवार, २५ जुलै २०२५ या कालावधीत गोविंदमाला दीक्षा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्रीक्षेत्र तिरुमला तिरुपती येथे या दीक्षासेवेची सांगता करण्यात येणार आहे. ७ जून २०२५ पासून सात शनिवारच्या दीक्षेस, २१ जून २०२५ पासून पाच शनिवारच्या दीक्षेस तर ५ जुलै २०२५ पासून तीन शनिवारच्या दीक्षेस प्रारंभ होणार आहे. या दीक्षा सोहळ्यात होऊ इच्छिणाऱ्या सदभक्तांनी ३८५००५७४४४, ९३२६४४४६६६ किंवा ८८८८९५५८४८ यापैकी एका मोबाईल नंबरवर संपर्क साधावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# वीरशैव व्हिजनतर्फे शुक्रवारपासून बसव व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही २५ ते २७ एप्रिल दरम्यान रोज सायंकाळी ६ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात बसव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले यांनी पत्रकार परिषदेत दिली.



महात्मा बसवेश्वर | डॉ. श्री. गिरीष जाखोटिया | श्री. इंद्रनील बंकापुरे | श्री. नारायण पुरी

यंदाचे व्याख्यानमालेचे ११ वे वर्ष असून या तीन दिवसीय बसव व्याख्यानमालेतील पहिले पुष्प शुक्रवार दि. २५ एप्रिल रोजी डॉ. गिरीश जाखोटीया (मुंबई) हे 'महात्मा बसवेश्वर व २१ वे शतक' या विषयावर गुंफणार आहेत. या पहिल्या पुष्पाचे उद्घाटन आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते आणि अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, सोलापूर नागरी बँक असोसिएशनचे चेअरमन प्रकाश वाले, महावीर बँकेचे चेअरमन दीपक मुनोत, कांचन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुदीप चाकोते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुसरे पुष्प शनिवार दि. २६ एप्रिल रोजी इंद्रनील बंकापुरे (कोल्हापूर) हे 'मंदिराच्या देशा' या विषयावर गुंफणार आहेत. दुसऱ्या पुष्पाचे उदघाट्न आ. प्रवीण स्वामी (उमरगा) यांच्या हस्ते व मनपाचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. याप्रसंगी उद्योगपती दत्ता सुरवसे, श्री सिद्धेश्वर बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, उद्योजक पंडित जळकोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रविवार दि. २७ रोजी नारायण पुरी यांच्या 'हास्यधारा' या विनोदी कार्यक्रमाने या व्याख्यानमालेचा समारोप होणार आहे. समारोपाच्या पुष्पाचे उद्घाटन आ. देवेंद्र कोठे यांच्या हस्ते आणि माजी विरोधी पक्षनेता अमोल शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

याप्रसंगी निवृत्त सहायक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, सागर सिमेंटचे व्यवस्थापक महादेव कोगनुरे, श्री सिद्धेश्वर बँकेचे संचालक सिद्धेश्वर मुनाळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दरम्यान या व्याख्यानमालेस उपस्थित राहणाऱ्या श्रोत्यांमधून दररोज ५ श्रोत्यांना सोडतीद्वारे आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. सोलापूरवासियांनी या बसव व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस नागेश बडदाळ, आनंद दुलंगे, विजयकुमार बिराजदार, सोमेश्वर याबाजी, राजेश नीला, अविनाश हत्तरकी, सोमनाथ चौधरी आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### हिंदूवरील अत्याचाराविरोधात विहिंपचे पंढरपुरात आंदोलन

**पंढरपूर, दि.२१ एप्रिल-**

पश्चिम बंगाल मधील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने सोमवारी जन आक्रोश आंदोलन करण्यात आले. पश्चिम बंगाल मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली त्याबाबत निवेदन तहसील कार्यालयात देण्यात आले. पश्चिम बंगाल मध्ये झालेल्या हिंसाराची चौकशी राष्ट्रीय तपासणी संस्थाकडून करण्यात यावी तसेच पश्चिम बंगाल राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केंद्रीय सुरक्षा दलाकडे सोपविण्यात यावी आणि बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांची ओळख पटवून त्यांना परत देशाबाहेर पाठवण्यात यावे तसेच भारत आणि बांगलादेश सीमारेषेवर तत्काल कुंपण घालण्यात काम सुरू करण्यात यावे. वरील सर्व मागण्यांचे निवेदन तहसील कार्यालयात देण्यात आले यावेळी विश्व हिंदू परिषदे महाराष्ट्र समरसतेचे रवींद्र साळे, जिल्हा मंत्री शिवाजीराव जाधव सहमंत्री गोपाळ सुरवसे, बजरंग दल जिल्हा संयोजक श्रीनाथ संगीत, धर्म प्रचार प्रमुख नागेश बागडे महाराज, वालचंद जामदार, प्रवीण कुलकर्णी, वारकरी पालक संघाचे रामकृष्ण वीर महाराज, हिंदू महासभाचे अभयसिंह कुलकर्णी, अनुप देवधर, निलेश लंके, तुकाराम कवठेकर, गणेश महाराज जाधव, तुकाराम खंदाडे, ओंकार वैद्य, कौस्तुभ देशपांडे, वासुदेव हेगडे आदी उपस्थित होते.



### सरपंच नितीन मोहिते यांची भाजपाच्या माळशिरस मंडल अध्यक्षपदी निवड

**पिलीव, दि. २१ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी लोकनियुक्त सरपंच नितीन विठ्ठल मोहीते यांची नुकतीच माळशिरस तालुका भारतीय जनता पार्टीच्या माळशिरस मंडल अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सदरची निवड नुकतीच माजी आमदार रामभाऊ सातपुते, भाजपचे ज्येष्ठ नेते व सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सोपानकाका नारनवर, पिलीव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, ॲड. शरद मदने, ॲड. सत्यजित गलांडे, भाजपचे माजी तालुका अध्यक्ष बाळासाहेब काटकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन अध्यक्ष नितीन मोहीते यांनी महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या मार्गदशनाखाली भाजपा पक्ष वाढीसाठी तसेच पिलीव गावच्या विकासकामांसाठी कटीबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### महावीर कदम यांची बार्शी शहराध्यक्षपदी तिसऱ्यांदा निवड

**बार्शी, दि.२१ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व अंतर्गत सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील बार्शी शहराध्यक्षपदी महावीर कदम यांची तिसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा भाजप प्रदेश नेतृत्वाने केली असून, पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, आ. राजेंद्र राऊत आणि जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या मार्गदर्शनात ही निवड प्रक्रिया पार पडली. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संमतीने व प्रदेश कार्यालयाच्या वतीने कदम यांच्यावर पुन्हा एकदा शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. पक्ष निरीक्षक गणेश चिवटे, बार्शी विधानसभा निवडणूक प्रमुख रणवीर राऊत आणि केकाण यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांच्या नियुक्तीची औपचारिक घोषणा करण्यात आली.



### करमाळा भाजपा ग्रामीण मंडळ अध्यक्षपदी सचिन पिसाळ

**करमाळा, दि.२१ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी करमाळा तालुका ग्रामीण मंडल अध्यक्षपदी मकाई साखर कारखान्याचे संचालक सचिन पिसाळ यांची निवड करण्यात आली. शेलगाव (ता.करमाळा) येथील शिवम् प्राईड येथे पक्षाच्या झालेल्या बैठकीत भारतीय जनता पक्षाचे निरिक्षक बाळकृष्ण येल्पले हे निवडणूक अधिकारी म्हणून उपस्थित राहून त्यांनी पिसाळ यांच्या नावाची घोषणा केली. पिसाळ हे भारतीय जनता पक्षाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. मकाई सहकारी सहकारी साखर कारखान्याचे ते विद्यमान संचालक म्हणून कार्यरत असून पांगरे ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून त्यांनी काम केले आहे. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या करमाळा शहर अक्ष्यक्षपदी काकासाहेब सरडे यांच्या नावाची घोषणा झाली. या निवडीनंतर बाळकृष्ण येल्पले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शुभम बंडगर, जगदीश अगरवाल उपस्थित होते

# राज्यातील सर्व शाळांचे एकाच दिवशी 'जीआयएस मॅपिंग'

## भौतिक सुविधांचे फोटो अपलोड करताना मुख्याध्यापकांची धावपळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

शासनाने आदेश दिल्यामुळे शिक्षण आयुक्तांच्या सूचनेनुसार शुक्रवारी १८ एप्रिल रोजी शिक्षणअधिकारी कादर शेख यांनी ऑनलाईन मिटींग घेऊन शनिवार १९ एप्रिल रोजी राज्यातील सर्व शाळांचे एकाच दिवशी जीआयएस मॅपिंग करण्यात आले.

मात्र यावेळी इंटरनेट नेटवर्क अनेक वेळा गायब झाल्याने फोटो अपलोड करताना मुख्याध्यापक व शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शोचालय, मैदान, किचन शेड, पाण्याची सोय व शाळेची इमारत आदि फोटो शासनाच्या ॲपवर अपलोड करण्यासाठी शनिवारी एकच दिवस मुदत देण्यात आली होती. अनेक शाळांमध्ये इंटरनेट सुविधा नसल्याने फोटो अपलोड करताना अडचणी आले. शिवाय सर्व ॲपवर अपलोड होईपर्यंत इंटरनेट सुविधा अनेक वेळा विस्कळीत होत होती. तसेच शासनाच्या विशिष्ट ॲपवरच सर्व फोटो अपलोड करण्यासाठी विशिष्ट मुदत देण्यात आले होते. म्हणून मुख्याध्यापकांना जीआएस मॅपिंग करण्यासाठी ताटकळत बसावे लागले. फोटो अपलोड व एडीट करण्यासाठी एकच दिवस मुदत असल्याने मुख्याध्यापकांची धावपळ सुरू होती. शिवाय या कामकाजांचे पाहणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकार्यांची क्षेत्रभेटही सुरू असल्याने फोटो अपलोड करताना मुख्याध्यापक दिसून येत होते.

राज्यात अनेक बोगस शाळा, शिक्षक व भौतिक सुविधा बोगस असल्याने जीआयएस मॅपिंगवरून फोटो काढण्यात आल्याचे सांगण्यात येते.

> **सोलापूर राज्यात पाचव्या क्रमांकावर**
>
> शाळांचे जीआयएस मॅपिंग फोटो अपलोड करण्यासाठी शनिवारी सूचना देण्यात आल्यानंतर ४७०३ शाळांपैकी ६९१ शाळांनी मॅपिंग केला आहे. तर ४०१२ शाळांना मॅपिंग करताना अडचणी आले आहेत. तरी पण पहिल्या दिवशी सातारा १८ टक्के मॅपिंग करून राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. तर सोलापूर १५ टक्के मॅपिंग करून पाचव्या क्रमांकावर आहे. सोलापूरला प्रतिकूल परिस्थितीतही उत्तम काम झाले आहे .
>
> **- कादर शेख,** शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

> **चार तासात ६०० वेळा अयशस्वी प्रयत्न**
>
> शिक्षण विभागाकडून जीआर नसताना तोंडी आदेशानुसार मॅपिंग करण्यास सांगण्यात आले आहे. नेटवर्क नसल्याने व ॲपमध्ये प्रॉब्लेम असल्याने शाळांचे मॅपिंग करताना अनेक अडचणी आले आहेत. शासनाचे अधिकृत ॲप नसल्यामुळे शाळांचे आर्थिक व्यवहार हॅकर्सच्या हाती लागण्याची भीती आहे . ॲपमध्ये प्रॉब्लेम असेल तर रात्री फोटो अपलोड करण्यास सांगण्यात येते. त्यामुळे शिक्षकांना रात्रंदिवस काम करावे लागत आहे. शनिवारी शाळेचे फोटो अपलोड करण्यासाठी एका मिनिटाच्या कामासाठी ६०० वेळा प्रयत्न केला, तरी फोटो अपलोड झाले नाहीत .
>
> **- रोहन ढेपे, लिपिक, जागृती विद्यामंदिर, सोलापूर**

## पिलीव येथील बसस्थानकावरील शौचालयात दुर्गंधी; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव हे गाव पंढरपूर-सातारा महामार्गावरील एक मुख्य बाजारपेठ असणारे मोठे गाव आहे. याठिकाणाहून पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर, गोंदावले, कोल्हापूर यासह इतर अनेक तिर्थ क्षेत्राकडे जाणारे अनेक भाविक याच ठिकाणाहून ये- जा करतात. यामुळे प्रवाशयांची रात्र-दिवस रहदारी बसस्थानकावर असते.

मात्र जसा याठिकाणी महामार्ग झाल्यापासुन बसस्थानकावर शौचालय नसल्याने प्रवाशयांची प्रचंड गैरसोय होते. विशेषतः महीला प्रवाशांची प्रचंड अडचण होते. याठिकाणी ग्रामपंचायतीने शौचालय (मुतारी) बांधली आहे. पण या ठिकाणी कसल्याही प्रकारची स्वच्छता नसल्याने प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. त्यातच यामध्ये दारु पिऊन रिकाम्या बाटल्या मोठ्या प्रमाणात टाकल्या आहेत. तसेच गुटखा खाऊन लोक थूंकतात यामुळे या मुतारीत प्रचंड घाण साचून प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. याठिकाणी पाणयाचीही सोय नाही. तर याची स्वच्छता कोणीही करीत नाही यामुळे याठिकाणी या मुतारीत दुर्गंधी मुळे लघवीला कोणीही जात नाही एवढी विदारक परिस्थिती आहे. या जुन्या व मोठ्या बसस्थानकावर पहील्यपासूनच शौचालयाची वाणवा आहे. याठिकाणी प्रचंड अस्वच्छ व दुर्गंधी सुटणाऱ्या शौचालयातच नाईलाजाने प्रवाशी व नागरिकांना जावे लागते. कारण याठिकाणी कोणत्याही प्रकारची दुसरी पर्यायी व्यवस्था नाही. ग्रामपंचायत प्रशासनाने खरेतर दुसऱ्या ठिकाणी जागा पाहुन स्वच्छ व सुंदर असे शौचालय बांधून महीला व इतर प्रवासी वर्गाची होणारी गैरसोय टाळणे आवश्यक आहे. पिलीव गावात याव्यतिरिक्त सुद्धा गावात कुठेच स्वच्छ व सुंदर असे शौचालय नाही, हे पिलीव गावाचे दुर्दैव म्हणावे लागेल. ग्रामपंचायत प्रशासनाने किमान आहेत त्या शौचालयाची सफाई व स्वच्छता करावी अशी मागणी ग्रामस्थ व प्रवाशी वर्गातून होत आहे.

## एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेचे सव्वा लाखाचे गंठण लंपास

**सोलापूर, दि. २१ एप्रिल-**

एसटी बस मधून प्रवास करणाऱ्या महिलेचे सव्वा लाख रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माधुरी हनुमंत येवते (वय ३०, रा. कुरनूर, तालुका अक्कलकोट) या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० एप्रिल रोजी दुपारी पावणे तीनच्या सुमारास माधुरी येवते या मार्केट यार्ड समोरील बस स्टॉप येथून सोलापूर एसटी महामंडळाच्या बसमधून चुंगी गावी जाण्यासाठी एसटी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या पर्समधील सव्वा लाख रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले, अशी नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलीस हवालदार पैकेकरी पुढील तपास करीत आहे

## माळशिरसमधील १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची आज सोडत

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील सन २०२५-३० या पंचवार्षिक कालावधीत १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची सोडत येत्या मंगळवारी म्हणजेच २२ एप्रिल रोजी माळशिरस येथील पंचायत समिति सभागृहात सकाळी अकरा वाजता काढण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी दिली आहे.

माळशिरस तालुक्यातील गावचा कारभारी कोण होणार? यासाठी तालुक्याच्या कारभाऱ्याकडे फिल्डींग लावणयासाठी आता प्रतीक्षा संपणार असुन आपल्या मनासारखे आरक्षण पडावे व आपणालाच गावचा कारभारी होता यावेळी यासाठी अनेकांनी अक्षरशः देव पाण्यात ठेवले आहेत.

माळशिरस तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण एकाचवेळी काढण्यात येणार असून जशी मुदत संपेल तशी ते आरक्षण पुढील निवडणुकीसाठी लागू होणार आहे. यामध्ये सर्व साधारण, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी हे आरक्षण काढले जाणार असुन यामध्ये ५० टक्के जागा हया महीलांसाठी आरक्षीत असणार आहेत.तरी या आरक्षण सोडतीसाठी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समीतीचे सदस्य व ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी उपस्थित राहणयाचे आवाहन तहसीलदार सुरेश शेजुळ यांनी केले आहे.

> माळशिरस तालुक्यात सध्या मोहिते-पाटील व उत्तमराव जानकर हे पारंपरिक गट लोकसभा निवडणुकीपासून एकत्र आहेत. पण ग्रामपंचायत निवडणुकीत ते एकत्र लढणार की स्वतंत्र याची सध्या तालुक्यात चर्चा सुरु आहे. तर देशात व राज्यात सत्तेत असणारी भाजपप्रणीत महायुती एकत्र लढणार की भाजपा स्वतंत्र लढणार याचीही उत्सुकता आहे.

## कासेगाव येथील गावठाण वस्ती येथे सिंगल फेज देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव, दि. २१ एप्रिल-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील गावठाण लगत असणाऱ्या वस्त्यांसाठी स्वतंत्र सिंगल फेज ट्रान्सफार्मर बसवून मिळावे याबाबत कासेगाव ग्रामपंचायतीने महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता यांना निवेदन दिले. गावठाणा लगत ३५ ते ४० शेतकऱ्यांची लोक वस्ती आहे. तरी त्यांना सिंगल फेज करून मिळावे, अशी मागणी वस्तीतील शेतकऱ्यांनी केली आहे.

कासेगाव येथील चौगुले, येणगुरे, सोनार, शिंदे व बनसोडे वस्तीसाठी सिंगल फेज नसल्यामुळे येथे राहणाऱ्या लोकांना वीज पुरवठा सुरळीत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुलांचे वार्षिक परीक्षा सुरू असून विद्युतपुरवठा अभावी त्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. संध्याकाळी वस्तीवर वीज नसल्यामुळे सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांच्या धोका वाढले आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत आहे. जनावरांच्या चारा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. वस्तीवरील जनावरांना व माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी परीसरातील तळ्यांचा आसरा घ्यावे लागत आहे. त्यामुळे महावितरण विभागाने वस्तीवरील नागरिकांची गैरसोय दूर करून सिंगल फेज करून द्यावे, अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

> आमचे लहान मुले अंगणामध्ये खेळतात . सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांमुळे मुलांना अनेक वेळा धोका निर्माण झाले आहे. मुलांचे सध्या वार्षिक परीक्षाही सुरू आहेत . परंतु त्यांना अभ्यासासाठी वीज उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे आयुष्य अंधकारमय बनत आहे. म्हणून महावितरणने सिंगल फेज करून द्यावे.
>
> **- सागर बनसोडे, शेतकरी कासेगाव**

## श्री अर्धनारी नटेश्वर यात्रेची सांगता

### मोहिते-पाटील परिवाराच्या वतीने शिवभक्तांना अन्नदान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ एप्रिल-**

वेळापूर येथील श्री अर्धनारी नटेश्वर ग्रामदैवत यात्रेची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. मोहिते-पाटील परिवाराच्या वतीने शिवभक्तांना अन्नदान करण्यात आले.

वेळापूर येथे जागतिक किर्तीचे श्री अर्धनारी नटेश्वर हे हेमाडपंथी मंदिर आहे. १२ व्या शतकात देवगिरीचे राजे बाईदेवराणा यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. हे मंदिर पुरातत्व खात्याच्या ताब्यात आहे. येथे उमा महेश्वराची सुमारे पाच फूट उंचीची सुंदर मूर्ती आहे. चैत्री पाडव्याला या देवाच्या यात्रेस सुरुवात होते . हळदी, विवाह, साडे, वरात व श्री सत्यनारायण महापूजा असा पारंपारिक पद्धतीने येथे सोहळा साजरा केला जातो. गावातील मानाच्या कावड्यांची भव्य मिरवणूक काढली जाते. यात्रेच्या निमित्ताने हजारो शिवभक्त येथे दर्शनासाठी येतात. माढा लोकसभेचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील व माळशिरस विधानसभेचे आ उत्तमराव जानकर यांच्या नेतृत्वाखाली यात्रा कमिटीच्या वतीने यात्रेचे नियोजन केले जाते.



सोमवारी श्री सत्यनारायण महापूजा सुधाकर शिंदे व त्यांच्या पत्नी कुसुम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली. श्रीमती स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या वतीने श्री धनंजयराव माने देशमुख व त्यांच्या पत्नी सोनल माने देशमुख यांनी सपत्नीक श्री ना पोषाख अर्पण केला व सायंकाळी मोहिते पाटील परिवाराच्या वतीने भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख, आनंदमूर्ती सेवा मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे उपस्थित होते. पूजेचे पौरोहित्य महेश गुरव, योगेश गुरव, महेश स्वामी, मन्मथ स्वामी व विवेक जोशी यांनी केले. महादेव देवालय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने देशमुख, सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, यात्रा कमिटीचे अध्यक्ष दत्तात्रय चंदनशिव, उपाध्यक्ष काशिनाथ आडत, मनोहर माने, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादासाहेब तुपे यांच्यासह ग्रामस्थांनी यात्रा यशस्वी करण्यासाठी मदत केली.



## माळशिरस तालुक्यात कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.२१ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यात पाच दिवस चालणार संसर्गिक रोग कार्यक्रमांतर्गत कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनमार्फत रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे.

दि. २१ एप्रिल ते २५ एप्रिल पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या असैसर्गिक व कार्यक्रमांतर्गत कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन मार्फत कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. दि. २२ रोजी ग्रामीण रुग्णालय नातेपुते, दि. २३ रोजी ग्रामीण रुग्णालय माळशिरस, दि.२४ रोजी उपजिल्हा रुग्णालय अकलूज, दि.२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र वेळापूर येथे स्त्रियांमध्ये असलेल्या स्तनांचा कर्करोग व योनीमार्गाचा कर्करोग तसेच मौखिक कर्करोग (स्त्री,पुरुष) यांची तपासणी जिल्हास्तरावरून आलेल्या तज्ञ डॉक्टर मार्फत महाराष्ट्र शासनामार्फत पुरवलेल्या सर्व सोयीने युक्त असलेल्या व्हॅन मार्फत कर्करोग तपासणी करण्यात येणार असून निदान झालेल्या रुग्णांना पुढील तपासणी व औषध उपचार यासाठी संदर्भित करण्यात येणार असल्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर प्रियांका शिंदे यांनी सांगितले असून सदर यांना मार्फत तपासणी करून घेण्याबाबत जनतेला आव्हान करण्यात येत आहे

# मावडीकरांची ३८ वर्षापासून सनई नगारा वादन सेवा

## सध्या दुसरी पिढी सेवेत; स्वामी समर्थ पुण्यतिथी महोत्सवात रोज पहाटे मंगलमय सूर पडतात कानी

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि.२१ एप्रिल-**

श्री दत्त गुरुचे अवतार श्री स्वामी समर्थ महाराज यांचा १४७ वा पुण्यतिथी महोत्सव वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे चालू आहे. यामध्ये पहाटे पाच वाजता काकडारती नंतर सुमधुर सनई चौघड्याचे स्वर कानी पडतात. वटवृक्ष स्वामी समर्थ महाराजांच्या दरबारात पुण्यतिथी महोत्सवात गेल्या ३८ वर्षापासून मावडीकरांची दुसरी पिढी सनई चौघडा वादनाची सेवा सादर करीत अक्कलकोट वासीयांची स्वामी भक्तांची पहाट अविस्मरणीय करत आहेत.



सनईवादक भिकाजी काळूराम मावडीकर ' हे १९८७ ला सोलापुर येथे काही कामानिमित्त आले होते. तेव्हा ते तीर्थ क्षेत्र अक्कलकोट येथे स्वामीं समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी आले. तेव्हा वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे विश्वस्त अध्यक्ष स्व. बाळासाहेब इंगळे यांची भेट झाली. त्या भेटीत दोघांचे संभाषण होऊन मावडीकर यांना स्वामी समर्थाच्या पुण्यतिथी उत्सवात सनई चौघडा वादनाची सेवा करण्याबाबत बोलणे झाले. १९८७ ला तारद्वारे स्वामीच्या दरबारात सनई चौघडा वादनासाठी आमंत्रित करण्यात आले. पंधरा वर्षे सनईवादक भिकाजी मावडीकर व चौघडा वादक दिनेश मावडीकर यांनी वादनाची सेवा केली. मावडीकर यांची दुसरी पिढी चौघडा वादक गणेश मावडीकर हे चौघडा वादनाचे काम करतात. त्यांच्या सोबतीला सध्या दोन वर्षापासून स्वामींचे निस्सीम भक्त मधुकर धुमाळ सनई वादनाचे काम करीत आहेत. सनई चौघडा वादनाच्या सोबतीला अक्कलकोट येथील राजेद्र शिंपी हे झांज व महेश स्वामी तबला वादन करीत साथ संगत करीत आहेत . पहाटेच्या समयी सनई चौघडा वादनाचे समधुर स्वर कानी पडून अक्कलकोट वासीयांची व स्वामी भक्तांची पहाट संस्मरणीय होत असल्याची माहिती वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष महेश इंगळे यांनी दिली .

> सनई चौघडा वादनाची संधी सर्वप्रथम भिकाजी मावडीकर व दिनेश मावडीकर यांना सर्वप्रथम १९८७ ला वटवृक्ष देवस्थानचे तत्कालीन अध्यक्ष स्व. बाळासाहेब इंगळे यांनी दिली. आज मावडीकरांची दुसरी पिढी गणेश मावडीकर सनई चौघडा वादनाची सेवा बजावित आहेत.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड,
परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महिलांच्या पुढाकाराने बोरगांवात घडले बौद्ध समाजाचे ऐक्य

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवासाठी समाज झाला एक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ एप्रिल-**

बोरगांव (ता.माळशिरस) येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यासाठी गावातील सर्वांनी गटतट विसरुन एकत्र येण्यासाठी महिलांनी पदर खोचला अन् तो यशस्वी ठरला. त्यातून आता येथे एकच जयंती साजरी करण्याचे ठरविण्यात आले.

महिलांच्या या कृतीमुळे सर्व जयंती उत्सव मंडळापुढे चांगला आदर्श निर्माण करुण महिलांच्या पुढाकाराने बोरगांवात बौद्धाचे ऐक्य घडल्याचे दिसून आले. बोरगाव मधील या घटनेचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सालाबादप्रमाणे या वर्षीही जयंती साजरी करण्यासाठी वार्षिक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीला ४० ते ५० महिला, तरुणी उपस्थित होत्या. त्या सर्व महिलांनी आक्रमक होत या वर्षी पासून बोरगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची एकच जयंती साजरी झाली पाहिजे असा पवित्रा घेतला आणि येथे ऐक्य घडून आले. आता बोरगावात यावर्षीपासून एक जयंती एक मिरवणूक काढली जाणार आहे. त्यामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून नितीन सरवदे यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष सौरभ भोसले, खजिनदार सचिन भोसले, महिला अध्यक्षा लक्ष्मी भोसले, उपाध्यक्षा सुरेखा भोसले, मिरवणूक प्रमुख संगिता भोसले यांची निवड करण्यात आली.



## महत्वाचे...



### अक्कलकोट येथे शिवसेना ग्रंथालय सेलची बैठक

**अक्कलकोट, दि. २१ एप्रिल-**

शिवसेना ग्रंथालय सेलचे प्रदेशाध्यक्ष बी.जी. देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये अक्कलकोट येथील श्री शहाजीराजे भोसले वाचनालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीला शिवसेना ग्रंथालय सेलचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष देविदास राठोड, मराठवाडा विभागीय अध्यक्ष दीपक गिरी, शहाजीराजे भोसले वाचनालयाचे ग्रंथपाल दत्तात्रय बाबर, सहाय्यक ग्रंथपाल दिनेश शिंपी, प्राध्यापक परमेश्वर आरबळे, शिवसेना ग्रंथालय सेलचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष बिराप्पा पुजारी, श्रीनिवास सिंदगीकर आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बी.जी. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. शिवसेना ग्रंथालय सेलचे सोलापूर जिल्हाध्यक्ष देविदास राठोड यांनी शिवसेना ग्रंथालय सेलचे प्रदेशाध्यक्ष बीजी देशमुख हे राज्यातील वाचनालय आणि ग्रंथालयांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी काम करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या प्रकारे शिवसेना ग्रंथालय सेलचे काम सुरू आहे. या सेलच्या माध्यमातून वाचनालय आणि ग्रंथालयाच्या वाढीव अनुदानासंदर्भात तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतना संदर्भात शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन देविदास राठोड यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास वैजू मोरे, संदीप राठोड, सुरेंद्र भोसले, किरणकुमार राठोड उपस्थित होते.



### नोबल वेल्फेअर असोसिएशनतर्फे सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

**अक्कलकोट, दि. २१ एप्रिल-**

नोबल सोशल वेल्फेअर असोशियन अक्कलकोटचा दरवर्षीप्रमाणे सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला. या इज्तेमाई शादियां सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये ११ वधू-वरांचा लग्न लावण्यात आले या विवाह सोहळ्यास अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला. विवाह सोहळ्यास आलेलेल्या नातेवाईकांना आणि सर्व नागरिकांसाठी दाता पीर दर्गा येथेच जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्यात आयोजकांच्या वतीने कपाट, गादी, पलंग तसेच संसार उपयोगी साहित्य, वर-वधूंना कपडे, वधूसाठी मणी मंगळसूत्र व आलेल्या पाहुण्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. विवाह सोहळा हजरत दाता पीर शाह कादरी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी संस्थापक अध्यक्ष हुसेन बळोरगी, हजरत मस्तुर शाह कादरी, महेश हिडोळे, मिलन कल्याणशेट्टी ननु कोरबु, मुत्तु खेडगी, सद्दाम शेरीकर,रजाक सय्यद, मोशीन बागवान, इरफान दावन्ना, सैपन पठान,फारूक बबर्ची, बुडन तांबोळी, गुलाम दाता बळोरगी, मुबारक कोरबु, आझम शेखजी, मुजमील मुजावर (हैद्रा),रफिक पठाण, मुरतुज बाजे, सोहेल फरास, रशीद खिस्तके, समीर शेख, आलम कोरबु, भया नायकवाडी, नुरद्दिन सोलापूरे, इस्माईल आळंद, सलीम गावंडी उपस्थित होते.

### जय मल्हार क्रांती संघटनेच्या जिल्हा युवक अध्यक्षपदी सागर जाधव

**मोडनिंब, दि. २१ एप्रिल-**



जय मल्हार क्रांती संघटनेच्या सोलापूर जिल्हा युवक अध्यक्षपदी माढा तालुक्यातील अरण येथील सागर किसन जाधव यांची निवड करण्यात आली.नुकतीच टेंभुर्णी येथे संघटनेची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी बापूसाहेब जाधव, किरण जाधव, लक्ष्मण जाधव, महादेव जाधव, संगीता ताई पाटोळे, भाऊसाहेब मसुगडे, हनुमंत शिरतोडे, नाना दळवी, शंकर जाधव, दीपक माने या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा युवक अध्यक्षपदी सागर किसन जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंकुश जाधव व युवक अध्यक्ष सुधीर नाईक यांच्या हस्ते सोलापूर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सागर जाधव यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

### कंदर हेडवर्क्स येथील मीटर जळाले; बार्शी शहराचा पाणी पुरवठा उशिराने

**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

शहराच्या उजनी पाणी पुरवठा योजनेतील कंदर हेडवर्क्स येथील महावितरणचे मीटर सकाळी ९.३० वाजता जळाल्याची घटना घडली. त्यामुळे या ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडित झाला असून, महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी युद्धपातळीवर विद्युत पुरवठा सुरळीत करण्याचे काम करत आहेत. या तांत्रिक अडचणीमुळे बार्शी शहराचा आजचा पाणी पुरवठा उद्या (२२ एप्रिल) करण्यात येणार आहे तर उद्याचा पाणी पुरवठा परवा (२३ एप्रिल) दिवशी करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासक तथा मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

## ६५ एकरात लावा सावली देणारी झाडे

**• पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सूचना**

### आषाढीच्या पार्श्वभूमीवर पंढरीत केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ एप्रिल -**



भक्ती सागर (६५ एकर) येथे होणाऱ्या नियोजित संत नामदेव स्मारक जागेची पाहणी करून, भक्ती सागर येथे मोठ्या प्रमाणात सावली देणारी, पानगळ कमी असणारी तसेच कमी पाण्यात वाढणाऱ्या झाडांची लागवड करा अशी सूचना देत नियोजन समितीतून निधीची उपलब्धता केली जाईल, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै रोजी होणार असून या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. वारी कालावधीत येणा-या वारकरी, भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने ग्रामविकास तथा पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री गोरे यांनी पंढरपूर येथील विविध ठिकाणची पाहणी केली व अनुषंगिक मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी पालकमंत्री गोरे यांनी वाखरी पालखीतळ, वाळवंट, चंद्रभागा नदीपात्र, घाट तसेच पत्रा शेड येथे होणाऱ्या नियोजित दर्शन मंडप व स्काय वॉक बाबतची माहिती घेऊन संबंधित ठिकाणची पाहणी केली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वाखरी तळावर भाविकांसाठी घेण्यात येत असलेल्या सोयी सुविधा तसेच पत्रा शेड येथे नियोजित दर्शन मंडप व स्काय वॉक ची माहिती दिली. त्याप्रमाणेच ६५ एकरवर भाविकांसाठी देण्यात येत असलेल्या व नदीपात्रात प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असलेल्या सुविधांची माहितीही त्यांनी दिली.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, कार्यकारी अभियंता अमित निंबकर, गटविकास अधिकारी सुशील संसारे, सहाय्यक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, महामार्ग प्राधिकरणाचे केशव घोडके तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## शिक्षकांचे मांडेगाव झाले आता अधिकाऱ्यांचे गाव

**• विविध क्षेत्रातील भूमीपुत्रांचा केला सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.२१ एप्रिल-**



बार्शी तालुक्यात शिक्षकांचे गाव म्हणून ओळख असलेल्या मांडेगावने आता अधिकाऱ्यांचे गाव म्हणून ओळख निर्माण केली आहे. स्पर्धा परीक्षामधून घवघवीत यश प्राप्त केलेल्या भूमिपुत्रांचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.अध्यक्षस्थानी धाराशीव, भूमचे गटविकास अधिकारी व मांडेगावचे सुपुत्र आनंद मिरगणे होते.

प्रमुख पाहुणे म्हणून श्री नर्मदेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक विलास मिरगणे, सुरेश पायघन, मारुती मिरगणे, बबन मिरगणे, सचिन मिरगणे, पिंटू मिरगणे, बंडू मिरगणे, राहुल मिरगणे, पंडित मिरगणे, लक्ष्मण मिरगणे, बाबासाहेब मिरगणे, शिक्षक काकासाहेब मिरगणे, दत्ता मिरगणे यांची उपस्थिती लाभली. गटविकास अधिकारी आनंद मिरगणे व संचालक विलास मिरगणे यांच्या हस्ते अमोल मिरगणे (सहाय्यक अभियंता जलसंधारण), विद्या मिरगणे (बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यकारी सहायक), शरद मिरगणे (एसआरपीएफ महाराष्ट्र पोलीस), मयूर मिरगणे (ग्राम महसूल अधिकारी), प्रथमेश पायघन (इस्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड), स्वप्निल पारडे (महाराष्ट्र पोलीस), लता मिरगणे (आदर्श अंगणवाडी सेविका), आयटीएस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी आदिती मिरगणे, ईश्वरी पायघन यांचा पुष्पगुच्छ भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. मांडेगावसारख्या लहान खेड्यातून युवकांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मोठे यश प्राप्त केले आहे. हे सर्वासाठी अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे. येणाऱ्या काळात ग्रामस्थांची, युवकांची साथ घेत गावात सुसज्ज अभ्यासिका उभारण्याचा मानस संचालक विलास मिरगणे यांनी व्यक्त केला. अध्यक्ष आनंद मिरगणे यांनी शिक्षकांचे गाव ओळख असलेल्या मांडेगावाने आता अधिकाऱ्यांचे गाव अशी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांनी निश्चित ध्येय, योग्य नियोजन, अथक परीश्रम व परिस्थितीची जाण समोर ठेवून प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते.कार्यक्रमासाठी वैभव मिरगणे, निलेश पायघन, तानाजी मिरगणे, तानाजी पायघन व मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.सतीश मिरगणे यांनी केले.

## राजाभाऊ रसाळ यांच्या फार्म हाऊसवर पोलिसांची कारवाई

**• मन्ना नावाचा जुगार खेळताना ६ जण रंगेहाथ ताब्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**

बार्शी तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागोबाचीवाडी येथील राजाभाऊ रसाळ यांच्या फार्म हाऊसवरील उघड्या पत्र्याच्या शेडमध्ये मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या ६ जणांवर पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी एकूण ३,९७० रुपयांची रोख रक्कम आणि ५२ पत्त्यांचा डाव जप्त केला.


पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोहेकॉ. सोमनाथ खांडेकर, पोहेकॉ. बोबडे, शेलार, पोकॉ. चौधरी यांनी सपोनि ढेरे यांच्या आदेशानुसार मौजे नागोबाचीवाडी येथे अचानक छापा टाकला. पंचांसमक्ष १६:५५ वाजता झालेल्या कारवाईत खालील इसमांना जुगार खेळताना ताब्यात घेण्यात आले.

संदीप त्रिशैल रंगदाळ (रा. उपळाई रोड), शिवाजी अनंतराव इंगळे (रा. वैद्य वस्ती), आयाज गफार शेख (रा. ४२२ रोड), पांडुरंग सादु पवार (रा. सुभाषनगर), दत्तात्रय सुरेश चव्हाण (रा. धर्माधिकारी प्लॉट), सत्तार बशीर बागवान (रा. गवत गल्ली). पोलिसांनी या सर्व आरोपींकडून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करुन महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास बार्शी तालुका पोलीस करीत आहेत.

## रामलिंगच्या माकडांची पाण्यासाठीची वणवण थांबली

**▸▸ बार्शीच्या जैन सार्वजनिक वाचनालयाने केली व्यवस्था**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**



येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयातर्फे उन्हाळ्यामुळे पाण्यासाठी भटकणाऱ्या श्रक्षेत्र रामलिंग येथील माकडांसह अन्य वन्यजीवांसाठी दहा पाण्याचे जार व ३०० ते ३५० किलो भाजीपाला, केळी व इतर फळे, अर्धा पोते फुटाणे देण्यात आले. या उपक्रमातून वाचनालयातर्फे दर मंगळवारी साहित्य पाठवण्याचा निश्चय करण्यात आला आहे. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

वाचनालयात सुरू असलेल्या पेपर वाचन विभागात नित्य येणाऱ्या एका वाचकाच्या सुचनेनुसार या उपक्रमाला मूर्त स्वरूप आले आहे. येथे दररोज २५० ते ३०० लोक पेपर वाचन विभागात येतात. त्यातील नियमीत येणारे आकाश कसबे यांनी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव व लिपिक विराज पतंगे यांना येडशीजवळील रामलिंगमध्ये सध्या रखरखत्या उन्हाळ्यामध्ये तेथील माकडासाठी व इतर वन्यजीव प्राण्यांसाठी आपण कांहीतरी करावे असे सुचवले. ग्रंथपाल यांनी वाचनालयाचे पदाधिकारी व संचालक मंडळास ही गोष्ट सांगितली. वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ व ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया व इतर संचालक यांनी दि.१५ एप्रिल रोजी माकडांसह अन्य वन्यजीवांसाठी दहा पाण्याचे जार व ३०० ते ३५० किलो भाजीपाला, केळी व इतर फळे, अर्धा पोते फुटाणे रामलिंगला रवाना केले. हा उपक्रमातून वाचनालयातर्फे दर मंगळवारी सुरू ठेवण्यात येत असल्याने बार्शीतील प्रतिष्ठित व दानशूर व्यक्तींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव मो.नं. ७५८८५०७३३१ अथवा विराज पतंगे मो.नं. ८८८८५२८८३७ यावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बार्शी येथून दर मंगळवारी रामलींगला सामान घेऊन जाण्यासाठी टॅम्पोची व्यवस्था केलेली आहे.

## डॉ.आंबेडकर जयंती मिरवणूकीस बार्शीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### सामाजिक बांधिलकी जपत मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ एप्रिल-**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक बार्शी शहरातील बार्शीकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाजाप्रती आपली निष्ठा दाखवली.

या मिरवणुकीचे उद्घाटन आ. राजेंद्र राऊत, डीवायएसपी नालकुल, विजय राऊत, तात्यासाहेब शिंदे, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास रवीअण्णा राऊत, पट्टण पवार, महावीर कदम, शशिकांत जगदाळे, अमृतनाना राऊत, ड. अविनाश गायकवाड, हामू धस, तात्या देशमुख, माजी नगरसेवक संदेश काकडे, दीपक धावारे, गणेश भोळे हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भव्य मिरवणुकीचे आयोजन राज विजय क्रीडा शैक्षणिक मंडळ व गौतम बुद्ध तरुण मित्रमंडळ यांच्यावतीने करण्यात आले होते.

या संस्थेचे नूतन अध्यक्ष सागर लंकेश्वर, सहअध्यक्ष प्रशांत रणझुंजारे, उपाध्यक्ष शंकेश बडेकर, खजिनदार विनोद बोकेफोडे, सहसचिव अभिमान गायकवाड व मंडळाचे पदाधिकारी, पंडित राजगुरु, मिलिंद ताकपिरे, प्रवीण आखाडे, सागर नागटिळक, सुरज नागटिळक, आकाश वाघमारे, विशाल गायकवाड, शिवम अंगारखे यांनी आयोजनात पुढाकार घेतला. प्रशांत रणझुंजारे, निखिल रणझुंजारे, सुनील रंदील, दत्ता रंदील, सूचित धावारे, संतोष भोसले, गौतम वाघमारे, रणजित चांदणे, लक्ष्मण लांडगे, सुरज वाघमारे, प्रवीण रिकीबे, कुमार रणझुंजारे, शंकर बडेकर यांनी गेली अनेक वर्षे समाजकार्य करणाऱ्या या संस्थेच्या कार्याचे मान्यवरांनी कौतुक केले.

## दोन कोटी खर्चून गोव्यात उभारले स्वामी समर्थांचे मंदिर

**• सोहळ्यास अन्नछत्र मंडळाचे अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ एप्रिल-**



गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली साखळी तालुक्यातील फणसवाडी नाव्हेली येथे २ कोटी रुपये खर्च करून श्री स्वामी समर्थांचे मंदिर बांधण्यात आले आहे.

या मंदिरात रविवारी श्री स्वामी समर्थांचा जयजयकार करत मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. गाणगापूर देवस्थानचे महंत श्री श्री वल्लभानंद सरस्वती यांच्या हस्ते शांतीपाठ, मंगलाचरण, मधुपर्कपूजन करण्यात आले. दुपारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत व सुलक्षणा सावंत यांच्या हस्ते कळसारोहण झाले. तत्पूर्वी सकाळी १० वाजता मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी खास अक्कलकोटवरून आलेले अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांचा गोवेकरांच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या धार्मीक कार्याचे कौतुक केले. श्री. भासले यांनी स्वामींचे चांगल्या पद्धतीने मंदिर उभारल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शाम मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, ॲड. नितीन हबीब, पी.जी लोंढे पाटील, गिरीश कोल्हापूरे, लाला राठोड, संतोष भोसले, प्रशांत कवडे, मधु गुरव, शिवराज स्वामी, प्रशांत साठे, महंतेश स्वामी, सरफराज शेख, रमेश राठोड, संतोष माने आदीसह मान्यवर उपस्थित होते. पणजी, साखळी, फोंडा, मडगाव, डिचोली आणि परिसरातील भाविक उपस्थित होते. दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. दिवसभर आरती, अखंड महाप्रसाद ,सुवासिनी महिलांतर्फे सायंकाळी दिपोत्सव आणि पालखी मिरवणूक काढण्यात आली. रात्री श्री स्वामी समर्थांच्या जीवनचरित्रावर आधारित राजन शंकर कोठारकर लिखित अनंतकोटी हे नाटक झाले.

**जोधपूरी दगडातून संपूर्ण मंदिर**

हे मंदिर पूर्णपणे जोधपुरी दगडातून बांधले आहे. लोकसहभागातून बांधलेल्या या मंदिराला २ कोटी रुपये खर्च आला आहे. भव्य दिव्य मंदिर उभारल्याने गोव्यातील स्वामी भक्तांनी समाधान व्यक्त केले. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनखाली ट्रस्टचे अध्यक्ष रोहिदास काणसेकर, सचिव सचिन आपटे, उदय जोशी, धनाजी घोगरे, रोहन कवळेकर व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.